१०४ शतकोत्तर वाटचाल
एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL
• मुंबई, सोमवार १८ मे, २०२६ • वर्ष-१०४, अंक-७४, पाने-८, किंमत: ₹ ७
• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 74 Marathi - Daily - Mumbai, 18 May, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे
24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
रानडुकराचे दात दाखवून करोडोंची लूट ?
navakal.in
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

## थोडक्यात...

### सीएनजीची पुन्हा दरवाढ किलोला १ रुपये महागला

**नवी दिल्ली -** गेल्या तीन दिवसांत पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ झाल्यानंतर आता सीएनजीच्या किमतीतही पुन्हा वाढ करण्यात आली आहे. दिल्ली-एनसीआरसह देशातील विविध शहरांमध्ये सीएनजी दर किलोमागे १ रुपयांनी महागला असून, गेल्या दोन दिवसांत एकूण ३ रुपयांची वाढ झाली आहे. दोन दिवसांपूर्वीच गॅस कंपन्यांनी सीएनजीच्या दरात २ रुपयांनी वाढ केली होती. त्यानंतर आज पुन्हा १ रुपयांची वाढ जाहीर करण्यात आली. या दरवाढीमुळे सर्वसामान्यांचा प्रवास खर्च वाढवणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. नवे दर तत्काळ लागू करण्यात आले आहेत. नवीन दरपत्रकानुसार, दिल्लीत सीएनजीचा दर ७९.०९ रुपयांवरून ८०.०९ रुपये प्रति किलो झाला आहे. मुंबईत सध्या सीएनजी ८४ रुपये प्रति किलो दराने विकला जात आहे. तर पुणे-पिंपरी चिंचवडमध्ये सीएनजीचा दर ९२.२५ रुपये, नाशिकमध्ये ९३.६५ रुपये प्रति किलोवर पोहोचला आहे.

### चांदी आयातीसाठी आता विशेष परवाना बंधनकारक

**नवी दिल्ली -** केंद्र सरकारने मौल्यवान धातूंच्या आयात शुल्कात मोठी वाढ केल्यानंतर चांदीच्या आयातीवरही कठोर निर्बंध लागू केले आहेत. परदेश व्यापार महासंचालनालयाने



(डीजीएफटी) जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, सोने आणि प्लॅटिनम मिश्रित चांदीसह सर्व प्रकारच्या चांदीच्या आयात धोरणात बदल करण्यात आला आहे. नवीन निर्णयानुसार, चांदीची आयात मुक्त श्रेणीतून काढून प्रतिबंधित श्रेणीत समाविष्ट करण्यात आली असून, हा आदेश तत्काळ लागू करण्यात आला आहे. त्यामुळे आता चांदी आयात करण्यासाठी आयातदारांना केंद्र सरकारकडून विशेष परवाना घेणे बंधनकारक असणार आहे.

# अजित पवारांबद्दल एका बड्या नेत्याचे आक्षेपार्ह वक्तव्य

## ऑडिओ क्लिप! सुनेत्रा, पार्थने ऐकली! पक्षात भूकंप

■ मुंबई

**राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातील अंतर्गत संघर्ष रोज नव्या दाव्याने उघड होत आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी अनेक मुलाखती दिल्या आणि त्यात खळबळजनक गौप्यस्फोट केले. ते म्हणाले की, अजित पवार यांच्याबद्दल त्यांच्याच पक्षातील एका बड्या नेत्याने आक्षेपार्ह भाषेत वक्तव्य केले. त्याची ऑडिओ क्लिप आहे. हा ऑडिओ सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांनी ऐकला आहे. तेव्हापासूनच संघर्ष वाढला आहे.**



**रोहित पवार** यांनी सांगितले की, राष्ट्रवादीतील दोन वरिष्ठ नेत्यांपैकी एका नेत्याने अजित पवारांबद्दल अत्यंत खालच्या स्तरावर जाऊन वक्तव्य केल्याची दिल्लीत रेकॉर्ड केलेली ऑडिओ क्लिप एका नेत्याकडे आहे. मी स्वतः ती क्लिप ऐकलेली नाही. पण ती कुणाकडे आहे ते मला माहीत आहे. अजित दादांनी ती क्लिप ऐकली होती. त्यांच्या अपघाती निधनानंतर आणि राष्ट्रवादीचे निवडणूक आयोगाला दिलेले पत्र समोर यायच्या आधी तो ऑडिओ पार्थ आणि सुनेत्राकाकींनी ऐकला. त्या क्लिपमध्ये दादांबद्दल अत्यंत खालच्या पातळीवरील भाषेत बोलले गेले आहे. तो ऑडिओ कुणाकडे आहे ते माहिती आहे, त्यांच्याशी फोनवरून बोलणे झाले आहे. मात्र त्यांनी तो ऑडिओ मला व्हॉट्सॲपवर पाठवण्यास नकार दिला. त्या ऑडिओ क्लिपनंतर पक्षात नाट्यमय घडामोडी झाल्या. कारण एवढ्या अनुभवी लोकांना सहज कोणी डावलत नाही. जर ते नेते खरच कार्यक्षम आणि प्रामाणिक असते तर त्यांचे पद काढले असते का? त्या दोन नेत्यांचे पद गाळण्यात आले. भविष्यात मंत्री आदिती तटकरे यांच्याऐवजी सुनील शेळके यांना पद मिळण्याची शक्यता आहे.

त्यांनी सांगितले की, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत दोन्ही राष्ट्रवादींची युती झाल्यानंतर मी शेवटचे ४ महिने अजितदादांसोबत होतो. पटेल आणि तटकरे हे २२ वर्षांपासून पक्षात आहेत. त्यावेळी पटेल आणि तटकरेंना शरद पवार साहेबांनी सांभाळून घेतले. प्रफुल्ल पटेल यांच्यावर ईडीची कारवाई सुरू झाली, तटकरेंवरही पोलीस केस सुरू झाली. त्यावेळीही पटेल यांच्यासोबत दादांचे तितके चांगले नव्हते. तटकरेंशी संबंध चांगले होते. शेवटच्या चार महिन्यांमध्ये मी दादांसोबत काम केले. त्यावेळी दादा वेगवेगळ्या मुद्यांवर व्यक्त व्हायचे. त्यातल्या त्यात पटेल आणि तटकरे यांच्याबद्दल दादा जास्तच नकारात्मक पद्धतीने व्यक्त होत होते. प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरेंना पक्ष ताब्यात घ्यायचा आहे याची कुणकुण दादांना काही प्रमाणात लागली होती. म्हणून पुढील राजकारण पाहता दोन्ही पक्ष एकत्र आले तर लोकांसाठी काम करताना फायदा होईल, अशी त्यांची भूमिका होती. कुठे ना कुठे काही लोकांवर नक्कीच दादांची नाराजी होती. मात्र दादा असल्याने काही गोष्टी नियंत्रणात राहिल्या. नंतर एक कागद, पत्र निवडणूक आयोगाला दिला होता. त्यात सही या दोघांचीच होती. दादा गेल्यानंतर पक्षाचे नियंत्रण ताब्यात घ्यावे यासाठी ते प्रयत्न करत होते. हे सरळ सरळ जाणवले. त्यानंतर त्यांना काही बोलता आले नाही. याशिवाय अजित पवार गटाच्या अर्थकारणावर आणि पक्षाच्या निधीवर आता पूर्णपणे पवार कुटुंबाचे नियंत्रण आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली पार्थ पवार आणि जय पवार यांच्याकडे खजिनदार पदाची जबाबदारी सोपवली आहे. यापूर्वी पक्षाच्या निधीचे आणि खर्चाचे अधिकार सुनील तटकरे किंवा प्रफुल्ल पटेल यांच्याकडे असायचे. आता मात्र पक्षाचा कोणताही अधिकृत खर्च करायचा असल्यास या तिघांपैकी एकाची किंवा सर्वांची स्वाक्षरी अनिवार्य आहे. या निर्णयाने वरिष्ठ नेत्यांचे अधिकार काढून घेतल्याने पक्षात एक प्रकारची असुरक्षितता निर्माण झाली आहे. तिजोरीची चावी सुनेत्रा पवार कुटुंबाकडे आल्यामुळे आता येत्या काळात ब्यूटी पार्लर किंवा खासगी प्रवासासाठी हेलिकॉप्टर वापरणे हे पक्षाच्या खर्चात येणार नाही. यापूर्वी एका वरिष्ठ महिला नेत्या किंवा संबंधित व्यक्तीने स्वतःच्या ब्यूटी पार्लरचे हजारो रुपयांचे बिल थेट पक्षाच्या निधीमधून भागवले होते. रोहित पवार यांनी हा गौप्यस्फोट केल्याने खळबळ माजली आहे. याच स्थितीत पार्थ पवार यांनी काल रात्री उशिरा वर्षा बंगल्यावर देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्याने चर्चेला उधाण आले आहे.

राष्ट्रवादी अजित पवार गटाचे पदाधिकारी उमेश पाटील यावर प्रतिक्रिया देत म्हणाले की, ती ऑडिओ क्लिप रोहित पवारांकडे असेल तर त्यांनी ती द्यावी. आपण ती फॉरेन्सिक लॅबमध्ये पाठवू आणि त्याची सत्यता पडताळून पाहू. रोहित पवारांना बालिश मुद्दे उपस्थित करण्याची सवय लागली आहे.

## नाशिकमधील टीसीएस प्रकरणात ९०० पानी आरोपपत्र अंतिम टप्प्यात

■ नाशिक

**नाशिकमधील** गाजलेल्या टीसीएस प्रकरणात तपास यंत्रणेकडून पहिल्या गुन्ह्यातील सुमारे ९०० पानी आरोपपत्र अंतिम टप्प्यात आहे. येत्या दोन दिवसांत

### ऑपरेशन मॅनेजरचा जामीन फेटाळला

ते न्यायालयात दाखल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या प्रकरणात एकूण नऊ गुन्हे दाखल असून, उर्वरित आठ गुन्ह्यांचाही तपास अंतिम टप्प्यात असल्याची माहिती आहे.

तपासादरम्यान संशयित आरोपींविरोधात पीडितांचे जबाब, प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे निवेदन तसेच महत्त्वाचे डिजिटल पुरावे गोळा केले आहेत. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता तपास यंत्रणेकडून सबळ पुरावे एकत्रित करत दोषारोपपत्र तयार केले आहे.

दरम्यान, देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात एका तरुणीच्या फिर्यादीवरून दानिश शेख, तोसिफ अत्तार आणि निदा खान यांच्याविरोधात बलात्कारासह धार्मिक भावना दुखावल्याचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणातील आरोपींचे जामीन अर्ज नाशिक सत्र न्यायालयाने यापूर्वीच फेटाळले होते. आरोपी जामिनावर बाहेर आल्यास साक्षीदारांवर दबाव टाकला जाऊ शकतो, असे नमूद करत न्यायालयाने जामीन नाकारला होता.

## नसरापूर अत्याचार प्रकरणात ११०० पानी आरोपपत्र दाखल

■ पुणे

### पुढील आठवड्यात सुनावणी

**भोर** तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या केल्याप्रकरणी आरोपी भीमराव कांबळे याच्याविरुद्ध विशेष न्यायालयात तब्बल ११०० पानांचे आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. गुन्हा घडल्यानंतर अवघ्या १४ दिवसांत आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. या खटल्याची पुढील आठवड्यात सुनावणी सुरू होणार आहे.

आरोपपत्रात आरोपीची सविस्तर माहिती, गुन्ह्यातील भूमिका आणि संपूर्ण घटनाक्रम नमूद करण्यात आला आहे. पीडित बालिकेचे वय सिद्ध करणारे अधिकृत पुरावे, वैद्यकीय अहवाल, शवविच्छेदन अहवाल तसेच लैंगिक अत्याचार आणि खुनासंदर्भातील तांत्रिक व वैज्ञानिक पुरावे आरोपपत्रात समाविष्ट करण्यात » पान ७ वर

## निवडणूक आयुक्त निवड समितीत न्यायाधीशांची संविधानात तरतूद नाही

■ नवी दिल्ली

**मुख्य** निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्तांची नियुक्ती करणाऱ्या समितीमध्ये सरन्यायाधीशांचा समावेश करणे निवडणूक आयोगासाठी बंधनकारक नाही, संविधानात अशी कोणतीही तरतूद नाही, असे प्रतिज्ञापत्र केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात सादर केले आहे. केंद्र सरकारने न्यायालयात अशी भूमिका मांडली आहे की, निवड समितीमध्ये सरन्यायाधीशांचा समावेश करणे हा संसदेचा निर्णय असू शकतो. परंतु ती घटनात्मक सक्ती मानली जाऊ शकत नाही.

मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्त



(नियुक्ती, सेवेच्या अटी आणि कार्यकाळ) अधिनियम, २०२३ ला आव्हान देणाऱ्या याचिकांवर न्यायालयात सुनावणी सुरू आहे. या नव्या कायद्यानुसार, मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्तांची नियुक्ती पंतप्रधान, लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि एक केंद्रीय मंत्री यांचा समावेश असलेल्या समितीद्वारे केली जाणार आहे. यापूर्वी या समितीत पंतप्रधान,

### केंद्र सरकारचे न्यायालयात प्रतिज्ञापत्र

लोकसभेतील विरोधी पक्षनेते भारताच्या सरन्यायाधीशांचा समावेश होता. नवा कायदा जानेवारी २०२४ पासून अस्तित्वात आला.

सरकारने न्यायालयात असे म्हटले की, » पान ७ वर

## ३० जूनपूर्वी शेतकऱ्यांची कर्जमाफी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची घोषणा

■ पुणे

**राज्यातील** शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत सरकारची तयारी अंतिम टप्प्यात असून, ३० जूनपूर्वी कर्जमाफीचा निर्णय घेतला जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. पुण्यात आयोजित ग्री हॅकेथॉन पारितोषिक वितरण आणि समारोप समारंभानंतर ते बोलत होते.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शेतकरी कर्जमाफीसंदर्भात कॅबिनेट सबकमिटीची बैठक पार पडली आहे. सरकारने यासंदर्भात अधिक माहिती मागवली असून, ती प्राप्त झाल्यानंतर पुढील प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. ३० जूनपूर्वी आम्ही कर्जमाफी करणार आहोत. आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे बांगलादेशात कांद्याची निर्यात होत नसल्याने बाजारात उत्पादन जास्त आणि खरेदीदार कमी आहेत. त्यामुळे केंद्र सरकारकडून कालपासून १२.३५ रुपये दराने कांदा खरेदी सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळेल. ग्री हॅकेथॉनमधील पहिला पुरस्कार दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाने दिला जाणार आहे. मराठा आरक्षण आणि मनोज जरांगे यांच्या मागण्यांबाबत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्य सरकारने मराठा समाजासाठी सातत्याने विविध निर्णय घेतले आहेत.

## इराणवर पुन्हा हल्ल्याचा इशारा अमेरिकेची लष्करी कारवाईची तयारी

■ वॉशिंग्टन

**अमेरिका** आणि इराण यांच्यात गेल्या महिनाभरापासून सुरू असलेल्या तणावात पुन्हा वाढ होण्याची चिन्हे दिसत आहेत. शांतता वाटाघाटींमध्ये कोणताही ठोस तोडगा न निघाल्याने अमेरिका पुढील आठवड्यात इराणवर पुन्हा लष्करी कारवाई करण्याच्या तयारीत आहे.

अमेरिकेचे संरक्षण मंत्रालय पेंटागॉनने संभाव्य हल्ल्यासाठी विविध पर्याय तयार केले असून, अंतिम निर्णय अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प घेणार असल्याचे सांगितले जात आहे. अमेरिकन आणि इस्त्रायली अधिकारी पुढील आठवड्यात इराणविरुद्ध



संयुक्त लष्करी कारवाई पुन्हा सुरू करण्याच्या तयारीत आहे. अमेरिकेचे संरक्षणमंत्री पीट हेगसेथ यांनी काँग्रेससमोर सांगितले की, गरज पडल्यास लष्करी कारवाई वाढवण्यासाठी योजना सज्ज असल्याचे सांगितले.

अमेरिकन अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, या योजनेत तीन प्रमुख पर्यायांचा समावेश आहे. पहिल्या पर्यायानुसार इराणच्या लष्करी तळांवर आणि महत्त्वाच्या पायाभूत सुविधांवर मोठ्या प्रमाणात हवाई हल्ले केले जाऊ शकतात. दुसऱ्या पर्यायात अमेरिकेच्या विशेष लष्करी पथकांना जमिनीवर उतरवून इस्फहान अणुऊर्जा प्रकल्प परिसरातील समृद्ध युरेनियम साठे नष्ट करण्याची कारवाई करण्याचा विचार आहे. » पान ७ वर

## रस्ते अपघातातील दोषी चालकाची फक्त २५ हजारांचा दंड ठोठावून सुटका

■ मुंबई

**महानगर** दंडाधिकारी न्यायालयाने रेल्वे आयुक्त कार्यालयात कार्यरत असलेल्या ६६ वर्षीय चालक पी. नारायणस्वामी पूसारिपडैया यांना बेदरकार आणि निष्काळजीपणे वाहन चालवून २५ वर्षीय निधी जेठमलानी हिला गंभीर दुखापत केल्याप्रकरणी दोषी ठरवले. मे २०१७ मध्ये झालेल्या या अपघातानंतर निधी जेठमलानी या कायमस्वरूपी निष्क्रिय अवस्थेत गेली. मात्र, न्यायालयाने सौम्य भूमिका घेत पूसारिपडैया यांना केवळ २५ हजार रुपयांचा दंड ठोठावून त्यांची सुटका केली. ही रक्कम पीडितेला नुकसानभरपाई म्हणून दिली जाणार आहे.

न्यायालयाने नमूद केले की, आरोपी प्रथमच गुन्ह्यात दोषी ठरला आहे. ही घटना आठ वर्षांपूर्वीची असून, त्याने खटल्याच्या प्रक्रियेचा त्रास आधीच सहन केला आहे. तसेच त्याची कौटुंबिक पार्श्वभूमी लक्षात घेऊन हा एकदाच झालेला निष्काळजीपणाचा प्रकार असल्याने न्यायालयाचा सौम्य दृष्टिकोन योग्य आहे.

२८ मे २०१७ या दिवशी निधी जेठमलानी या मरीन ड्राईव्हवरील मरीन प्लाझा हॉटेलजवळून केसी कॉलेजमध्ये बारावीच्या प्रवेशासाठी जात असताना रस्ता ओलांडत होती. त्यावेळी पूसारिपडैया चालवत असलेली पश्चिम रेल्वेच्या » पान ७ वर

## ज्येष्ठ अभिनेत्री उषा चव्हाण यांचा रोष व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार परत केला

**मराठी चित्रपटसृष्टीत १९८० ते ९० च्या दशकात रुपेरी पडद्यावर अधिराज्य गाजवणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री उषा चव्हाण यांनी महाराष्ट्र शासनाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यांना प्रदान करण्यात आलेला व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार त्यांनी परत केला आहे. ठाण्यातील आनंद आश्रम येथे जाऊन दिवंगत आनंद दिघे यांच्या प्रतिमेसमोर त्यांनी हा पुरस्कार ठेवत शासनाच्या विरोधात आपला रोष व्यक्त केला.**

■ ठाणे

**उषा चव्हाण** यांनी दिवंगत अभिनेते दादा कोंडके



यांच्यासोबत अनेक गाजलेल्या चित्रपटांत काम करत मराठी चित्रपटसृष्टीत वेगळा ठसा उमटवला. मात्र सध्या त्या आपल्या हक्काच्या जमिनीसाठी गेल्या २६ वर्षांपासून कायदेशीर लढा देत आहेत. पुण्यातील धनकवडी भागातील त्यांच्या

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

मालकीच्या जमिनीच्या टीडीआर प्रकरणात त्यांना न्याय मिळत नाही अशी त्यांची तक्रार आहे. या प्रकरणात न्यायालयाचा निकाल त्यांच्या बाजूने लागला » पान ७ वर

## कल्याण रेल्वे यार्डात अल्पवयीन मुलीवर अत्याचार

■ कल्याण

**मामाच्या** घरी जाण्यासाठी निघालेल्या एका अल्पवयीन मुलीवर कल्याण रेल्वे यार्डात एका नराधमाने लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली. पुण्यातील नसरापूर येथील चिमुकलीवर अत्याचार आणि हत्या प्रकरणानंतर अवघ्या महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली असताना ही घटना घडली. याप्रकरणी पोलिसांनी सौरभ सोनवणे या आरोपीला अटक केली.

पीडित मुलगी अहिल्यानगर येथून खोपोली येथे मामाच्या गावी जात होती. ती कल्याण रेल्वे स्थानकात लोकलची वाट पाहत उभी होती. त्यावेळी आरोपी सौरभ सोनवणे याने तिच्या हातातील मोबाईल हिसकावून घेतला.

मुलीने त्याच्याकडे मोबाईल परत मागितला असता त्याने ‘मोबाईल हवा असेल तर माझ्यासोबत पोलीस ठाण्यात चल’ असे सांगितले. त्यानंतर आरोपी मुलीला घेऊन कल्याण रेल्वे यार्डात गेला. तिथे त्याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. यावेळी पीडितेने स्वतःची कशीबशी सुटका करून घेऊन रेल्वे पोलीस ठाणे गाठले.

## संतोष देशमुख हत्या प्रकरणातील न्या. पटवदकर यांची बदली



■ बीड

**मुंबई** उच्च न्यायालयाने राज्यातील जिल्हा व सत्र न्यायाधीशांच्या नियतकालिक बदल्यांचे आदेश जारी केले

### नव्या न्यायाधीशांसमोर सुनावणी

आहेत. त्यात संतोष देशमुख खटला सुनावणी ज्या कोर्टात सुरू होती त्या बीडचे विशेष मकोका न्यायाधीश न्या. व्ही. एच. पटवदकर यांची संगमनेर येथे बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी धुळे येथून न्या. जे. आर. पुलाते बीड येथे रुजू होणार आहेत. त्यामुळे नव्याने सुनावणी घ्यावी लागणार आहे.

न्या. पटवदकर यांच्यासमोर मागील वर्षभरापासून मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाची सुनावणी सुरू होती. या प्रकरणात आरोपींवर दोषारोप निश्चित करण्यात आले असून, काही आरोपींनी त्या दोषारोपाविरोधात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात आव्हान दिले आहे. न्या. पटवदकर यांची बदली झाल्याने आता या प्रकरणाची पुढील सुनावणी नव्या न्यायाधीशांसमोर होणार आहे. उच्च न्यायालयाने बदली झालेल्या न्यायाधीशांना सुट्टीच्या कालावधीत नव्या ठिकाणी रुजू होण्याचे निर्देश दिले आहेत. न्यायालयाचे नियमित कामकाज ८ जूनपासून पुन्हा सुरू होणार आहे.

नवा काळ
Email- contact@navakal.in www.navakal.in /navakalofficial


# छोट्या जाहिराती

**संपर्क करा**
**८४२२८१७४४५/८१०८११६४२३**

## पाहिजेत

कुर्ला ते ठाणे / नवीमुंबई एरियासाठी बायकर्स पाहिजे. गॅस मीटर रिडींग, प्रति विझिट 30/- + इन्सेन्टिव्ह. **7208993036** {NC260483}

इमिटेशन ज्वेलरीमध्ये कडी फिटिंग, स्टोन सेटिंग आणि पॅकिंगसाठी अनुभवी मुली पाहिजे. दहिसर पूर्व. Contact : **8169999128** {NC260439}

घरकामासाठी (10/12/24 तास) बेबीकेअर / जापाबाई आणि कुकींगसाठी अनुभवी "बायका/ मुली" पाहिजेत पगार- 20,000/- ते 40,000/- रंजीतसर **9321417007 / 9892575886** दादर वेस्ट {NC260403}

मुलुंड येथे गारमेंट ऑफिससाठी ऑफिस व फिल्डवर्कसाठी लेडीज पाहिजेत. (वय 18 ते 30) **9653128763 / 8104614956 / 9920563855** {NC260499}

इलेक्ट्रिकल कामासाठी हेल्पर, वायरमन पाहिजेत. पगार 15000 ते 22000 गाडीभाडे मिळेल. **9820432870/ 9819017461** {NC260561}

भांडुप पश्चिम येथे ऑफसेट प्रिन्टींगसाठी बॉयलर, फिडरमेन पाहीजेत. संपर्क **8108130509.** {NC260554}

भांडुप येथे Female Office Assistant पाहिजेत. वय - ३० वर्षापर्यंत. संपर्क : **9137590722.** {NC260559}

25,000 (Salary+ Incentives) पाहिजेत आऊटडोर प्युन, हाऊसकीपिंग (स्त्री/पुरुष), क्रिस्टल हॉस्पिटल, दहिसर- **8976878444** {NC260575}

मुंबईत हेल्थ सर्वेसाठी भरती! मुले, मुली, महिला. वय 18-40. पगार ₹15,000+ रेल्वे पास. संपर्कः **9223269345** {NC260503}

फोरकलर कोमोरी मशीनसाठी (प्रिंटर/ बॉयलर/ फिडरमन/ हेल्पर पाहिजेत. अंधेरी (पूर्व) मोबाईल- **9819424379/ 8169268661** {NC260583}

## पाहिजेत

रुमाल पॅकींगसाठी ४ मुली, कॉम्प्युटर अकाऊंटंटसाठी १ मुलगा आणि गाठींच्या (Bale) पॅकींगसाठी १ मुलगा पाहिजेत. भेटा कोहिनूर एंटरप्राइजेस A/2-250, शाह आणि नाहर इंडस्ट्रियल इस्टेट लोअर परळ (पश्चिम) मुंबई- ४०००१३ {NC260584}

राममंदिर पूर्व, मुंबई येथे कोमोरी ऑटोप्लेट मशिन २०x२८ साठी प्रिंटर,बॉयलर व बाईंडर पाहिजेत. संपर्क : **9320882148** {NC260586}

सोलना/ हेडलबर्ग २५ x ३६ १ कलर प्रिंटिंग मशीन साठी प्रिंटर पाहिजे गणेश सकपाळ वसई, **9284674861** {NC260585}

घाटकोपर कंपनीमध्ये ऑफीस क्लिनिंग साठी मुले पाहिजे **7039364173** {NC260587}

मावशी, वॉर्डबॉय, कुक, नर्स, ड्रायव्हर, पेशंटकेअर (MALE + FEMALE) पाहिजेत. (राहणेखाणे + पगार) वीकेअर होम (महिला आश्रम) ठाणे. **9136404828** {NC260489}

स्त्री पुरुष केअर टेकर पाहिजेत घरकुल केअर सेंटरः **9819426634/ 9969529162** {NC260505}

भायखळा/ माझगांव विभागात कुरीयर डिलीव्हरीसाठी कमिशन/ पगारावर मुले पाहिजे. (Daily payment) **7208841538** {NC260548}

**भिवंडी/ मुंब्राच्या जवळ टेक्स्टाइल कंपनीला हेल्पर लेबर पाहिजेत! संपर्कः IMRAN: 8104662988 {NC260544}**

स्त्री-पुरुष वृद्धाश्रमात कामासाठी पाहिजे. मोफत राहण्याची खाण्याची सुविधा- **7040206848** {NC260438}

महानगर गॅसच्या मीटर रीडिंगसाठी (बाईकर) पाहिजेत. पगार 22,000/-+ 3,000/- TA, दिव्यम एक्सप्रेस **9820385767/ 7208993036** {NC260571}

अंबरनाथयेथे टूकलर ऑफसेट प्रिंटिंग मशीनसाठी बॉयलर, फिडरमन, पंचिंग ऑपरेटर, फोईल स्टॅम्पिंग ऑपरेटर, कोरोगेशन ऑपरेटर पाहिजेत. - **9145055970/ 9967994231** {NC260582}

## Situation Vacant

Rangeela Art Pvt Ltd. 252/258, Zaveri Bazar, Mumbai- 400002. We are looking for a Sales Girl for our imitation jewellery showroom. Requirements: *Good communication skills B Com passed Location: Zaveri Bazar, Mumbai Contact: **+919820442707** Interested candidates can call or WhatsApp for details. {NC260550}

Required outdoor duty/ peon at kandivali west (western line) age 20-35- call on **9868423657** {NC260551}

Required Outdoor Clerk, B1, Dhannur Bldg., 1st Floor, Phirosha Mehta Road, Fort/ CST. **9819321410** {NC260562}

Required male production supervisor for packaging co at Chakan Contact : **9833018829** {NC260535}

Required Delivery Staff for Trackon Courier Services, Vidyavihar (W). **9819551782** {NC260580}

## शैक्षणिक

आपले शिक्षण अर्धवट राहिले आहे का? खर्डीकर क्लासेस... हमखास पास! शाळा सोडलेल्यांसाठी वा नापास विद्यार्थ्यांसाठी शिक्षण सुरु करण्याची हिच योग्य संधी! इयत्ता १० वी व १२ वी साठी प्रवेश सुरु. NIOS/SSC / HSC (Arts/ Commerce/ Science) संपर्क: **7506987030** {NC260549}

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवलीः **9820627580 / 9820904646** {NC260552}

## फिल्मविषयक

महेश्वर फिल्म्स इंटरनॅशनल आगामी मराठी, हिंदी फिल्म सीरिअल, एल्बमसाठी सर्व वयोगटातील नवीन कलाकारांसाठी योग्यते अनुसार मौका (ऑडिशन / ट्रेनिंग) : **9136034519 / 8369152017** {NC260495}

### वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.
**- मॅनेजर, 'नवाकाळ'**


# केदारनाथमध्ये क्षमतेपेक्षा ४० टक्के जास्त भाविक! दीड किलोमीटर रांगा

■ देहरादून



**यावर्षी** उत्तराखंडमधील केदारनाथ धाममध्ये भाविकांची दरवर्षीपेक्षा अधिक गर्दी झाली आहे. सुमारे ४० टक्क्यांनी गर्दी वाढली आहे. परिस्थिती अशी आहे की, समुद्रसपाटीपासून ११ हजार फूट उंचीवर हजारो भाविक दररोज दर्शनासाठी धडपड करत आहेत. कारण रोज सरासरी २५ हजार भाविक केदारनाथला पोहोचत आहेत.

केदारनाथ धामला यावेळी चारधाम यात्रेच्या इतिहासातील सर्वाधिक भाविक आले आहेत. गत २५ दिवसांत विक्रमी ५.५० लाखांपेक्षा जास्त भाविक दर्शन घेऊन गेले. दर्शनासाठी मध्यरात्रीपासूनच रांगेस सुरुवात होते, जी दिवसभरात १ ते २ किमी लांब होते. पहाटे ४ वाजता रांगेत उभे राहिले तर ८ ते १० तासांनंतरच मंदिरापर्यंत पोहोचता येते. २१ किमी चढाईनंतर दीड किमी लांब रांग लागते. दर्शनाची प्रतीक्षा व्हीआयपी व्यवस्थेमुळेही बिघडली आहे. हेलिकॉप्टरने येणारे भाविक मंदिर समितीला २५०० रुपये व्हीआयपी दर्शन शुल्क देतात. त्यामुळे त्यांना आधी जाऊ दिले जाते. यामुळे रांगेतील भाविकांची दर्शनासाठीची प्रतीक्षा वाढते.

घोडा पडावपासून ते मंदिरापर्यंतची सर्व दुकाने, टेंट, गेस्ट हाऊस, छोटे लॉज हाऊसफुल्ल आहेत. आणीबाणीच्या स्थितीत थांबावे लागल्यास एका खोलीचे एका रात्रीचे भाडे ५ ते १० हजारांपर्यंत जात आहे. ५ बाय ३ चे टेंटही २ ते ६ हजारांत मिळत आहेत. दुसरीकडे, २१ किमी खाली असलेल्या गौरीकुंड व सोनप्रयागमध्येही अशीच स्थिती आहे. थांबण्यासाठी बजेटमधील जागा मिळण्यात अडचण येत आहे. एका भक्ताने म्हटले आहे की, केदारनाथ एका खोलीचे २० हजार रुपये मागत होते.

# मुख्यमंत्री योगींच्या निवासस्थानाला आज शिक्षक भरती उमेदवार घेराव घालणार

■ लखनौ

६९,००० शिक्षक भरतीच्या आरक्षणातील त्रुटीमुळे संतप्त झालेल्या राखीव प्रवर्गातील उमेदवार पुन्हा एकदा लखनौमध्ये आंदोलन करून मुख्यमंत्री योगी यांच्या निवासस्थानाला घेराव घालणार आहेत. या उमेदवारांचा आरोप आहे की, सरकार या प्रकरणात कोणताही पुढाकार घेत नसल्यामुळे हे प्रकरण लांबत चालले आहे. सर्वोच्च न्यायालयात पहिली सुनावणी सप्टेंबर २०२४ मध्ये झाली होती आणि तेव्हापासून तारखा पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

आंदोलक धनंजय गुप्ता आणि सुशील कश्यप यांनी सांगितले की, हा प्रश्न सोडवण्यासाठी सरकारच्या पुढाकाराच्या अभावामुळे संतप्त उमेदवार १८ मे रोजी आपल्या कुटुंबासह मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानाला घेराव घालतील. राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचा अहवाल, मुख्यमंत्र्यांनी स्थापन केलेल्या चौकशी समितीचा अहवाल आणि लखनौ उच्च न्यायालयाच्या द्विखंडपीठाचा निर्णय हे सर्व बाजूने तरीही आम्हाला न्याय मिळत नाही. सर्वोच्च न्यायालयात १९ मे रोजी सुनावणी होणार आहे. सरकारने न्यायालयात आपली भूमिका मांडलीच पाहिजे. जर सरकारने १९ मे रोजी आपली भूमिका स्पष्ट केली, तर या प्रकरणाचा लवकरच निपटारा होईल.

# आंध्रमध्ये तिसऱ्या अपत्यासाठी ३०, चौथ्यासाठी ४० हजार रुपये मिळणार

■ विजयवाडा

**राज्यात** लोकसंख्या वाढीसाठी आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी घोषणा केली. राज्यातील कुटुंबांना तिसऱ्या अपत्याच्या जन्मावर ३० हजार रुपये आणि चौथ्या अपत्याच्या जन्मावर ४० हजार रुपयांचे आर्थिक प्रोत्साहन दिले जाईल, असे त्यांनी जाहीर केले.

श्रीकाकुलम जिल्ह्यातील नरसन्नापेटा येथे आयोजित स्वर्ण आंध्र-स्वच्छ आंध्र कार्यक्रमात नायडू यांनी राज्यातील घटत्या लोकसंख्या वृद्धी दराबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली. मुलांना ओझे न समजता देशाची संपत्ती मानले पाहिजे, असे सांगत त्यांनी लोकसंख्या वाढीला प्रोत्साहन देण्यासाठी या नवीन आर्थिक मदतीची घोषणा केली. चंद्राबाबू नायडू म्हणाले की, त्यांनी या विषयावर अनेकदा विचार केला आहे. पूर्वी त्यांनी स्वतः कुटुंब नियोजनाच्या दिशेने काम केले होते. परंतु आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. आता मुले ही आपली संपत्ती असून आपल्याला त्यांच्या भविष्यासाठी काम करावे लागेल, याच विचारातून कुटुंबात तिसऱ्या मुलाच्या जन्मावर ३० हजार रुपये आणि चौथ्या मुलाच्या जन्मावर ४० हजार रुपये तातडीने दिले जातील.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

## देश विदेश


# ब्रिटनमध्ये मुलींचे लैंगिक शोषण भारतीय वंशाच्या इमामाला जन्मठेप

■ लंडन

**ब्रिटनमध्ये** भारतीय वंशाच्या माजी इमामाला मुली आणि महिलांच्या लैंगिक शोषणप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. अब्दुल हलीम खान असे आरोपीचे नाव असून, न्यायालयाने त्याला बलात्कार, अल्पवयीन मुलींवरील लैंगिक अत्याचार आणि लैंगिक शोषणाशी संबंधित २१ आरोपांमध्ये दोषी ठरवले आहे. ५४ वर्षीय आरोपीला किमान २० वर्षे तुरुंगवास भोगावा लागणार आहे.

आरोपी आपल्याकडे आध्यात्मिक शक्ती आहे, असा दावा करत असे. तो पीडित मुली आणि महिलांना आपल्या शरीरावर 'जिन्न' म्हणजे वाईट आत्म्याचा प्रभाव असल्याचे सांगत असे. याच बहाण्याने तो त्यांच्यावर लैंगिक अत्याचार करत असल्याचे तपासात उघडकीस आले आहे. या प्रकरणातील पीडितांमध्ये १२ वर्षांपर्यंतच्या अल्पवयीन मुलींचाही समावेश असल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपीने २००४ ते २०१५ या कालावधीत सात महिला आणि मुलींना लक्ष्य केले होते. तो पूर्व लंडनमधील मुस्लीम समुदायात इमाम म्हणून कार्यरत होता आणि धार्मिक पदाचा गैरफायदा घेत लोकांचा विश्वास संपादन करत होता.

आरोपी पीडितांना धमकावत असे की, त्यांनी हा प्रकार कोणाला सांगितल्यास त्यांच्या कुटुंबावर काळ्या जादूचा परिणाम होईल. या भीतीमुळे अनेक मुली आणि महिला वर्षानुवर्षे गप्प राहिल्या.



# पुतिन १९ ते २० मे रोजी चीनच्या दौऱ्यावर जाणार

■ मॉस्को

**अमेरिकेचे** राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या चीन दौऱ्यानंतर आता रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन देखील तेथे १९ ते २० मे रोजी जाणार आहे. ते राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्या निमंत्रणावरून चीनला जाणार आहेत.

यावर्षी पुतिन यांचा हा पहिला परदेश दौरा असेल. येथे ते चीनच्या राष्ट्राध्यक्षांशी युक्रेन युद्ध संपवण्याबाबत आणि अणुबॉम्ब नियंत्रण कराराबाबत चर्चा करू शकतात. याव्यतिरिक्त, ते चीनचे पंतप्रधान ली कियांग यांची स्वतंत्रपणे भेट घेतील. यात व्यापार आणि आर्थिक सहकार्यावर चर्चा होईल. ट्रम्प यांनी चीनच्या दौऱ्यानंतर सांगितले होते की, अमेरिका, रशिया आणि चीन यांच्यात संभाव्य त्रिपक्षीय अणुबॉम्ब नियंत्रण कराराचा प्रस्ताव ठेवला आहे. यावर तिन्ही देश चर्चा करू शकतात. पुतिन यांनीही अनेक वेळा आपल्या सुरुवातीच्या परदेश दौऱ्यांमध्ये चीनला प्राधान्य दिले आहे. दोन्ही नेत्यांनी सार्वजनिक मंचांवर एकमेकांना जवळचे मित्र आणि रणनीतिक भागीदार म्हटले आहे. दोन्ही नेत्यांमध्ये केवळ औपचारिक मुत्सद्देगिरीच नाही, तर सतत वैयक्तिक संवादही होत राहिला आहे. फेब्रुवारी २०२६ मध्ये झालेल्या व्हिडिओ बैठकीत शी जिनपिंग यांनी पुतिन यांना चीनला येण्याचे निमंत्रण दिले होते, जे पुतिन यांनी तत्काळ स्वीकारले.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींना स्वीडनचा सर्वोच्च सन्मान

■ स्टॉकहोम



**स्वीडनचे** पंतप्रधान उल्फ क्रिस्टरसन आणि युवराज्ञी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना स्वीडनचा प्रतिष्ठित 'रॉयल ऑर्डर ऑफ द पोलर स्टार' पुरस्काराने सन्मानित केले. त्यांचा हा ३१ वा आंतरराष्ट्रीय सन्मान आहे. गोटेबर्ग येथील काउंटी गव्हर्नरच्या निवासस्थानी आयोजित एका समारंभात मोदींना हा रॉयल ऑर्डर प्रदान करण्यात आला.

मोदी यांनी उल्फ क्रिस्टरसन यांच्यासोबत व्यापार, तंत्रज्ञान, संरक्षण आणि इतर प्रमुख क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करत व्यापक चर्चा केली. दोन दिवसांच्या दौऱ्यावर स्वीडनमध्ये दाखल झाल्यावर क्रिस्टरसन यांनी गोटेबर्ग विमानतळावर मोदींचे विशेष स्वागत केले. मोदींनी यापूर्वी २०१८ मध्ये पहिल्या भारत-नॉर्डिक शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी स्वीडनला भेट दिली होती. २०२५ पर्यंत दोन्ही देशांमधील व्यापार ७.७५ अब्ज अमेरिकी डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. चर्चेदरम्यान, दोन्ही बाजूंनी हरित संक्रमण, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), नवीन तंत्रज्ञान, स्टार्टअप्स, मजबूत पुरवठा साखळी, संरक्षण, अवकाश, हवामान बदल आणि लोकांमधील संबंध यांसारख्या क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय संबंध वाढवण्यावर लक्ष केंद्रित केले.



# आजचे राशी भविष्य

**सोमवार ता. १८ मे २०२६**
**ज्योतिष पंडीत शिरीष प्रभू**

| | |
|---|---|
| **मेष** | प्रसन्न दिवस. कष्टाचे फळ मिळेल. अनपेक्षित मार्गाने धनलाभाची शक्यता. |
| **वृषभ** | अनेक अडथळे पार केल्यानंतर सफलता मिळेल. ताणतणाव दूर ठेवा. तुमच्या शब्दांनी जोडीदार दुखावण्याची शक्यता. |
| **मिथुन** | मनोरंजनातून आनंद मिळेल. कामाच्या ठिकाणी वातावरण उत्साहवर्धक नसेल. अवघड कामे तुमच्या वाट्याला येतील. |
| **कर्क** | अनेक बाबतीत तडजोड करावी लागेल. महत्त्वाचे निर्णय लांबणीवर टाका. वाजवीपेक्षा जास्त खर्च होईल. |
| **सिंह** | फायदेशीर दिवस. शेजाऱ्यांचे सहकार्य लाभेल. दूरदेशातून आर्थिक लाभाचे योग. |
| **कन्या** | फायदेशीर संधी येईल. तिचा लाभ करून घ्या. तीर्थाटन लाभदायक ठरेल. अर्थप्राप्तीत वाढेल. |
| **तूळ** | वरिष्ठांशी मतभेदाची शक्यता. शांतचित्ताने परिस्थिती हाताळा. कामाचा ताण त्रस्तता वाढवेल. |
| **वृश्चिक** | मानसिक स्थिती गोंधळाची राहील. निर्णय चुकण्याची शक्यता. कामाचा ताण राहील. |
| **धनु** | नवीन फायदेशीर ओळखी होतील. प्रवासाचे योग आहेत. कष्टाचे चीज होईल. |
| **मकर** | दिवसाचे योग्य नियोजन आज अधिक महत्त्वाचे राहील. कौटुंबिक वाद होण्याचा संभव. जोडीदाराच्या तब्येतीकडे लक्ष द्या. |
| **कुंभ** | नियोजनबद्ध रीतीने कामे करा. चुका टाळा. तीर्थाटनाचे योग. दानधर्म समाधान देईल. |
| **मीन** | अडथळ्यांवर मात करता येईल. कष्ट वाढतील. जोडीदाराशी कठोर बोलणे कटाक्षाने टाळा. |

## महाराष्ट्र गजलक्ष्मी रवि विकली लॉटरी 4:45 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 20 • तिकीट कि. रु. 20/- • सोडत दिनांक 17/05/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- **GL-04 : 2934**

FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0530 | 0766 | 1102 | 3643 | 5997 | 8185 | 8715 | 8740 | 8887 | 9460 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0140 | 1115 | 3129 | 4845 | 7537 | 8028 | 8180 | 8727 | 8770 | 9523 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1871 | 2377 | 3090 | 3288 | 3480 | 4145 | 4244 | 5749 | 6207 | 9016 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 0495 | 1740 | 1939 | 2864 | 4054 | 4526 | 5620 | 5939 | 8607 | 9340 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1635 | 2302 | 3053 | 3536 | 4643 | 5514 | 6362 | 7397 | 8098 | 8815 |
| | | 1711 | 2339 | 3063 | 3606 | 4662 | 5519 | 6383 | 7406 | 8122 | 8859 |
| 0008 | 0620 | 1712 | 2367 | 3069 | 3632 | 4719 | 5521 | 6450 | 7432 | 8256 | 8868 |
| 0013 | 0759 | 1720 | 2372 | 3089 | 3893 | 4738 | 5553 | 6457 | 7474 | 8268 | 8914 |
| 0082 | 0828 | 1730 | 2423 | 3183 | 3906 | 4754 | 5584 | 6469 | 7527 | 8282 | 8957 |
| 0099 | 0890 | 1739 | 2447 | 3204 | 3963 | 4780 | 5594 | 6475 | 7541 | 8288 | 9096 |
| 0144 | 0908 | 1751 | 2462 | 3213 | 4052 | 4796 | 5659 | 6492 | 7590 | 8300 | 9192 |
| 0147 | 1119 | 1791 | 2482 | 3250 | 4064 | 4821 | 5682 | 6496 | 7653 | 8388 | 9241 |
| 0160 | 1123 | 1799 | 2492 | 3252 | 4120 | 4910 | 5689 | 6547 | 7656 | 8389 | 9269 |
| 0175 | 1166 | 1820 | 2525 | 3307 | 4207 | 5035 | 5719 | 6605 | 7733 | 8405 | 9273 |
| 0181 | 1178 | 1914 | 2548 | 3330 | 4366 | 5064 | 5809 | 6622 | 7744 | 8487 | 9301 |
| 0182 | 1186 | 2012 | 2555 | 3332 | 4401 | 5110 | 5828 | 6654 | 7746 | 8489 | 9309 |
| 0247 | 1215 | 2075 | 2702 | 3335 | 4412 | 5126 | 5880 | 6824 | 7772 | 8497 | 9345 |
| 0294 | 1239 | 2088 | 2812 | 3338 | 4444 | 5206 | 5903 | 6855 | 7780 | 8500 | 9385 |
| 0339 | 1247 | 2141 | 2817 | 3359 | 4446 | 5258 | 5958 | 6868 | 7782 | 8579 | 9546 |
| 0361 | 1271 | 2220 | 2819 | 3360 | 4447 | 5324 | 5986 | 6888 | 7787 | 8658 | 9598 |
| 0380 | 1379 | 2243 | 2832 | 3366 | 4473 | 5356 | 6043 | 6975 | 7810 | 8679 | 9661 |
| 0437 | 1401 | 2245 | 2844 | 3370 | 4486 | 5416 | 6046 | 7050 | 7873 | 8682 | 9740 |
| 0458 | 1471 | 2251 | 2881 | 3386 | 4503 | 5428 | 6196 | 7137 | 7967 | 8702 | 9785 |
| 0593 | 1483 | 2252 | 2982 | 3387 | 4518 | 5454 | 6265 | 7180 | 8021 | 8720 | 9907 |
| 0605 | 1573 | 2269 | 3033 | 3388 | 4532 | 5458 | 6266 | 7257 | 8028 | 8724 | 9947 |
| 0607 | 1621 | 2277 | 3040 | 3435 | 4560 | 5503 | 6269 | 7306 | 8065 | 8787 | 9975 |

## गणेशलक्ष्मी वैभव विकली लॉटरी 5:00 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 20 • तिकीट कि. रु. 10/- • सोडत दिनांक 17/05/2026

पहिले बक्षिस रु. 10000/- **MG-04 : 1892**

FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

दुसरे बक्षिस रु. 5000/- **3976**

तिसरे बक्षिस रु. 2000/- **3050**

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0856 | 1192 | 2428 | 2595 | 4181 | 5693 | 6131 | 6477 | 6720 | 6866 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0068 | 2415 | 2889 | 6239 | 6253 | 6351 | 6524 | 6843 | 8899 | 9090 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0340 | 0474 | 1394 | 2159 | 2178 | 4553 | 7769 | 8245 | 8452 | 9829 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1441 | 2429 | 3529 | 4363 | 5395 | 6201 | 7119 | 8479 | 9131 |
| | | 1452 | 2557 | 3550 | 4424 | 5445 | 6270 | 7157 | 8543 | 9149 |
| | | 1520 | 2570 | 3631 | 4455 | 5459 | 6301 | 7257 | 8551 | 9339 |
| 0006 | 0890 | 1625 | 2608 | 3660 | 4456 | 5555 | 6306 | 7473 | 8555 | 9348 |
| 0043 | 0902 | 1631 | 2722 | 3754 | 4459 | 5584 | 6309 | 7567 | 8584 | 9369 |
| 0090 | 0906 | 1636 | 2769 | 3777 | 4496 | 5595 | 6330 | 7707 | 8692 | 9380 |
| 0103 | 0908 | 1670 | 2822 | 3783 | 4522 | 5596 | 6375 | 7715 | 8716 | 9392 |
| 0112 | 0932 | 1721 | 2932 | 3863 | 4524 | 5597 | 6392 | 7755 | 8733 | 9407 |
| 0270 | 1001 | 1741 | 3037 | 3907 | 4559 | 5655 | 6541 | 7762 | 8758 | 9448 |
| 0415 | 1061 | 1774 | 3047 | 3971 | 4705 | 5665 | 6547 | 7769 | 8782 | 9569 |
| 0444 | 1074 | 1808 | 3051 | 4028 | 4814 | 5675 | 6641 | 7775 | 8784 | 9681 |
| 0471 | 1083 | 1846 | 3119 | 4054 | 4841 | 5692 | 6661 | 7856 | 8805 | 9692 |
| 0496 | 1127 | 1858 | 3132 | 4199 | 5035 | 5711 | 6671 | 7876 | 8828 | 9698 |
| 0536 | 1181 | 2082 | 3135 | 4204 | 5194 | 5810 | 6740 | 7937 | 8832 | 9699 |
| 0580 | 1217 | 2083 | 3143 | 4212 | 5195 | 5835 | 6763 | 8066 | 8858 | 9766 |
| 0610 | 1227 | 2189 | 3151 | 4230 | 5246 | 5920 | 6858 | 8072 | 8882 | 9769 |
| 0624 | 1362 | 2214 | 3197 | 4232 | 5263 | 5966 | 6866 | 8084 | 8981 | 9778 |
| 0793 | 1382 | 2223 | 3239 | 4245 | 5289 | 6038 | 6869 | 8383 | 9008 | 9805 |
| 0835 | 1403 | 2240 | 3307 | 4280 | 5290 | 6043 | 7030 | 8429 | 9034 | 9893 |
| 0864 | 1410 | 2291 | 3322 | 4344 | 5377 | 6121 | 7037 | 8439 | 9058 | 9948 |
| 0866 | 1414 | 2304 | 3349 | 4353 | 5385 | 6154 | 7073 | 8448 | 9117 | 9967 |

## महाराष्ट्र मोहिनी विकली लॉटरी 4:30 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 20 • तिकीट कि. रु. 15/- • सोडत दिनांक 17/05/2026

पहिले बक्षिस रु. 10000/- **MO-02 : 8057** डायमंड कॉर्पोरेशन, बोरिवली

FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1660 | 2441 | 2807 | 2956 | 3317 | 4056 | 5230 | 5269 | 6155 | 9904 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0135 | 1374 | 2638 | 3104 | 3271 | 5560 | 5841 | 7965 | 8599 | 8812 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0111 | 2786 | 2973 | 3196 | 5346 | 7554 | 8139 | 8312 | 8488 | 9065 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0710 | 1977 | 3315 | 3933 | 5347 | 6799 | 7686 | 8866 |
| | 0839 | 2002 | 3330 | 3963 | 5412 | 6904 | 7751 | 8881 |
| 0035 | 0890 | 2223 | 3332 | 4005 | 5540 | 6942 | 7790 | 8886 |
| 0037 | 1148 | 2254 | 3373 | 4118 | 5634 | 6974 | 7792 | 8915 |
| 0044 | 1214 | 2412 | 3388 | 4204 | 5789 | 7109 | 7797 | 9036 |
| 0083 | 1410 | 2420 | 3395 | 4447 | 5795 | 7143 | 7911 | 9279 |
| 0091 | 1416 | 2531 | 3542 | 4482 | 5850 | 7278 | 8046 | 9526 |
| 0317 | 1517 | 2558 | 3688 | 4663 | 6003 | 7367 | 8067 | 9577 |
| 0324 | 1632 | 2822 | 3742 | 4804 | 6096 | 7420 | 8160 | 9824 |
| 0341 | 1659 | 3128 | 3774 | 4824 | 6201 | 7427 | 8198 | 9906 |
| 0379 | 1811 | 3130 | 3833 | 4946 | 6464 | 7458 | 8343 | 9919 |
| 0474 | 1901 | 3234 | 3839 | 5159 | 6516 | 7529 | 8481 | 9922 |
| 0501 | 1960 | 3239 | 3841 | 5281 | 6760 | 7673 | 8724 | 9968 |

## शुभ राशी ता. १८/५/२०२६

| | | |
|---|---|---|
| २ | ७ | ० |
| २३ | ७० | ०५ |
| २९ | ७३ | ०१ |
| २३७ | २५० | ५६९ |
| ५७० | ३७८ | ५५० |

# लातूरमध्ये एसटीचा अपघात! ८ जखमी

■ लातूर

**लातूर** जिल्ह्यातील अहमदपूर-नागठाणा मार्गावर आज सकाळी राज्य परिवहन महामंडळाच्या बसचा अपघात झाला. प्रवाशांनी भरलेली एसटी बस रस्त्याच्या कडेला उलटली. या अपघातात बसमधील आठ प्रवासी जखमी झाले असून, त्यांच्यावर अहमदपूर येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अपघातग्रस्त बसमध्ये सुमारे ३५ प्रवासी प्रवास करत होते. बस अहमदपूरहून नागठाण्याकडे जात असताना हा अपघात झाला. बस पलटी होताच प्रवाशांमध्ये एकच गोंधळ उडाला. काही प्रवासी बसमध्ये अडकून पडले होते.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. जखमी प्रवाशांना बाहेर काढून रुग्णवाहिकांच्या मदतीने अहमदपूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. काही प्रवाशांना किरकोळ दुखापत झाली असून, सात ते आठ जण जखमी झाले.

# कोकण किनारपट्टीवर आजपासून तीन दिवस वादळी पावसाचा इशारा

■ रत्नागिरी


**कोकण** किनारपट्टीवर उद्यापासून पुढील तीन दिवस वादळी पावसाचा इशारा हवामान खात्याकडून देण्यात आला आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्गसह संपूर्ण कोकण पट्ट्यात विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस आणि वादळी वाऱ्यांचा फटका बसण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात आज सकाळपासूनच ढगाळ वातावरण होते. मधूनमधून हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडत होता. अंदमानात मान्सून दाखल झाला असला तरी राज्यात पोहोचण्यासाठी अजून काही दिवसांचा अवधी आहे. मात्र, कोकणात सध्या पावसाळी वातावरण निर्माण झाले आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, पुढील तीन दिवस कोकण किनारपट्टीवर ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. यासोबतच काही ठिकाणी मुसळधार पावसाचाही अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. प्रशासनाने कोकण किनारपट्टीसाठी येलो अलर्ट जारी केला.

**बिल गेट्स आणि जेफ बेझॉस फिके पडतील इतका पैसा जगत शेठकडे होता.. पण मग कुठे आणि काय चुकलं? अफाट संपत्ती असलेली अनेक भारतीय कुटुंबं पूर्वी भारतात नांदत होती. त्यापैकीच एक म्हणजे जगत शेठ! शेठ कुटुंब जगातल्या सर्वाधिक श्रीमंत कुटुंबांपैकी एक म्हणून गणलं जात होतं.जगत शेठ यांचं मूळ नाव शेठ फतेहचंद होतं.**

# जगत शेठची श्रीमंती





फतेहचंद यांना 'जगत शेठ' ही उपाधी मुगल बादशाह मोहम्मद शाह याने १७२३ मध्ये दिली. त्यानंतर समाजातली त्यांची ओळख बदलली. त्यांच्या कुटुंबाला लोक जगत शेठचं कुटुंब म्हणून ओळखू लागले. अठराव्या शतकाच्या सुरुवातीला बंगालमधल्या अत्यंत श्रीमंत बँकर म्हणून प्रसिद्ध असलेल्या जगत शेठ यांना जगाचे बँकर म्हणून नावलौकिक मिळाला. जगत शेठ मेहताब राय यांचे पूर्वज मारवाडचे रहिवासी असल्याचे लोक मानतात. १६५२ मध्ये या कुटुंबातल्या हिरानंद साहू यांनी मारवाड सोडून पाटण्याची वाट धरली.

जगत शेठ यांची श्रीमंती समजण्यासाठी आपल्याला काही गोष्टी समजून घ्याव्या लागतील. काही उपलब्ध स्त्रोतांनुसार १७२० च्या सुमारास जगत शेठची संपत्ती ही तत्कालीन ब्रिटिश अर्थव्यवस्थेपेक्षाही अधिक होती. आजच्या हिशोबाने बोलायचं तर त्यांची एकूण मालमत्ता ९९ लाख कोटी रुपये किंवा त्यापेक्षा जास्त होती. ब्रिटिश कागदपत्रांनुसार त्या काळच्या सगळ्या ब्रिटिश बँकांमधील संपत्ती एकत्र केली तरी ती संपत्तीदेखील जगत शेठच्या संपत्तीपेक्षा कमीच होती. पण मुळात त्यांच्याकडे एवढी संपत्ती कुठून आली?

हिराचंदचा मुलगा माणिकचंद साहू याची बंगालचा पहिला नवाब मुर्शिद कुलीखान याच्याशी मैत्री होती. साहू किंवा शेठ कुटुंबाची स्वातंत्र्यपूर्व भारतातल्या प्रत्येक महत्त्वाच्या शहरात कार्यालयं होती आणि ही सगळी कार्यालयं आधुनिक बँकांच्या अतिशय जवळची होती. शिवाय विविध शहरांमधले व्यवहार पार पाडण्यासाठी त्यांच्याकडे संदेशवहन करणारी यंत्रणाही होती. परिणामी नवाब आणि ब्रिटिशांनीही एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पैसा पाठवण्यासाठी साहूंच्या या यंत्रणेची मदत घ्यायला सुरुवात केली. याच्या जोडीला देशातील छोट्या राजसत्तांविरोधात पोर्तुगीज, ब्रिटिश, फ्रेंच लोकांना आर्थिक सहाय्य करूनही त्यांनी बरंच उत्पन्न मिळवलं.

या परिवाराचा शेवटचा काही काळ मात्र काहीसा विचित्र गेला. अनेक भारतीय राजे आणि ब्रिटिशांशी त्यांचे छुपे व्यवहार होते. त्यातूनच मीर कासीम याने १७६४ मध्ये झालेल्या बक्सरच्या लढाईच्या तोंडावर मेहताब राय आणि त्याचा भाऊ स्वरूपचंद यांचं अपहरण केलं. नंतर त्याने त्यांच्यावर देशद्रोहाचा आरोप ठेवून त्यांना गोळी मारून ठार केलं. मृत्यूसमयी मेहताब राय जगातला सर्वात श्रीमंत माणूस होता. या दोघांनी प्लासीच्या लढाईत दोन दगडांवर पाय ठेवला. एकीकडे त्यांनी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीला समर्थन दिलं, तर दुसरीकडे नवाबाच्या लष्कराला पैसा पुरवला. पण नवाबाला त्यांनी ब्रिटिशांविरोधात रणनीती वगैरे आखण्यात मदत केली नाही.

मेहताब राय आणि स्वरूपचंद यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या राज्याचे छोटे छोटे तुकडे झाले. त्यांच्या स्वतःच्या मालकीच्या बऱ्याचशा जमिनीवरचा ताबा त्यांनी गमावला. दुसरीकडे ईस्ट इंडिया कंपनीने त्यांच्याकडून घेतलेली कर्जाची रक्कमही त्यांना परत मिळाली नाही. १८५७ च्या उठावाने त्यांचं कंबरडं मोडलं.

१९०० पर्यंत हे साम्राज्य लयाला गेलं. त्यांच्या खुणाही हळूहळू पुसल्या गेल्या. जनतेच्या नजरेतून सगळा परिवारच कुठे नाहीसा झाला. मुगलांप्रमाणेच त्यांचे वंशज आजही अज्ञात आहेत. ते कुठे असतात, काय करतात हे कोणालाही माहिती नाही. हजारदुआरी म्हणजे १००० दरवाजे असलेला महालजवळ असलेलं शेठ यांचं निवासस्थान आता एक संग्रहालय बनलं आहे.

हव्यासापोटी, आपलं भलं करण्याच्या नादात दोन्ही दगडांवर पाय ठेवायला गेले नसते तर शेठ कुटुंबाचं चित्र कदाचित वेगळं दिसलं असतं... कुणी सांगावं?



## आनंद परांजपे यांची शरद पवारांशी भेट


■ मुंबई

**उपमुख्यमंत्री** एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत नुकताच प्रवेश केलेले माजी खासदार आनंद परांजपे यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची सिल्व्हर ओक या निवासस्थानी भेट घेतली.

शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर परांजपे यांची ही पहिलीच भेट असल्याने विविध राजकीय तर्क-वितर्कांना सुरुवात झाली. या भेटीमागे कोणताही राजकीय हेतू नसून ही केवळ वैयक्तिक भेट असल्याचे स्पष्टीकरण आनंद परांजपे यांनी दिले आहे.

## केंद्र सरकारचे नवे पॅकेज हज यात्रा ४० ऐवजी २० दिवसांत

■ कोची



**केंद्र** सरकारने भारतीय हज यात्रेकरूंसाठी ४० ऐवजी २० दिवसांचे लघू हज पॅकेज सुरू करण्याची घोषणा केली. यात सर्व आवश्यक धार्मिक विधी मात्र कायम ठेवले जाणार आहेत.

केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार राज्यमंत्री जॉर्ज कुरियन यांच्या कार्यालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, व्यवसाय आणि व्यावसायिक क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक यात्रेकरूंना हजला जाताना ४० ते ४५ दिवस कामापासून दूर राहणे कठीण जात आहे. त्यांच्या विनंतीवरून कमी दिवसांची योजना सुरू करण्यात आली आहे. या नव्या व्यवस्थेनुसार यात्रेकरूंना हजचे सर्व धार्मिक विधी पूर्ण करून साधारण २० दिवसांत परतता येणार आहे. या विशेष योजनेअंतर्गत सुमारे १० हजार यात्रेकरू हज यात्रेला जाणार आहेत. विशेषतः नोकरदार आणि व्यावसायिक यात्रेकरूंनी मुख्य हज विधी पूर्ण झाल्यानंतर लवकर परतण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. त्या पार्श्वभूमीवर प्रथमच हज २०२६ साठी लघु हज पॅकेज सुरू करण्यात आले आहे. या श्रेणीअंतर्गत यात्रेकरूंना सौदी अरेबियामध्ये साधारण २० दिवस राहावे लागेल, तर पारंपरिक हज यात्रेचा कालावधी ४० ते ४५ दिवसांचा असतो.

## सरकारी जप्तीच्या आधी बँक मालमत्ता विकू शकते

**उच्च न्यायालयाचा मोठा निर्णय**

■ मुंबई

**जर** एखाद्या कंपनीने बँकेचे कर्ज बुडवले, तर सरकारी जप्तीआधी बँकेला त्या कंपनीची मालमत्ता विकून आपले पैसे वसूल करण्याचा पहिला अधिकार आहे, असा महत्त्वपूर्ण निकाल उच्च न्यायालयाने एका प्रकरणात दिला. न्या. ए. एस. गडकरी आणि न्या. कमल खाता यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.

मालमत्ता आधी बँकेकडे अधिकृतपणे गहाण ठेवली होती. त्यामुळे ती विकून आपले पैसे वसूल करण्याचा पहिला हक्क बँकेचाच आहे, असे न्यायालयाने नमूद केले. अपीलकर्त्या बँकेने २००९ ते २०१२ दरम्यान एका कंपनीला मोठे कर्ज दिले होते. त्या बदल्यात कंपनीने आपली मालमत्ता बँकेकडे गहाण (तारण) ठेवली होती. कंपनीने बँकेचे पैसे परत केले नाहीत. २०२३ पर्यंत



या कंपनीवर बँकेचे तब्बल १८३.३८ कोटी रुपये बाकी होते. याच काळात ही कंपनी 'एनएसईएल' घोटाळ्यात अडकली. त्यामुळे राज्य सरकारने घोटाळ्यातील पीडित गुंतवणूकदारांचे पैसे परत करण्यासाठी याच मालमत्ता जप्त केल्या. नंतर मुंबईतील विशेष एमपीआयडी न्यायालयाने बँकेचा लिलाव आणि विक्रीचा अर्ज फेटाळला होता. एमपीआयडी कायदा हा केंद्रीय कायद्यापेक्षा वरचढ ठरेल, असा निष्कर्ष कनिष्ठ न्यायालयाने काढला होता. त्या निर्णयाला आव्हान देत बँकेने उच्च न्यायालयात अपील दाखल केले होते. त्यावर न्यायमूर्ती ए. एस. गडकरी आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठाने निर्णय दिला.

खंडपीठाने विशेष न्यायालयाचा तो निर्णय रद्द केला आणि बँकेच्या बाजूने निकाल दिला. बँकेत असलेला पैसा हा सर्वसामान्य जनतेचा असतो. त्यामुळे खासगी व्यापाऱ्यांपेक्षा बँकेचा पैसा वाचवणे जास्त महत्त्वाचे आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

## वसईत एटीएममधून पैशांचा पाऊस १०० रुपयांऐवजी ५०० रुपये निघाले

■ वसई

**वसईमध्ये** रविवारी पैशांचा पाऊस पडणाऱ्या एटीएममुळे खळबळ उडाली. या एटीएममध्ये ग्राहकांनी रकमेचा आकडा टाकल्यावर ५ पटीने पैसे निघत होते. वसई पूर्वेच्या गोलानी नाका परिसरातील हिताची कंपनीचे एटीएम केंद्र आहे. शनिवारी रात्री एका एका ग्राहकाने पैसे काढण्यासाठी एटीएममध्ये कार्ड टाकले. मात्र १०० रुपये ऐवजी मशीनमधून थेट ५०० रुपयांची नोट बाहेर आली. त्याच्या खात्यातून फक्त १०० रुपये वजा झाले होते. मागितलेल्या रकमेपेक्षा कितीतरी पटीने जास्त पैसे मिळत असून, खात्यातून मात्र मूळ रक्कमच वजा व्हायचे. एका ग्राहकाने याबाबत व्हिडिओ काढून शेअर केला. एटीएममधील तांत्रिक बिघाडामुळे हा घोळ झाला होता. आर्थिक गैरव्यवहार होण्याची शक्यता लक्षात घेऊन स्थानिक पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करत एटीएममधून व्यवहार बंद केले.

## परशुराम घाटातील बंद मार्गिका दोन दिवसांत वाहतुकीसाठी खुली

■ चिपळूण

**मुंबई-गोवा** महामार्गावरून कोकणात ये-जा करणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. चिपळूणजवळील परशुराम घाटातील बंद असलेली महामार्गाची एक मार्गिका पुढील दोन दिवसांत वाहतुकीसाठी खुली करण्यात येणार आहे. घाटाच्या सुरक्षेसाठी उभारण्यात आलेल्या गॅबियन भिंतीच्या दुरुस्तीचे काम अखेर पूर्ण झाले असून, सध्या रस्त्यावरील साफसफाई आणि भेगा भरण्याचे अंतिम काम युद्धपातळीवर सुरू आहे. गेल्या वर्षी पावसाळ्यात घाट परिसरातील गॅबियन भिंत कोसळली होती. महामार्गालाही तडे गेल्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तव प्रशासनाने एक मार्गिका बंद ठेवली होती. त्यामुळे गेल्या अनेक महिन्यांपासून वाहनचालकांना वाहतूक कोंडी आणि संथ प्रवासाचा त्रास सहन करावा लागत होता.

## खुल्या जागेतील बकऱ्यांच्या कत्तलीवर कारवाई करा

**सोमय्यांची मागणी**

■ मुंबई

**बकरी** ईदच्या पार्श्वभूमीवर मुंबईत सोसायट्या, चाळी तसेच खुल्या जागांमध्ये होणाऱ्या बकऱ्यांच्या कत्तलींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी भाजपा नेते आणि माजी खासदार डॉ. किरीट सोमय्या यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुंबईच्या महापौर रितू तावडे यांना पत्र लिहून प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी विनंती केली आहे.

सोमय्या यांनी पत्रात नमूद केले आहे की, बकरी ईद तसेच इतर प्रसंगी काही ठिकाणी नियमबाह्य पद्धतीने उघड्यावर बकऱ्यांची कत्तल केली जाते. महानगरपालिका तसेच न्यायालयाने याबाबत वेळोवेळी निर्बंध घालूनही काही ठिकाणी या नियमांचे उल्लंघन होत आहे. मुंबईतील कोणत्याही निवासी परिसराच्या किंवा वस्तीच्या जवळ बकऱ्यांचे बलिदान किंवा कत्तल करण्यास कायद्याने परवानगी नाही. त्यामुळे अधिकाऱ्यांना कठोर सूचना देऊन नियमांचे काटेकोर पालन सुनिश्चित करावे.

## नाशिक पालिकेची २० मेची महासभा ऑनलाईन होणार

■ नाशिक



**नाशिक** महापालिकेची मे महिन्यातील सर्वसाधारण महासभा २० मे बुधवारी दुपारी ३ वाजता आयोजित केली आहे. ही सभा व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे महापौरांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे. या महासभेत एकूण पाच महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा करून निर्णय घेतले जाणार आहेत.

यामधील सर्वात महत्त्वाचा प्रस्ताव आगामी सिंहस्थ कुंभमेळासाठी २०२६-२७ च्या पायाभूत आराखड्यासंदर्भात आहे. या अंतर्गत नवीन विद्युत उपकेंद्रासाठी विकास आराखड्यानुसार जागा उपलब्ध करून देण्याबाबत निर्णय अपेक्षित आहे. यासोबतच, महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ अंतर्गत महापालिकेच्या 'वृक्ष प्राधिकरण समिती' वरील सदस्यांची नियुक्ती करण्यावर शिक्कामोर्तब केले जाणार आहे. शहरातील विकासकामे, वृक्षतोड आणि पुनर्रोपणासंबंधी निर्णय घेण्याचे अधिकार या समितीकडे असल्याने या नियुक्त्यांकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. सभेत २० फेब्रुवारी रोजी झालेल्या महासभेचे इतिवृत्त मंजूर करण्यात येईल. तसेच महापालिकेच्या मालकीच्या जागा भाडेकराराने देण्याच्या प्रस्तावांवरही चर्चा होणार आहे. यात नाशिकरोड विभागातील देवळाली येथील मनपाची मालमत्ता 'नागरिक अभिनव वाचनालय' या संस्थेला भाडेतत्त्वावर देण्याचा प्रस्ताव मांडला जाणार आहे.

## परळीमध्ये अपमान सहन न झाल्याने तरुणाची आत्महत्या

■ बीड

**परळी** तालुक्यातील मोहा परिसरात सार्वजनिक ठिकाणी झालेला अपमान सहन न होऊन एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. चंद्रहार राजेभाऊ शिंदे असे त्याचे नाव आहे.


दुपारी दोनच्या सुमारास मोहा येथील करेवाडी रोडवरील लाल माती परिसरात गावातीलच एका तरुणीने चंद्रहारला सर्वांसमक्ष कानाखाली मारली. भररस्त्यात घडलेल्या या प्रकारामुळे चंद्रहार प्रचंड खचला. घटनेनंतर तो अस्वस्थ झाल्याचे स्थानिकांनी सांगितले. सार्वजनिक ठिकाणी झालेल्या या अपमानाचा मानसिक धक्का त्याला सहन झाला नाही. आत्महत्येपूर्वी चंद्रहारने आपल्या वडिलांना फोन करून, हा माझा शेवटचा फोन आहे, यापुढे माझा फोन येणार नाही, असे भावनिक शब्द उच्चारले. त्यानंतर त्याने मोबाईल बंद केला. मुलाचा संपर्क तुटल्याने कुटुंबियांनी त्याचा शोध सुरू केला. करेवाडी शिवारातील मुंगळ्याचा माळ येथे एका लिंबाच्या झाडाला सुती दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत चंद्रहार आढळून आला.

## त्रिवेंद्रम राजधानी एक्स्प्रेसला आग ! सर्व प्रवासी सुरक्षित

■ रतलाम

**तिरुवनंतपूरम-हजरत** निजामुद्दीन राजधानी एक्स्प्रेसच्या एसी डब्याला मध्य प्रदेशातील रतलाम जिल्ह्यात आग लागली. आज पहाटे या घटनेमुळे ट्रेनमधील प्रवाशांमध्ये भीती आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

ट्रेन क्रमांक १२४३१ ही राजधानी एक्स्प्रेस दिल्लीकडे जात असताना पहाटे सुमारे ५.१५ वाजता पश्चिम मध्य रेल्वेच्या कोटा विभागातील लुनी रिच्छा आणि विक्रमगढ अलोट स्थानकांदरम्यान बी-१ एसी डब्यात आग लागली. काही वेळातच आगीने इतर दोन डब्यांनाही वेढले.



घटनेची माहिती मिळताच रेल्वे प्रशासन आणि कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. आग लागलेल्या डब्यातील सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे खाली उतरवण्यात आले. या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा दुखापत झालेली नाही. पश्चिम मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी हर्षित श्रीवास्तव यांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनेनंतर तत्काळ ओव्हरहेड वायरचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला. तसेच आग लागलेला बी-१ डबा ट्रेनपासून वेगळा करण्यात आला.आग आटोक्यात आणल्यानंतर सकाळी सुमारे ९.४८ वाजता ही ट्रेन डिझेल इंजिनच्या सहाय्याने विक्रमगढ अलोट स्थानकाकडे रवाना करण्यात आली.



शिवडी-वरळी उन्नत मार्ग उभारणीसाठी प्रभादेवी येथील हाजी नूरानी चाळ पाडण्याच्या कामास सुरुवात झाली आहे.

## भारत-नेपाळ सीमेवरील १०० नेपाळी रुपयांच्या शुल्क नियमाला स्थगिती

■ काठमांडू

**भारत-नेपाळ** सीमेवरून ये-जा करणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना नेपाळच्या सर्वोच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. भारतातून नेपाळमध्ये आणल्या जाणाऱ्या सामानावर लागू करण्यात आलेल्या १०० नेपाळी रुपयांच्या सीमा शुल्क नियमाला न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिली आहे.

नेपाळ सरकारने अलीकडेच असा नियम लागू केला होता की, भारतातून वैयक्तिक वापरासाठी नेपाळमध्ये आणल्या जाणाऱ्या सामानाची किंमत १०० नेपाळी रुपयांपेक्षा जास्त असल्यास त्यावर सीमा शुल्क भरणे बंधनकारक राहील. भारतीय चलनानुसार ही रक्कम सुमारे ६२ रुपयांच्या आसपास आहे. या निर्णयामुळे सीमावर्ती भागातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती. नेपाळच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती हरी प्रसाद फुयाल आणि टेक प्रसाद ढुंगाना यांच्या संयुक्त खंडपीठाने पुढील आदेश येईपर्यंत या नियमाची अंमलबजावणी न करण्याचे निर्देश दिले आहेत. न्यायालयाने पंतप्रधान कार्यालय, मंत्रिपरिषद, वित्त मंत्रालय आणि संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत आदेश जारी केले आहेत.

## कळमनुरीत प्रज्ञा सातवांचे भावी मंत्रीचे बॅनर चर्चेत

■ हिंगोली

**काँग्रेसला** सोडचिठ्ठी देत भाजपामध्ये प्रवेश केलेल्या आणि नुकत्याच विधान परिषदेवर आमदार म्हणून संधी मिळालेल्या प्रज्ञा सातव यांच्या स्वागतासाठी कळमनुरी शहरात ठिकठिकाणी मोठे बॅनर झळकले आहेत. या बॅनरवरील भावी मंत्री या उल्लेखामुळे जिल्ह्यात राजकीय चर्चांना उधाण आले आहे. विधान परिषदेवर निवड झाल्यानंतर प्रथमच कळमनुरी दौऱ्यावर येणाऱ्या प्रज्ञा सातव यांच्या स्वागतासाठी कार्यकर्त्यांनी जोरदार तयारी केली असून, शहरभर स्वागताचे फलक लावण्यात आले आहेत. हिंगोली जिल्ह्याला मंत्रिपद द्या आणि भावी मंत्री प्रज्ञा सातव असे संदेश या बॅनरवर झळकले आहेत. हिंगोली जिल्ह्याला गेल्या अनेक वर्षांपासून मंत्रिपदाची संधी मिळालेली नसल्याने जिल्ह्याच्या विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी आता प्रज्ञा सातव यांच्या रूपाने मंत्रिपद मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## 'वन नेशन, वन इलेक्शन'ला भाजपाचा पाठिंबा! काँग्रेसचा विरोध

■ बंगळुरू

**'वन नेशन,** वन इलेक्शन' या प्रस्तावावर बंगळुरूमध्ये आयोजित केलेल्या संयुक्त संसदीय समितीच्या सल्लामसलत बैठकीत सत्ताधारी काँग्रेस आणि विरोधी भाजपा-जद (धर्मनिरपेक्ष) यांच्यात तीव्र मतभेद स्पष्ट झाले. भाजपा आणि जद (धर्मनिरपेक्ष)ने लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाच वेळी घेण्याच्या प्रस्तावाला पाठिंबा दिला, तर काँग्रेसने हा प्रस्ताव संघराज्य पद्धतीला धक्का देणारा आणि प्रादेशिक पक्षांना कमकुवत करणारा असल्याचा आरोप केला.

कर्नाटकमध्ये उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी या बैठकीत प्रस्तावाला स्पष्ट विरोध दर्शवला आणि कर्नाटक विधानसभेने या योजनेविरोधात केलेल्या ठरावाची प्रत समितीकडे सादर केली. शिवकुमार यांनी हा उपक्रम राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा आरोप करत केंद्र सरकारला फायदा मिळवण्यासाठी हा प्रयत्न केला जात असल्याचे म्हटले. तसेच, वेगवेगळ्या राज्यांच्या निवडणुका वेगवेगळ्या वेळेला होत असताना त्या एकत्र कशा करता येतील? जर एखादे सरकार मध्यावधीतच बहुमत गमावले तर काय होईल? असा सवाल त्यांनी केला. भाजपाच्या कर्नाटक युनिटचे अध्यक्ष बी. वाय. विजयेंद्र यांनी मात्र या प्रस्तावाला पाठिंबा देत यामुळे निवडणूक खर्च कमी होईल आणि प्रशासनातील अडथळे कमी होतील असे मत मांडले. पक्षाने या संदर्भात समितीकडे निवेदनही सादर केले. संयुक्त संसदीय समितीचे अध्यक्ष पी. पी. चौधरी या प्रस्तावाचे समर्थन करताना म्हणाले की, वारंवार निवडणुकांमुळे देशावर आर्थिक आणि प्रशासकीय भार पडतो. शाळा मतदान केंद्रांसाठी वापरल्या जातात आणि शिक्षक निवडणूक कामात गुंततात, त्यामुळे प्रशासन आणि विकासकामांवर परिणाम होतो.

## वांद्र्यातील राज्य महिला आयोगाचे कार्यालय वडाळा अँण्टॉप हिल येथे

■ मुंबई

**वांद्र्याच्या** म्हाडा भवनाच्या पोटमजल्यावर असलेले महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचे कार्यालय वडाळा अँण्टॉप हिल या परिसरात हलविण्यात येणार असल्याची चर्चा कर्मचाऱ्यांमध्ये सुरू आहे.

गेले अनेक वर्षांपासून राज्य महिला आयोगाचे कार्यालय भाडेतत्त्वावर आहे. म्हाडा प्राधिकरणाला दरमहा हजारो रुपयांचे भाडे आयोगाकडून अदा केले जात आहे, असे सांगून काही कर्मचारी म्हणाले, कार्यालयाची जागा कामकाजासाठी अपुरी पडते. यासाठी चर्चगेट येथील एअर इंडिया बिल्डिंगमध्ये प्रशस्त जागा मिळावी, अशी शासनस्तरावर मागणी आयोगाने केली होती. सातत्याने या जागेसाठी बैठका घेण्यात आल्या होत्या. शासनाने आता हा निर्णय फिरवत वडाळा अँण्टॉप हिल येथे राज्य महिला आयोगाच्या कार्यालयासाठी जागा देणार असल्याचे सांगण्यात येते. महिलांसाठी शासनाकडून सामाजिक व आर्थिक उपक्रम राबविले जातात, अशी कार्यालये एका छताखाली आणण्यासाठी अँण्टॉप हिलमध्ये भाडेतत्त्वावर शासन जागा घेणार असल्याचे कळते.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
संपादकीय
नवाकाळ
|| न मे भक्त प्रणश्यति ||

# यंदा पावसाचीही काटकसर

देशभर सध्या काटकसर या विषयावर चर्चा सुरू आहे. कोण किती काटकसर करेल हे येणाऱ्या काळात कळेल. परंतु यंदाच्या पावसाने याआधीच काटकसरीचा निर्णय घेतलेला दिसतो. आज देशाच्या काही भागांमध्ये अवकाळी पावसाने देखील धुमाकूळ घातलेला दिसतो. उत्तर प्रदेशमध्ये अचानक झालेला पाऊस आणि त्यात १११ जणांचा गेलेला बळी चिंताजनक ठरतो. महाराष्ट्राचा विचार केला तर जवळपास संपूर्ण राज्यांमध्ये तापमान ४० ते ४५ डिग्री सेल्सिअसपर्यंत पोहोचलेले आहे. गेल्या वर्षी १५ मे च्या आसपासच पावसाने सुरुवात केली होती. आणि या वेळेला सुद्धा २६ मे पर्यंत पाऊस महाराष्ट्रात दाखल होईल अशा प्रकारचा अंदाज वेधशाळांकडून व्यक्त होत आहे. मात्र वेळेआधी येणारा हा पाऊस यंदा पुरेशा प्रमाणात राहील की नाही याबद्दल वेधशाळांनी शंका व्यक्त केलेली आहे. यंदा पावसाचे प्रमाण कमी राहील या शक्यता लक्षात घेतल्या तर वर्षभरामध्ये पाण्याची समस्या अधिक प्रमाणात भेडसावू शकते. विशेषतः महाराष्ट्रात होणारा कुंभमेळा आणि त्या कुंभमेळ्यासाठी येणारे तीन ते चार कोटी लोक यांची व्यवस्था राहण्यासाठी गोदावरीच्या पात्रामध्ये या काळात अधिकाधिक पाण्याचा प्रवाह ठेवण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील. यातला महत्त्वाचा भाग असा आहे की, यावेळेचा कुंभमेळा काही दोन-तीन आठवड्यांचा नाही तर जवळपास वर्षभर चालणारा कुंभमेळा आहे. म्हणजेच गोदावरीच्या पात्रात वर्षभर पुरेशा पाण्याचा प्रवाह राहील याचा सुद्धा विचार करणे क्रमप्राप्त ठरणार आहे. कुंभमेळ्याच्या वर्षात पावसाचे प्रमाण जर कमी राहणार असेल तर त्याबाबत वेगळ्या उपाययोजना कराव्या लागतील. महाराष्ट्रात सर्वात महत्त्वपूर्ण असलेल्या गोदावरीच्या पात्रात पाण्याचा प्रवाह कायम ठेवण्याचे मोठे आव्हान ठरू शकते. पावसाचे प्रमाण आणि महाराष्ट्राची पाण्याची गरज याच्यात मोठी तफावत वर्षभरामध्ये राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. जर वेधशाळांनी पावसाविषयी अशा प्रकारचे अंदाज व्यक्त केले असतील तर त्याचा अधिक अभ्यास होणे अत्यंत गरजेचे आहे आणि तो अभ्यास आतापासूनच केला पाहिजे. कारण पावसाचे प्रमाण कमी राहण्याचे अनेक दुष्परिणाम भेडसावत असतात. पिण्याच्या पाण्यापासून ते शेती उत्पादनावर त्याचा होणारा परिणाम शिवाय जनावरांच्या चारा पाण्याची व्यवस्था हा देखील तितकाच गंभीर मुद्दा ठरतो. म्हणूनच येणारे वर्ष हे कसोटीचे वर्ष ठरू शकते.

### अंदाजातील तफावत

महाराष्ट्राच्या गेल्या वर्षीच्या पावसाचे अंदाज आणि प्रत्यक्षात झालेला पाऊस यामध्ये देखील मोठा फरक पडला होता. वेधशाळांनी ९६ टक्के पाऊस पडेल अशा प्रकारचे अंदाज व्यक्त केले होते. मात्र प्रत्यक्षात शंभर टक्के पाऊस झाला आणि महाराष्ट्रातल्या सगळ्या नद्या, धरणं भरून वाहू लागले होते. निसर्ग हा लहरी असतो म्हणूनच वेधशाळांनी वर्तवलेले अंदाज हे अगदी शंभर टक्के खरे मानूनही उपयोगाचे नसते. मात्र कोणत्याही धोक्याचा किंवा समस्येचा आधीपासूनच विचार करून ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. परिस्थिती कशा पद्धतीने बदलेल हे सांगता येत नाही. विशेषतः वाढलेले उष्णतामान आणि त्याचा पाऊस पाण्यावर होत असलेला परिणाम भारतासारख्या कृषी प्रधान देशासाठी खूप मोठे संकेत देणारा ठरतो. भारताची अर्थव्यवस्था ही कृषी आधारित अर्थव्यवस्था आहे. जवळपास ६० टक्के रोजगार हा शेतीवर अवलंबून आहे. पाऊस जर पुरेशा प्रमाणात झाला नाही तर त्याचा देशाच्या सगळ्याच अर्थव्यवस्थेवर परिणाम होतो. गेल्या काही वर्षात देशातील शहरीकरण मोठ्या प्रमाणावर वेग घेते आहे. शहरांमध्ये वाढत जाणारी लोकसंख्या, तिथे उपलब्ध होणारे रोजगार, प्रचंड वेगाने विस्तारणाऱ्या शहरांच्या सीमा मात्र त्या प्रमाणात अपुऱ्या पडणाऱ्या नागरी सुविधा यामधला विरोधाभास लक्षात घेण्यासारखा आहे. महानगरांच्या सर्व भागांमध्ये कोणतीही महानगरपालिका किंवा नगरपालिका पुरेसे शुद्ध पाणी देऊ शकत नाही ही आज वस्तुस्थिती आहे. सरकारी पातळीवर कितीही प्रयत्न केले तरी आज पाण्याची समस्या सुटू शकलेली नाही किंबहुना ती दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. महाराष्ट्रामध्ये पाण्याच्या अनेक उपाययोजना केल्या गेल्या. जलयुक्त शिवारापासून ते भूजलाची पातळी वाढवण्यापर्यंतच्या कितीतरी योजना राबवल्या जातात. परंतु त्याचे अपेक्षेप्रमाणे परिणाम पाहायला मिळत नाहीत. पाऊस कसाही पडो. परंतु उद्भवणाऱ्या परिस्थितीला तोंड देणारा पाणीपुरवठा संरक्षित केला गेला पाहिजे.

### गेल्या वर्षी पुरेसा पाऊस


गेल्या वर्षी भरपूर पाऊस पडूनही या मे महिन्यामध्ये महाराष्ट्रातले अनेक जलसाठे कोरडे पडू लागले आहेत. विशेषतः वाढत्या तापमानाने या जलसाठ्यांचे बाष्पीकरण होते आणि अपेक्षित असलेला जलसाठा त्या तारखेपर्यंत टिकू शकत नाही. म्हणजेच शंभर टक्के पाऊस पडूनही आज महाराष्ट्रातल्या ५०% पेक्षा जास्त जलसाठ्यांमध्ये केवळ २५ ते ३० टक्के पाण्याचा साठा उरलेला आहे. निसर्गाची ही सगळी बदलती रूपं पाहून आणि पाऊस हा सर्वाधिक महत्त्वाचा असल्याने त्याच्या संबंधातल्या पाण्याच्या नियोजनावर मोठा अभ्यास करायची आवश्यकता आहे. येणाऱ्या काळात आर्टिफिशिअल इंटिलजन्सचा वापर करून निसर्गाशी संबंधित सर्व विषयांचे नियोजन करता येणे शक्य आहे. पाऊस जरी कमी होणार असला तरी त्याचे व्यवस्थापन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अचूकपणे होऊ शकते. दरवर्षीप्रमाणे वेधशाळा आपापले अंदाज व्यक्त करत असतात. परंतु त्यानुसार अधिक काटेकोर व्यवस्थापन किंवा नियोजन अपेक्षित असते. ते होऊ शकत नाही आणि म्हणूनच भरपूर पाऊस पडून देखील पाण्याच्या समस्या जाणवत राहतात. यंदा तर कमी पावसाची शक्यता व्यक्त झालेली आहे. अशावेळी निदान महाराष्ट्रासारख्या राज्यात तंत्रज्ञानाच्या माध्यमातून या समस्येवर मात करता येऊ शकते. एकीकडे विकसित भारत किंवा विकसित महाराष्ट्राची स्वप्ने दाखवायची परंतु पाण्यासारखी मूलभूत समस्या कायम ठेवायची. हा मोठाच विरोधाभास ठरतो.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

ज्ञान असेल तर शब्द समजतात
आणि अनुभव असेल तर अर्थ समजतात.

## पंचांग



**सोमवार, १८ मे २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** अधिक ज्येष्ठ शुक्ल द्वितीया**
*** नक्षत्र : रोहिणी**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २२-०५ वृषभ**
**२२-०६ ते २४-०० मिथुन**

**रवी उदय- ०६-०५**
**रवी अस्त- १९-०६**

**धनिष्ठा नवक समाप्ती सकाळी ११.३२; मुस्लीम जिल्हेज मासारंभ; जागतिक संग्रहालय दिन**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती




### फणसाचे कुरकुरीत नगेट्स



★ **साहित्य :** फणस - ५०० ग्रॅम, मैदा - १/४ कप, कॉर्नफ्लोअर - १/४ कप, चिली फ्लेक्स - १ टीस्पून, मिक्स हर्ब्स - १ टीस्पून, काळी मिरी - १/२ टीस्पून, शेजवान चटणी - १ टेबलस्पून, ब्रेडक्रंब्स - १/२ कप, सोया सॉस - १ टेबलस्पून, तळण्यासाठी तेल आणि चवीनुसार मीठ.

★ **कृती :** सर्वप्रथम, फणसाचे मध्यम आकाराचे तुकडे करा. आता, प्रेशर कुकरमध्ये किंवा पातेल्यात पाणी, मीठ आणि १ टेबलस्पून सोया सॉस घालून फणस उकळून घ्या. सोया सॉस घातल्याने फणसाला गडद रंग आणि किंचित खारट चव येते, ज्यामुळे या नगेट्सना बाजारात मिळणाऱ्या पकोड्यांसारखे स्वरूप येते. नगेट्स मऊ होईपर्यंत उकडा, पण ते पूर्णपणे वितळणार नाहीत याची काळजी घ्या. एका भांड्यात मैदा आणि कॉर्नफ्लोअर एकत्र करा. त्यात चिली फ्लेक्स, ओरेगॅनो, काळी मिरी आणि मीठ घाला. १ मोठा चमचा शेजवान चटणी घाला. हळूहळू पाणी घालून मध्यम-दाट मिश्रण तयार करा. शेजवान चटणीमुळे नगेट्सना तिखट आणि आंबट चव येते, ज्यामुळे ते सामान्य पकोड्यांपेक्षा वेगळे लागतात. उकडलेले फणसाचे तुकडे एक एक करून मिश्रणात बुडवा. नंतर, ते ब्रेडक्रम्ब्सच्या प्लेटवर ठेवून सर्व बाजूंनी व्यवस्थित घोळवून घ्या. जर तुम्हाला अधिक कुरकुरीत कवच हवे असेल, तर तुम्ही त्याला दुहेरी थर लावू शकता.

एका कढईत तेल गरम करा. तेल गरम झाल्यावर, आच मध्यम करा. तयार केलेले नगेट्स काळजीपूर्वक तेलात सोडा. ते सोनेरी तपकिरी होईपर्यंत तळा. म्हणून फक्त मध्यम आचेवरच तळा.




# बंगळुरु प्लेऑफमध्ये जाणारा पहिला संघ ठरला

## पंजाब किंग्सच्या पराभवासह आशा मावळल्या



**धर्मशालाच्या हिमाचल प्रदेश क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या आयपीएलच्या ६१ व्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने पंजाब किंग्सला २३ धावांनी पराभूत करून प्लेऑफमधील आपले स्थान निश्चित केले. या हंगामात १८ गुणांसह प्लेऑफमध्ये पोहोचणारा बंगळुरु पहिला संघ ठरला. या सामन्यात व्यंकटेश अय्यरच्या ७५ आणि विराट कोहलीच्या ५८ धावांच्या बळावर बंगळुरुने पंजाबसमोर विजयासाठी २२२ धावांचे भलेमोठे आव्हान दिले होते. मात्र पंजाबला ८ बाद १९९ धावांपर्यंत मजल मारता आली. परिणामी सलग सहाव्या पराभवासह पंजाबचा संघ जवळपास प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे.**

■ धर्मशाला

**पंजाबने** नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, बंगळुरुच्या फलंदाजांनी हा निर्णय चुकीचा ठरवला. बंगळुरुची सुरुवात खराब झाली असली तरी स्टार फलंदाज विराट कोहली आणि देवदत्त पडिक्कल यांनी दुसऱ्या विकेटसाठी ७६ धावांची आक्रमक भागीदारी केली. पडिक्कल ४५ धावांचे योगदान देऊन बाद झाला. त्यानंतर व्यंकटेश अय्यरच्या साथीत विराट कोहली ३७ चेंडूंत ५८ धावा करून माघारी परतला. अय्यरने सर्वाधिक नाबाद ७३ धावांची तुफानी खेळी केली, तर टिम डेविडने १२ चेंडूंत २८ धावा फटकावून संघाला ४ बाद २२२ या धावसंख्येपर्यंत पोहोचवले. विजयाचा पाठलाग करताना पंजाबची सुरुवात अत्यंत निराशाजनक झाली.

अवघ्या १९ धावांवर प्रियांश आर्य, प्रभसिमरन सिंग, श्रेयस अय्यरच्या रुपात आपले ३ महत्त्वाचे फलंदाज गमावले. त्यानंतर कूपर कोनोली आणि सूर्यांश शेडगे यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला. मात्र ते अनुक्रमे ३७ आणि ३५ धावा करून बाद झाले. मधल्या फळीत मार्कस स्टॉइनिस आणि शशांक सिंह यांनी ६७ धावांची वेगवान भागीदारी करून पंजाबला सामन्यात परत आणले. शशांक सिंहने ५६ धावांची झुंजार खेळी केली, पण बंगळुरुच्या नियंत्रित गोलंदाजीसमोर पंजाबचा डाव १९९ धावांवर मर्यादित राहिला. बंगळुरुकडून रसिक सलाम डारने ३ आणि भुवनेश्वर कुमारने २ बळी घेतले. सलग सहा पराभवांमुळे पंजाब किंग्सचा प्लेऑफचा मार्ग अत्यंत खडतर झाला असला, तरी त्यांचे आव्हान गणितीयदृष्ट्या अजून संपलेले नाही. पंजाबला आता २३ मे रोजी होणाऱ्या लखनौ विरुद्धच्या आपल्या अंतिम सामन्यात कोणत्याही परिस्थितीत मोठ्या फरकाने विजय मिळवावा लागेल. याशिवाय, चेन्नई सुपर किंग्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांनी आपल्या उर्वरित दोन सामन्यांपैकी किमान एक सामना गमावणे आवश्यक आहे.

# पाक संघ कर्णधार फातिमा सना १४ जूनला भारताशी सामना



■ इस्लामाबाद

**पाकिस्तान** क्रिकेट बोर्डाने (पीसीबी) महिला टी-२० विश्वचषकासाठी १५ सदस्यीय संघाची घोषणा केली आहे. हा संघ आयर्लंडमध्ये होणाऱ्या तिरंगी मालिकेतही सहभागी होणार आहे. अष्टपैलू फातिमा सनाला सलग दुसऱ्या टी-२० विश्वचषकासाठी संघाचे नेतृत्व देण्यात आले आहे. संघात अनुभवी खेळाडूंसोबतच नव्या चेहऱ्यांनाही संधी दिली आहे.

पाकिस्तान संघ १४ जून रोजी बर्मिंगहॅम येथे भारताविरुद्धच्या सामन्याने आपल्या मोहिमेला सुरुवात करणार आहे. त्यापूर्वी २८ मे ते ४ जूनदरम्यान डब्लिन येथे वेस्ट इंडिज आणि आयर्लंडविरुद्ध तिरंगी मालिका खेळली जाणार आहे. या संघातील ऐमन फातिमा, नतालिया परवेज, रामीन शमीम, सायरा जबीन आणि तस्मिया रुबाब या पाच खेळाडूंचा हा पहिलाच टी-२० विश्वचषक असेल. ३४ वर्षीय फलंदाज इरम जावेद हिला अलीकडील खराब फॉर्म असूनही संघात स्थान देण्यात आले आहे. संघात फातिमा सना (कर्णधार), आलिया रियाज, आयशा जफर, डायना बेग, ऐमन फातिमा, गुल फिरोजा, इरम जावेद, मुनीबा अली (यष्टिरक्षक), नशरा संधू, नतालिया परवेज, रामीन शमीम, सादिया इकबाल, सायरा जबीन, तस्मिया रुबाब आणि तुबा हसन यांचा समावेश आहे.

# मँचेस्टर सिटी संघाने एफए कप जिंकला

■ लंडन

**एंटोनी** सेमेन्योच्या या अविश्वसनीय गोलमुळे मँचेस्टर सिटी संघाने एफए फुटबॉल कप जिंकला. १५५ वर्षांच्या या जुन्या स्पर्धेत कदाचितच कोणताही अंतिम सामना शानदार गोलने जिंकला गेला असेल. वेम्बली स्टेडियममध्ये मँचेस्टर सिटीने चेल्सीला १-० ने हरवले. मँचेस्टर सिटीसोबतच्या १० वर्षांत ही त्याची १७वी मोठी ट्रॉफी आहे, तर त्याच्या कारकिर्दीतील ३५ वी मोठी ट्रॉफी आहे. मँचेस्टर सिटीने आठव्यांदा एफए कप जिंकून चेल्सी, लिव्हरपूल आणि टॉटनहॅम यांच्यासोबत संयुक्तपणे तिसरे स्थान पटकावले.

# दिल्ली संघाचा राजस्थानवर ५ विकेटने दणदणीत विजय

■ नवी दिल्ली

**अभिषेक** पोरेल (५१) आणि के. एल. राहुल (५६) यांच्या सलामीच्या १०५ धावांच्या भागिदारीमुळे दिल्ली कॅपिटल्सने राजस्थान रॉयल्सवर ५ विकेट आणि ४ चेंडू शिल्लक राखून दणदणीत विजय मिळवला. या पराभवामुळे आता राजस्थान प्लेऑफमध्ये जाण्यासाठी पुढील दोन्ही सामने जिंकावे लागणार आहे. दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर आज झालेल्या आयपीएलच्या ६२ व्या सामन्यांत राजस्थानने दिलेल्या १९३ धावांचे आव्हान दिल्लीने ५ गडी गमावून १९.२ षटकांत गाठले. राजस्थानचा हा सहावा पराभव आणि दिल्लीचा सहावा विजय आहे. दिल्ली याआधीच प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडलेला आहे.

प्रथम फलंदाजी करणाऱ्या राजस्थानचा सलामीवीर यशस्वी जयस्वाल १२ धावांवर झेलबाद झाल्यानंतर वैभव सूर्यवंशी आणि ध्रुव जुरेल यांनी दिल्लीच्या गोलंदाजांवर जोरदार हल्ला चढवला. या जोडीने संघाला ७.२ षटकांत २ बाद ८९ धावांवर पोहोचवले. मात्र सूर्यवंशी २१ चेंडूंत ४६ धावांवर बाद झाला. ध्रुव जुरेलच्या साथीत कर्णधार रियान परागने आक्रमक फलंदाजी



केली. मात्र पराग २६ चेंडूंत ५१ धावा करून तंबूत परतला. त्यानंतर डोनोव्हान फरेरा (०), रवी सिंग (४), शुभम दुबे (५), दासुन शनाका (१०) हे फलंदाज एकामागून एक ध्रुव जुरेलची साथ सोडून माघारी परतल्यामुळे राजस्थानची धावसंख्या धिमी झाली. ध्रुव जुरेल धावगती वाढवण्याच्या प्रयत्नात ४० चेंडूंत ५३ धावा करून बाद झाला. जोफ्रा आर्चर आणि ॲडम मिलन प्रत्येकी २-२ धावा करून नाबाद राहिले. त्यामुळे राजस्थानला ८ बाद १९३ धावांपर्यंत पोहोचता आले. या धावसंख्येचा पाठलाग करताना दिल्लीचे सलामीवीर फलंदाज के. एल. राहुल आणि अभिषेक पोरेल यांनी सुरुवातीपासून जोरदार फटकेबाजी केली. त्यांनी पहिल्या विकेटसाठी १२.३ षटकांत १०५ धावांची भागिदारी केली.

अभिषेक ३१ चेंडूंत ५१ धावा करून बाद झाला, मग साहिल पारेखलाही फारसे काही करता आले नाही. तो ९ धावांवर बाद झाला. शनाकाने राहुलचा (५६) त्रिफळा उडवला. ट्रिस्टन स्टब्स २ धावा करून बाद झाला. अक्षर आणि डेव्हिड मिलर यांनी हा सामना १२ चेंडूंत १९ धावांवर आणला. मात्र मिलर षटकार मारण्याच्या नादात ९ धावांवर झेलबाद झाला. अक्षर (३४) आणि आशुतोष शर्मा (१८)यांनी संघाला ४ चेंडू शिल्लक राखून विजय मिळवून दिला.

# मुंबई महापौर चषक कॅरम स्पर्धा विश्वविजेत्या प्रशांतची आगेकूच

■ मुंबई

**माटुंगाच्या** लोकमान्य मंडळ बँक्वेट हॉल येथे सुरू असलेल्या २३ व्या मुंबई महापौर चषक जिल्हा मानांकन कॅरम स्पर्धेच्या पुरुष एकेरी गटातील उपउपांत्य फेरीत माजी विश्वविजेत्या रिझर्व्ह बँकेच्या प्रशांत मोरेने इंडियन ऑईलचा महम्मद घुफ्रानचा ३ सेटमध्ये अटीतटीच्या लढतीत पराभव केला. पहिला सेट प्रशांत १४-२५ असा हरला होता. परंतु दुसरा सेट प्रशांतने चौथ्या आणि सहाव्या बोर्डात व्हाईट स्लॅमची नोंद करत घुफ्रानविरुद्ध २५-१ असा जिंकला आणि सामना बरोबरीत आणला.

तिसऱ्या आणि निर्णायक सेटमध्ये प्रशांतने आक्रमक खेळाच्या जोरावर घुफानला डोके वर काढण्यापूर्वीच पुन्हा २५-१ असे सहज हरवून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

# भारताच्या सात्त्विक-चिरागला नमवून इंडोनेशियन जोडीने विजेतपद पटकाविले

■ बँकॉक

**भारताची** स्टार पुरुष दुहेरी बॅडमिंटन जोडी सात्त्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांना थायलंड ओपन सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेचे विजेतेपद पटकावण्यात अपयश आले. बँकॉकमध्ये आज झालेल्या या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात इंडोनेशियाच्या लिओ कार्नांडो आणि डॅनियल मार्टिन या जोडीने ५३ मिनिटे चाललेल्या सामन्यात भारतीय जोडीचा २१-१२, २५-२३ असा पराभव केला. सुरुवातीच्या सर्व्हिसदरम्यान चिरागला संघर्ष करावा लागला, ज्याचा फायदा इंडोनेशियन जोडीने घेतला आणि लगेच ४-१ अशी आघाडी घेतली.

# खो-खो स्पर्धेत मध्य, पश्चिम रेल्वेची अंतिम फेरीत धडक

■ मुंबई

**परळच्या** लाल मैदानावर सुरू असलेल्या पहिली व्यावसायिक निमंत्रित खो-खो स्पर्धेत अंतिम विजेतेपदासाठी रेल्वेचा महासंग्राम रंगणार आहे. मुंबई खो-खो संघटनेच्या मान्यतेने आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) स्पोर्ट्स क्लब आयोजित या स्पर्धेतील उपांत्य फेरीच्या सामन्यांनी प्रेक्षकांना अक्षरशः खिळवून ठेवले. चुरशीच्या लढती, दमदार संरक्षण, अचूक रणनीती आणि शेवटच्या क्षणापर्यंत रंगलेला थरारामुळे लाल मैदानावरील वातावरण भारावून गेले. अखेर मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वे संघांनी प्रतिस्पर्ध्यांवर मात करून दिमाखात अंतिम फेरीत प्रवेश केला.

पहिल्या उपांत्य फेरीत मध्य रेल्वेने रचना नोटरी वर्क्सचा ११-१० (मध्यंतर १०-६) असा ७.५० मि. राखून थरारक पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली. सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करून मध्य रेल्वेने सामन्यावर मजबूत पकड निर्माण केली होती. विजयी संघाकडून शुभम थोरात (१.५०, १.४० मि. संरक्षण व १ गुण), अवधूत पाटील (२.५० मि. संरक्षण), रामजी कश्यप (१.५० मि. संरक्षण व ३ गुण), निखिल बी. (२.१० मि. संरक्षण व १ गुण) आणि मिलिंद चावरेकर (२.१० मि. संरक्षण व १ गुण) यांनी शानदार खेळ करत संघाचा विजय निश्चित केला. तर पराभूत रचना नोटरी वर्क्सकडून प्रथमेश दुर्गावले (१ मि. संरक्षण व २ गुण), सदाशिव पालव (१ मि. संरक्षण), ओमकार मिरगळ (१.३० मि. संरक्षण), रुपेश कोंढाळकर (१.१० मि. संरक्षण व ३ गुण) आणि यश बोरकर (१.२० मि. संरक्षण व १ गुण) यांनी कडवी झुंज दिली. मात्र अंतिम फेरीचे स्वप्न अधुरेच राहिले. दुसऱ्या उपांत्य फेरीत पश्चिम रेल्वेने महाराष्ट्र पोस्टचा ८-९ (मध्यंतर ४-९) असा १ डाव राखून १ गुणाने धुव्वा उडवला.

# गंगा दशहरा असा साजरा करा..

**ज्येष्ठ मासातील महत्त्वाचे व्रत म्हणजे गंगादशहरा होय. ज्येष्ठ शुक्ल प्रतिपदेपासून दशमीपर्यंतच्या दहा दिवसांना 'गंगादशहरा' म्हणून संबोधले जाते. उत्तर भारतात या व्रताचे महात्म्य विशेष मानले जाते. ज्येष्ठ शुक्ल दशमीला स्वर्गातून गंगा पृथ्वीवर अवतीर्ण झाली, अशी कथा आहे. या दिवशी जो गंगेमध्ये स्नान करेल आणि तिला दहा प्रकारची फुले, फळे अर्पण करेल त्याची दहा प्रकारची पापे नष्ट होतील, असे आशीर्वचन दिले गेले आहे. म्हणून गंगेला दशहरा म्हणजे दहा पापांचे हरण करणारी, असे म्हटले आहे.**

ज्येष्ठ महिन्यात पहिले दहा दिवशी रोज भाविकांकडून गंगेची पूजा केली जाते. जिथे गंगा नसेल तिथे गावात असेल ती नदी, तीही नसेल तर जो जलाशय उपलब्ध असेल तिथे हे उपचार, अर्पण करावयाचे असतात. रामसेतू बांधण्याचा प्रारंभ प्रभू रामचंद्रांनी याच दिवशी केला, म्हणून या दिवशी सेतूबंध रामेश्वराची पूजा केली जाते.

ज्येष्ठ मास हा पावसाळ्यात येतो. पावसाळा म्हणजे जलवर्षाव. जलदेवतेने आपल्यावर प्रसन्न व्हावे, पण ही प्रसन्नता 'हवा तितुका पाडी पाऊस, देवा वेळोवेळी' अशा स्वरूपाची असावी. पाऊस कमी पडला किंवा अजिबात पडला नाही, तर अवर्षणाची, दुष्काळाची धास्ती निर्माण होते. अधिक पडला तर सगळे धुवून नेतो. अतिवृष्टीमुळे लोकांना घरादाराला पारखे व्हावे लागते. म्हणून जलदेवतेला संतुष्ठ राखण्यासाठी या व्रताची योजना असावी.

हा हेतू जाणून घेऊन या दिवशी पाण्याची पूजा जमेल तशी करावी. आता मुंबईसारख्या शहरात गंगेची किंवा नदीची पूजा करता येऊ शकत नाही. त्यामुळे एखाद्या कलशात पाणी घेऊन त्यात गंगेचे पाणी मिक्स करून त्याची पूजा करणे सहज शक्य आहे. आपल्याला जलदेवतेची पूजा करायची आहे, हा भाव मनात ठेवावा.

या गंगादशहराबाबत एक ध्यानात घेण्याजोगी गोष्ट अशी आहे, की जेव्हा अधिक ज्येष्ठ मास असतो त्यावेळी गंगादशहरा हे व्रत अधिक मासात दिले जाते. अन्यथा इतर सर्व व्रते ही अधिक मासात न देता त्यानंतर येणाऱ्या निज मासातच देण्याची प्रथा आणि परंपरा आहे. निसर्गाशी असलेले धर्मशास्त्राचे नाते घट्ट राहावे या भावनेने पावसाळ्यात येणारे हे व्रत यथाशक्ती पार पाडण्याचा प्रत्येकाने अवश्य प्रयत्न करावा.



गंगा दशहरा काळात भक्त पहाटे उठून गंगा स्नान करावे. गंगा नदीवर जाता येत नसेल तर स्नानाच्या पाण्यात गंगाजल मिसळून स्नान करावे. त्यानंतर गंगा मातेच्या मूर्तीची किंवा चित्राची पूजा करावी. त्याला फुले, धूप, दिवे आणि नैवेद्य अर्पण केला जातो.

**ओम नमो गंगायै विश्वरूपिण्यै**
**नारायणाय नमो नमः**

या मंत्राचा जप केला जातो.

पूजेच्या शेवटी, आरती केली जाते आणि प्रसाद वाटप केला जातो.

गंगा दशहरा काळात गंगाजल अर्पण करा. शनीच्या साडेसती, धैय्या आणि राहूचा अशुभ प्रभाव कमी होऊ शकतो. या दिवशी गंगाक्षेत्राचे पठण केल्याने पापांपासून मुक्ती मिळते. पितृदोषापासून मुक्ती मिळवण्यासाठी गंगा दसऱ्याच्या दिवशी पितरांना गंगाजल अर्पण करावे.

गंगा दशहराच्या दिवशी गंगाजल आणि तुळशीच्या पानांचा अभिषेक करून विष्णूला काजळ लावावे. असे म्हटले जाते की, असे केल्याने देवी लक्ष्मीचाही आशीर्वाद मिळतो. पाण्यात ठेवलेली तुळशीला लाल कपड्यात गुंडाळून तिजोरीत ठेवा. धार्मिक मान्यतेनुसार आशीर्वाद मिळतात. गंगा दशहरा काळात पिंपळाच्या झाडाची पूजा करून दिवा दान करा. तुमच्या जीवनात आनंद येईल. कुटुंबातील कलह कमी करण्यासाठी ब्राह्मण किंवा कुलीन व्यक्तीला अन्नदान करा आणि गंगा दसऱ्याच्या दिवशी घराच्या कोपऱ्यात गंगाजल शिंपडा. घरातील नकारात्मकता दूर होते.

### गंगेचा जन्म कसा झाला?

पौराणिक ग्रंथांमध्ये माता गंगेच्या जन्माशी संबंधित दोन घटनांचा उल्लेख आहे. एका कथेनुसार, भगवान ब्रह्मदेवाच्या कमंडलूतून एक अतिशय सुंदर मुलगी झाली. असे म्हटले जाते की ब्रह्मदेवाने ब्रह्मांडाला बळीच्या राक्षसापासून मुक्त केल्यानंतर, भगवान विष्णूचे पाय धुतले आणि नंतर ते पाणी आपल्या कमंडलूमध्ये भरले. ज्यांच्या पराक्रमामुळे ब्रह्मदेवाच्या कमंडलूमध्ये माता गंगेचा जन्म झाला. ब्रह्मदेवाने गंगा हिमालयाच्या स्वाधीन केली. दुसऱ्या एका कथेनुसार, एकदा भगवान शिवाने ब्रह्मा, विष्णू आणि नारद मुनींसमोर संगीताची धून वाजवली. त्यामुळे भगवान विष्णूंना घाम फुटला. जो त्याने आपल्या कमंडलूत भरला. या कमंडलूच्या पाण्यापासून गंगेचा जन्म झाला आणि ती ब्रह्मदेवाच्या आश्रयाने राहू लागली असे म्हणतात.

भगवान शंकराच्या केसात गंगा माता का अडकली? पौराणिक कथेनुसार, ब्रह्मदेवाच्या शापामुळे माता गंगा पृथ्वीवर आली. दुसऱ्या एका कथेनुसार, गंगा माता भगवान शिवाला तिचा पती म्हणून घ्यायची होती. ज्यासाठी त्यांनी वर्षानुवर्षे कठोर तपश्चर्याही केली. नंतर जेव्हा भगवान शिव माता गंगेच्या तपश्चर्येने प्रसन्न झाले तेव्हा त्यांनी गंगा मातेला आपल्याजवळ ठेवण्याचे वरदान दिले. या वरदानामुळे माता गंगा पूर्ण जागृत होऊन पृथ्वीवर अवतरली तेव्हा पूर आला असे म्हणतात. पृथ्वीला जलप्रलयापासून वाचवण्यासाठी भगवान शिवाने त्याला आपल्या कुलुपांमध्ये सामावून घेतले.

**टीप**- या लेखात सांगितलेले उपाय, सल्ले हे केवळ धार्मिक श्रद्धांवर आधारित असून दै. 'नवाकाळ' त्याचे समर्थन करत नाही.

# सुख शांती समाधान

## अधिक महिन्यात हे करणे टाळा..



अधिक महिना आता सुरू झाला आहे. अधिकाच्या महिन्याला आपल्याकडे खूप महत्त्व आहे. धोंड्याचा महिना म्हणूनही अधिक मास ओळखला जातो. तसेच पुरुषोत्तम मास असेही त्याला म्हटले जाते. अधिक मास हा महिना दर तीन वर्षांनी येतो. वर्षातील हा वाढीव महिना असल्याने याला अधिक मास म्हटले जाते. हा महिना धार्मिकदृष्ट्या महत्त्वाचा मानला जातो.

या महिन्याच्या अनेक परंपरा आहेत. जसे की, जावयाला अनारसे किंवा बत्तासे यांचे वाण देणे, दीप दान करणे. या परंपरांसोबतच आणखी एक परंपरा म्हणजे या महिन्यात काही खास रांगोळ्याही काढल्या जातात. या रांगोळ्या देवासमोर काढतात.

पंचांगानुसार, ज्येष्ठ अधिक महिन्याची सुरुवात १७ मे रोजी झाली आहे. १५ जून रोजी ज्येष्ठ अधिक मासची सांगता होईल, ही ज्येष्ठ महिन्याची अमावास्या तिथी असेल. या महिन्यात दान, पुण्य, जप आणि तपस्या यांचे अनेक पटीने फळ मिळते. परंतु या काळात विवाह, तनसुर, घर उबविणे, नवीन व्यवसाय सुरू करणे यासारखी शुभ कार्ये वर्ज्य आहेत. या काळात लग्न, मुंडन, उपनयन विधी आणि लगन हे चुकूनही करू नये. असे मानले जाते की यावेळी केलेले शुभ कार्य चांगले फळ देत नाही. नवीन घराचा पाया घालणे किंवा अधिक मासात नवीन घरात प्रवेश करणे हे देखील अशुभ मानले जाते.

### अधिक महिन्यातील महत्त्वाच्या रांगोळ्या

**पुरुषोत्तम रांगोळी**

अधिक मासाला पुरुषोत्तम मास म्हणतात हे आपल्याला माहितीच आहे. त्यानुसार या महिन्यात अशा पद्धतीची



रांगोळी काढली जाते आणि तिला पुरुषोत्तम रांगोळी असं म्हणतात.

या रांगोळीमध्ये मध्यभागी विष्णू असतात आणि त्यांच्या आजूबाजूला त्यांच्या प्रिय गोष्टी रांगोळीतून दाखवल्या जातात. या रांगोळ्या काढण्यासाठी जास्त वेळ लागतो. पूर्वी काही घरात या रांगोळ्या आर्वजून काढल्या जात होत्या. सध्या बाजारात या रांगोळीचे छाप मिळतात. त्यामुळे अगदी सहजपणे आपण महिनाभर या रांगोळ्या काढू शकतो.

**गो पद्म रांगोळी**

गोपद्म रांगोळी यावरूनच लक्षात येतं की या रांगोळीमध्ये गाईची पावले असणार आहेत. पण ही पावले काढण्याची एक विशिष्ट पद्धत, ठराविक रचना आहे. ३३ गोपद्म काढून ही रांगोळी तयार होते. यामध्ये सगळ्यात वर एक गो पद्म काढण्यात येते. त्यानंतर त्याच्या खाली दोन, तीन, चार याप्रमाणे प्रत्येक ओळीत एकेक गो पद्म वाढवले जाते. सगळ्यात खालच्या थरामध्ये ७ गोपद्म काढायची. अगदी सोपी असणारी ही रांगोळी काही घरांमध्ये महिनाभर काढली जाते. पण जर तुम्हाला वेळ नसेल काढायला तर या रांगोळीचेही छाप बाजारात उपलब्ध आहे.




## वंदे भारतमधील घोषणा दुरुस्त करा! मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**विभागांकडे पत्र पाठविल्याची माहिती**

■ वसई

**वंदे** भारत रेल्वेमधील 'छत्रपती शिवाजी महाराष्ट्र टर्मिनस' या उद्घोषणेमध्ये दुरुस्ती करून 'छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस' असा योग्य उल्लेख करण्याची मागणी बहुजन विकास आघाडीचे नगरसेवक सरपंच चंद्रशेखर धुरी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली. मुख्यमंत्री कार्यालयाने या मागणीची दखल घेत संबंधित विभागांकडे पत्र पाठविल्याची माहिती आहे.

चंद्रशेखर धुरी यांनी पत्रात नमूद केले आहे की, वंदे भारत एक्स्प्रेस गाड्यांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकासाठी 'छत्रपती शिवाजी महाराष्ट्र टर्मिनस' अशी उद्घोषणा केली जाते. मात्र 'महाराज' हा शब्द वगळला जात असल्याने अनेक प्रवाशांच्या भावना दुखावल्या जातात. त्यामुळे उद्घोषणेत योग्यरित्या 'छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस' असा उल्लेख करावा. तर वीर सावरकर आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे विमानातून येणाऱ्या प्रवाशांसाठी स्वातंत्र्यवीर सावरकरांविषयी उद्घोषणा करण्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

अंदमानमध्ये सेल्युलर जेलला भेट देणाऱ्या पर्यटकांसाठी ही घोषणा अभिमानाची बाब ठरेल. याशिवाय रेल्वे स्थानकांवरील वाढती गर्दी लक्षात घेता प्रवाशांची चुकामूक टाळण्यासाठी पादचारी पुलांना क्रमांक द्यावा. मुंबई विमानतळावरून प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या वाहनचालकांनी आधीच गॅस भरून ठेवावा, जेणेकरून प्रवाशांना रात्री उशिरा गॅस पंपांवर थांबण्याचा त्रास होणार नाही.

## नियमित वीजपुरवठ्यासाठी पुण्यात नागरिकांचे आंदोलन

■ पुणे

**उन्हाळ्याच्या** तीव्र झळा आणि त्यातच दररोज ५ ते ६ तास खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त झाले असून, नियमित वीजपुरवठ्याच्या मागणीसाठी आज पुण्यात आंदोलन करण्यात आले. बाणेर, बालेवाडी, पाषाण आणि महाळुंगे येथील नागरिकांनी बालेवाडी फाटा येथे रस्त्यावर उतरून महावितरणविरोधात जोरदार निदर्शने केली. पूर्वसूचना न देता वीजपुरवठा खंडित होणे, तक्रारींची दखल न घेणे, फोन न उचलणे तसेच अधिकाऱ्यांकडून उडवाउडवीची उत्तरे दिली जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला. वारंवार होणाऱ्या विजेच्या लपंडावामुळे घरातील उपकरणे जळत असूनही महावितरणकडून कोणतीही नुकसानभरपाई मिळत नसल्याचीही नाराजी व्यक्त करण्यात आली. दरम्यान, वीज बिल भरण्यास एक दिवस जरी उशीर झाला तरी तत्काळ वीज तोडली जाते, असा मनमानी कारभार थांबवावा, अशी मागणी आंदोलकांनी केली.

## रस्ते मारहाण प्रकरणातील आरोपीला मानवतावादी दृष्टिकोनातून जामीन

**उच्च न्यायालयाचा निर्णय**

■ मुंबई

**गुन्हेगारांच्या** अर्जावर निर्णय देताना न्यायदेवता कधीकधी माणुसकीच्या दृष्टिकोनातून भूमिका घेते. अशाच प्रकारे उच्च न्यायालयाने रस्ते मारहाण (रोड रेज) प्रकरणातील आरोपीला मानवतावादी दृष्टिकोनातून जामीन दिला. संबंधित आरोपीने जुळ्या मुलींच्या उच्च शिक्षणात मार्गदर्शन करण्यासाठी न्यायालयाकडून जामीन मागितला होता. न्या. संदेश पाटील यांनी आरोपीला ११ दिवसांसाठी जामीन मंजूर केला. ५४ वर्षीय व्यावसायिकाच्या पत्नीने केलेल्या तक्रारीच्या आधारे बोरिवली पोलिसांनी १३ मार्च रोजी एफआयआर दाखल केला होता. याप्रकरणी अटक झालेल्या आरोपीने ३० दिवसांच्या अंतरिम जामिनासाठी सुट्टीकालीन न्यायालयात अर्ज केला होता. ११ मार्चला बोरिवली पश्चिमेकडे पत्नीला कार्यालयात सोडून व्यावसायिक घरी परतत होता. याचवेळी दुचाकीवरून येत असलेला आरोपी त्यांच्या गाडीसमोर आला. त्यावर व्यावसायिकाने हॉर्न वाजवला. त्यामुळे दुचाकीस्वार संतापला आणि त्याने व्यावसायिकाला शिवीगाळ करीत त्याच्यावर हल्ला करत ढकलले. त्यामुळे रस्त्यावर पडून व्यावसायिकाच्या डोक्याला दुखापत झाली. त्याच्यावर मेंदूची शस्त्रक्रिया करण्यात आली. बोरिवली पोलिसांनी त्या दुचाकीस्वारावर स्वेच्छेने दुखापत पोहोचवणे आणि जीव धोक्यात घालणारे कृत्य करणे या आरोपांखाली गुन्हा दाखल केला. आरोपीने मुलींच्या उच्च शिक्षणात मार्गदर्शन करण्यासाठी जामीन मागितला होता. त्यावर अर्जदार आरोपीच्या जुळ्या मुलींना जेईईमध्ये (मेन्स) मिळालेल्या उच्च गुणांबाबतचा युक्तिवाद विचारात घेऊन न्या. पाटील यांनी आरोपीला ११ दिवसांचा जामीन मंजूर केला.

## ओबीसींचा कॉलम कुठे? भंडाऱ्यात जनगणनेवर बहिष्कार

■ भंडारा

**भंडारा** जिल्ह्यातील तुमसर तालुक्यातील खापा गावात जनगणनेच्या पहिल्याच दिवशी ग्रामस्थांनी विरोध केला. २०२६-२७ च्या गृहगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम नसल्याच्या निषेधार्थ ग्रामस्थांनी जनगणनेवर बहिष्कार टाकला. गावात दाखल झालेल्या जनगणना कर्मचाऱ्यांना ग्रामस्थांनी स्पष्ट शब्दांत विरोध करत आल्यापावली परत पाठवले. जोपर्यंत जनगणनेच्या फॉर्ममध्ये ओबीसींसाठी स्वतंत्र रकाना दिला जात नाही, तोपर्यंत गावात जनगणना होऊ देणार नाही, अशी ठाम भूमिका ग्रामस्थांनी घेतली. या आंदोलनाला ग्रामपंचायतीचे आजी-माजी पदाधिकारी, कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते आणि गावकऱ्यांनी एकमुखी पाठिंबा दिला. गावकऱ्यांच्या मते, ओबीसी समाजाची स्वतंत्र नोंद न झाल्यास त्यांच्या लोकसंख्येचे अचूक मूल्यांकन होणार नाही आणि समाजाला न्याय मिळणार नाही. 'ओबीसींना 'इतर' वर्गवारीत टाकणे हा मोठा अन्याय आहे. ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजकुमार माटे यांनी खापा गावातून सुरू झालेला हा विरोध जिल्हाभर आणि राज्यभर पसरू शकतो, असा इशाराही दिला.

## महिला अधिकाऱ्याला अश्लील मेसेज राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यावर गुन्हा

■ छत्रपती संभाजीनगर

**राष्ट्रवादी** काँग्रेसच्या अजित पवार गटाच्या एका पदाधिकाऱ्याने एका महिला मंडळ अधिकाऱ्याला अश्लील मेसेज पाठवले, भेटण्यासाठी दबाव टाकला तसेच त्यांच्या अल्पवयीन मुलीला जीवे मारण्याची धमकी दिली असा आरोप असून पाचोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पैठण तालुक्यातील या पदाधिकाऱ्याने संबंधित महिला अधिकाऱ्याला सतत त्रास देत कार्यालयात घुसून वाद घातला होता. मला तुला भेटायचे आहे, नाहीतर तुझ्या मुलीला पाहून घेईन, अशी धमकी त्याने दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

तू बीड जिल्ह्याची रहिवासी असल्यामुळे माझी महसूल विभागातील कामे करत नाहीस,असा आरोप करत त्याने महिला अधिकाऱ्याच्या मोबाईलवर रात्री उशिरा अश्लील फोटो आणि मेसेज पाठवले. काही मेसेज नंतर त्याने डिलीट केल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. त्याने महिला अधिकाऱ्याच्या घराचा पत्ता शोधून काढत त्यांच्या अल्पवयीन मुलीबाबत गंभीर धमक्या दिल्याचाही आरोप आहे. तुझी मुलगी घरी एकटी असते, तिचे नसरापूर प्रकरणासारखे हाल करून तिला मारून टाकीन आणि तुलाही गायब करीन, अशी धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या सततच्या मानसिक छळाला आणि धमक्यांना कंटाळून संबंधित महिला अधिकाऱ्याने पाचोड पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी पदाधिकाऱ्यावर गुन्हा दाखल केला आहे.

**WIZZMONI FINANCIAL SERVICES LIMITED**
(formerly Unimoni Financial Services Limited)
RO: N.G. 12 & 13 Ground Floor, North Block, Manipal Centre, Dickenson Road, Bangalore - 560 042. CIN No. U85110KA1995PLC018175

**PUBLIC NOTICE**

याद्वारे जनतेला कळविण्यात येते की, तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांच्या लिलाव WIZZMONI FINANCIAL SERVICES LIMITED (formerly Unimoni Financial Services Limited) द्वारे 25.05.2026 रोजी सकाळी 10.00 वाजता खाली दिलेल्या संबंधित केंद्रावर केला जाईल. लिलाव करण्यात येणारे सोन्याचे दागिने आमच्या विविध ग्राहकांच्या कर्ज खात्यातील आहेत ज्यांनी त्यांची थकबाकी भरली नाही. या कर्जदारांना आमच्या लिलावाच्या नोटिसा रीतसर बजावण्यात आल्या आहेत. लिलाव करण्यात येणारे सोन्याचे दागिने शाखेच्या नावासह खाली नमूद केलेल्या आमच्या विविध ग्राहकांच्या थकीत कर्ज खात्यांचे आहेत.

**Auction Centre Address & Loan Nos: MUMBAI - MIRA ROAD (MUI - OFFICE NO 1,2,3, FIRST FLOOR,S2 - SHOPPING CENTRE,BUILDING NO A, 63/64, SHANTHI, Contact: 9819142430) 2170634, 2261717.**

(Reserves the right to alter the number of accounts to be auctioned &/ postpone / cancel the auction without any prior notice)

**नोटीस**

मी अकबर नबी सरवर राहणार रुम नं. ८०२, न्यू प्रतापनगर, एस. आर. ए. को. ऑ. हौसिंग सोसायटी आर. ए. किडवाई रोड, वडाळा, मुंबई – ४०००३१ माझी आई हरिबून निसा बेगम सरवर हिचे दिनांक १४/०७/२०१६ रोजी निधन झाले असून वरील जागा माझ्या नावावर करण्यासाठी सोसायटीत अर्ज केला आहे, तरी कोणाची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांत सोसायटीच्या कार्यालयात लेखी द्यावे ही विनंती

दिनांक : १८/०५/२०२६

## देशात गेल्या १० वर्षांत ८९ वेळा पेपर फुटले

■ नागपूर

**४८ वेळा परीक्षाही रद्द**

**केंद्र** सरकारने लागू केलेल्या सार्वजनिक परीक्षा कायदा २०२४ मध्ये पेपर फोडल्यास १ कोटी रुपयांचा दंड आणि १० वर्षांच्या कोठडीची तरतूद आहे. तरीही ३ मे २०२६ ची नीट परीक्षा रद्द करण्याची वेळ आली. त्यामुळे या कायद्याचा धाक का वाटत नाही? असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. देशातील परीक्षा यंत्रणेला पेपरफुटीची वाळवी लागली आहे. गेल्या १० वर्षांत ८९ वेळा पेपर फुटले. ४८ वेळा परीक्षा रद्द झाल्या.

सार्वजनिक परीक्षा कायदा २०२४ लागू होऊन आता दोन वर्षे पूर्ण होत आहेत. कागदावर हा कायदा अत्यंत कठोर दिसत असला तरी, आजपर्यंत एकाही मोठ्या गुन्हेगाराला किंवा संस्थेला १ कोटी रुपयांचा दंड झाल्याची अधिकृत नोंद नाही. आपली न्यायप्रक्रियाच पाहता, एखाद्या मोठ्या पेपरफुटीच्या गुन्ह्याचा तपास पूर्ण होऊन निकाल लागण्यासाठी अनेक वर्षे लागतात. त्यामुळे शिक्षा निश्चित होण्यास विलंब होत आहे. आत्तापर्यंतच्या तपासात (नीट २०२४ किंवा २०२६) अनेक एजंट आणि विद्यार्थ्यांना अटक झाली आहे.

## दगडूशेठ गणपती ट्रस्टला 'अ' श्रेणी पर्यटन दर्जा

■ पुणे

**पुण्यातील** श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टला 'अ' श्रेणीच्या पर्यटन क्षेत्राचा दर्जा देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दुपारी एक्सवर पोस्ट करून सांगितले की, या निर्णयामुळे तीर्थयात्रा आणि पर्यटन या दोन्ही दृष्टिकोनातून या परिसराचा सर्वांगीण विकास होईल. या दर्जाच्या पर्यटनस्थळांच्या विकासासाठी शासनाकडून विशेष निधी (अनुदान) मंजूर केला जातो.

OW. NO - 27/26
Date : 06-04-2026

Form No. 4
ADDL. CHIEF JUDICIAL MAGISTRATE, ANDHERI, MUMBAI
IN THE COURT OF Abhay Ashok Mehendale
Judicial Magistrate (First Class), 66th Court

PROCLAMATION REQUIRING THE ACCUSED APPEARANCE OF A PERSON ACCUSED (See Section 82)

Misc. case/6600228/2020
JEEVANJYOT KAUR BANSAL Vs KULVINDERSINGH BANSAL
NEXT DATE : 01-08-2026

PUBLISHED THROUGH
Officer Incharge of Police Station/Police Station Officer
To, Sr. Inspector of Police, Kharghar Police Station, Navi Mumbai

WHEREAS complaint has been made before me that KULVINDERSINGH BANSAL, Age-52 years, R/o, Bansal House, Plot No. 120 and 121, Sector-21, Opp. ISKCON Temple, Kharghar, Navi Mumbai has committed (or is suspected to have committed) the offence of Recovery of Maintenance Amount punishable under section of the, and it has been returned to a warrant of arrest thereupon issued that the said KULVINDERSINGH BANSAL cannot be found, and whereas it has been shown to my satisfaction that the said KULVINDERSINGH BANSAL has absconded (or is concealing himself to avoid the service of the said warrant);

Proclamation is hereby made that the said KULVINDERSINGH BANSAL, Age - 52 is required to appear at ADDL. CHIEF JUDICIAL MAGISTRATE, ANDHERI, MUMBAI before Judicial Magistrate (First Class), 66th Court to answer the said complaint on the day of 01-08-2026.

Dated, this day of 12-04-2026

Sd/-
Judicial Magistrate (First Class), 66th Court

Visit ecourts.gov.in for updates or download mobile app "e Courts Services" from Android or iOS
The process is system generated and transmitted in secured manner by authorised user as such physical signature not applied.

**जाहीर सूचना**

येथे सूचना देण्यात येते की, माझे अशिल मे. टेक्सगार ट्रेडिंग कंपनी, ज्यांचे कार्यालय युनिट क्र. १०९ आणि १२४, पहिला मजला, गुरुनानक उद्योग भवन, एल. बी. एस. मार्ग, भांडुप (पश्चिम), मुंबई - ४०००७८ येथे आहे, हे गुरुनानक उद्योग भवन इंडस्ट्रियल प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड, पत्ता प्लॉट क्र. १, सर्व्हे क्र. ८५, एल. बी. एस. मार्ग, भांडुप (पश्चिम), मुंबई - ४०००७८ चे सदस्य आहेत, तसेच माझे अशिल भाग प्रमाणपत्र क्र. ५४ चे धारक असून त्या अंतर्गत प्रत्येकी रु. ५०/- किमतीचे पूर्ण भरणा केलेले पाच शेअर्स, विशिष्ट क्र. १७६ ते १८० (युनिट क्र. १२४ संदर्भात) आहेत, आणि भाग प्रमाणपत्र क्र. ५५ अंतर्गत प्रत्येकी रु. ५०/- किमतीचे पूर्ण भरणा केलेले पाच शेअर्स, विशिष्ट क्र. २२१ ते २२५ (युनिट क्र. १०९ संदर्भात) आहेत.

कोणा व्यक्तिस सदर भाग प्रमाणपत्रांबाबत विक्री, अदलाबदल, गहाण, भेट, भाडेपट्टा, उप-भाडेपट्टा, धारणाधिकार, शुल्क, ताबा, वापर, बोजा किंवा इतर कोणत्याही प्रकारचा दावा असल्यास, अथवा सदर भाग प्रमाणपत्रांच्या ताब्यात असलेल्या कोणत्याही व्यक्तीने, त्यासंबंधीचे दस्तऐवजी पुरावे लेखी स्वरूपात अधोहस्ताक्षरित यांना माझे कार्यालय जी एस सर्विसेस, डॉ. वदवाईक चाळ, गुरुकृपा टॉवरजवळ, जैन मंदिरासमोर, एलबीएस मार्ग, भांडुप (पश्चिम), मुंबई - ४०००७८ येथे, या सूचनेच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत कळवावे, त्यानंतर कोणतेही दावे ग्राह्य धरले जाणार नाहीत आणि सदर कागदपत्रे कायमची हरविलेली असल्याचे गृहीत धरले जाईल.

मुंबई, १८ मे २०२६
गौरव सिंग
वकील

## चर्चा 'सतरंगा'ची



भारतीय चित्रपटसृष्टीतील अग्रगण्य निर्मिती संस्था असलेल्या 'टी-सीरिज' मध्ये सध्या एका मोठ्या प्रोजेक्टची तयारी सुरू आहे. भूषण कुमार यांच्या नेतृत्वाखालील ही कंपनी 'सतरंगा' नावाच्या एका भव्य चित्रपटाची घोषणा करण्याच्या तयारीत आहे. हा चित्रपट एका मोठ्या कॅनव्हासवर साकारला जाणारा एक भव्य संगीतमय ड्रामा म्हणजेच म्युझिकल स्पेक्टॅकल असेल अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. या चित्रपटाची अधिकृत घोषणा येत्या काही आठवड्यांत होणार असली, तरी चित्रपटसृष्टीत या प्रोजेक्टबद्दल आतापासूनच मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. टी-सीरिजचे बॉलिवूडमधील बड्या स्टार्ससोबत असलेले उत्तम संबंध आणि या प्रोजेक्टचे एकूण भव्य स्वरूप पाहता, या चित्रपटात कोणते कलाकार मुख्य भूमिकेत असतील याबद्दल मोठी उत्सुकता आहे. संगीतावर आधारित अनेक यशस्वी हिंदी चित्रपटांची निर्मिती करण्याचा मोठा वारसा लाभलेली टी-सीरिज संस्था या 'सतरंगा' चित्रपटाच्या माध्यमातून आपला हाच संगीतमय वारसा पुढे नेणार आहे.

## 'आखिरी सवाल'चे विशेष स्क्रीनिंग



अभिनेता संजय दत्त यांच्या मुख्य भूमिका असलेल्या 'आखिरी सवाल' या आगामी चित्रपटाची सध्या जोरदार चर्चा सुरू असून, या चित्रपटाचे आज राष्ट्रपती भवनात विशेष स्क्रीनिंग आयोजित करण्यात आले आहे. हा चित्रपट सध्या एका मोठ्या वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. नुकतीच या चित्रपटावर संयुक्त अरब अमिराती म्हणजेच युएईमध्ये बंदी घालण्यात आल्याचे वृत्त आले होते. तसेच भारतातही या चित्रपटाच्या विरोधात एक जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे.

अशा प्रकारे चित्रपट कायदेशीर कचाट्यात आणि सेन्सॉरशिपच्या वादात अडकलेला असतानाच, निर्मात्यांनी राष्ट्रपती भवनासारख्या देशाच्या सर्वोच्च आणि अत्यंत प्रतिष्ठित ठिकाणी याचे खास स्क्रीनिंग आयोजित केले आहे.

या स्क्रिनिंगची तयारी गेल्या काही दिवसांपासून अत्यंत गुप्तपणे सुरू होती. या कार्यक्रमाला कोणकोणते पाहुणे उपस्थित राहणार याबद्दलची माहिती अद्याप गुलदस्त्यात असली, तरी या स्क्रीनिंगमुळे राजकीय आणि चित्रपट वर्तुळात उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे.

## 'है जवानी...'च्या चर्चांना पूर्णविराम

पूजा फिल्म्स आणि टिप्स फिल्म्स यांच्यात सुरू असलेल्या कायदेशीर वादाच्या पार्श्वभूमीवर, टिप्स फिल्म्सने त्यांच्या आगामी 'है जवानी तो इश्क होना है' या चित्रपटाबाबत एक जाहीर स्पष्टीकरण प्रसिद्ध केले आहे. या अधिकृत नोटीसमध्ये म्हटले आहे की, आमच्या 'है जवानी तो इश्क होना है' या चित्रपटाबाबत व्यापारी वर्गात आणि प्रेक्षकांमध्ये विविध चर्चा सुरू असल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे. यावर टिप्स, रमेश तौरानी, डेव्हिड धवन आणि चित्रपटातील सर्व कलाकार व तंत्रज्ञ यांच्या वतीने आम्ही स्पष्ट करू इच्छितो की, या चित्रपटाची कथा आणि पटकथा पूर्णपणे मूळ (ओरिजिनल) असून तिचा इतर कोणत्याही चित्रपटाशी कोणताही संबंध किंवा साम्य नाही. तसेच पूर्व नियोजित वेळापत्रकात कोणताही बदल झालेला नसल्याचे स्पष्ट केले आहे. हा चित्रपट येत्या ५ जून २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे. कायदेशीर वादामुळे या चित्रपटाच्या प्रदर्शनावर संकट येण्याची शक्यता वर्तवली जात होती.



मात्र या स्पष्टीकरणामुळे प्रेक्षक आणि चित्रपट वितरक (एक्झिबिटर्स) यांच्यातील संभ्रम दूर झाला आहे. डेव्हिड धवन दिग्दर्शित हा चित्रपट एक रोमँटिक-कॉमेडी ड्रामा असून, या निमित्ताने डेव्हिड धवन आणि त्यांचा मुलगा वरुण धवन पुन्हा एकदा एकत्र काम करत आहेत. चित्रपटात वरुण धवनसोबत मृणाल ठाकूर आणि पूजा हेगडे मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. डेव्हिड धवन यांचा दिग्दर्शक म्हणून हा शेवटचा चित्रपट असण्याची शक्यता वर्तवली जात असल्याने प्रेक्षकांमध्ये या चित्रपटाबद्दल कमालीची उत्सुकता आहे.

## रणवीरची 'घरवापसी'

अभिनेता रणवीर सिंग याच्या 'धुरंधर' या चित्रपटाच्या अफाट यशानंतर चित्रपटसृष्टीत एक मोठी घडामोड घडली आहे. रणवीर सिंग आणि यशराज फिल्म्सचे म्हणजेच वायआरएफचे सर्वेसर्वा आदित्य चोप्रा यांच्यात नुकतीच वायआरएफ स्टुडिओमध्ये एक गुप्त बैठक पार पडली असून, या दोघांमध्ये पुन्हा एकदा एकत्र काम करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाल्याचे खात्रीलायक वृत्त आहे.

गेल्या अवघ्या चार महिन्यांत रणवीर सिंगने सलग दोन हिट चित्रपट देऊन बॉक्स ऑफिसवर आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. रणवीर सिंगला हिंदी चित्रपटसृष्टीत पहिला ब्रेक देऊन त्याचा पाया मजबूत करणाऱ्या आदित्य चोप्रा यांच्यासाठी रणवीरचे हे यश वैयक्तिक पातळीवर अत्यंत अभिमानास्पद ठरले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या शुक्रवारी या दोघांची अत्यंत गुप्तपणे भेट झाली. या प्रदीर्घ बैठकीत दोघांनी जुने मतभेद बाजूला सारून भविष्यातील योजनांवर सविस्तर चर्चा केली. आदित्य चोप्रा यांनी



रणवीर सिंगला पुढील सहा महिन्यांत एका भव्य चित्रपटाची संहिता म्हणजेच स्क्रिप्ट देण्याचे आश्वासन दिले आहे, तर रणवीर देखील या दिग्गज दिग्दर्शक-निर्मात्यासोबत पुन्हा काम करण्यासाठी प्रचंड उत्सुक आहे.

## 'तुंबाड ३'मध्येही पुन्हा आलियाच!


हिंदी चित्रपटसृष्टीतील अत्यंत प्रतिभावान अभिनेत्री आलिया भट्ट हिच्याबाबत एक मोठी आणि खळबळजनक बातमी समोर आली आहे. प्रचंड गाजलेल्या 'तुंबाड' या चित्रपटाच्या आगामी भागात म्हणजेच 'तुंबाड २' मध्ये आलिया भट्टची एन्ट्री झाली असून, ती एका महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहे. एवढेच नव्हे, तर या मालिकेचा शेवटचा भाग असलेल्या 'तुंबाड ३' मध्ये ती सोहम शाहसोबत मुख्य भूमिकेत असेल, या वृत्ताला खात्रीलायक सूत्रांनी दुजोरा दिला आहे. आलिया भट्ट सध्या संजय लीला भन्साळी दिग्दर्शित 'लव्ह अँड वॉर' या चित्रपटाच्या कामात व्यग्र असली, तरी तिने कोणत्याही गाजावाजाशिवाय या नव्या प्रोजेक्टचे चित्रीकरणही सुरू केले आहे.



'तुंबाड २' मध्ये आलिया भट्ट १५ दिवसांची एक विशेष आणि विस्तारित भूमिका म्हणजेच एक्सटेंडेड कॅमिओ साकारत आहे. ही भूमिका चित्रपटाच्या मूळ कथेला पुढे नेण्यासाठी अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. या दुसऱ्या भागात आलियाच्या पात्राची ओळख करून दिली जाईल, जे पात्र 'तुंबाड ३' मध्ये सोहम शाहच्या बरोबरीने कथेच्या केंद्रस्थानी असेल. अशा प्रकारे 'तुंबाड'च्या या त्रिकूटाचा शेवट आलिया भट्टच्या मुख्य भूमिकेने होणार आहे. आलिया मे महिन्याच्या अखेरपर्यंत 'तुंबाड २' चे आपले चित्रीकरण पूर्ण करेल.

## चर्चेने टाळली 'मोठी टक्कर'

'धमाल ४' या चित्रपटाचे प्रदर्शन आता ३ जुलै ऐवजी १७ जुलै २०२६ रोजी होणार आहे. या निर्णयामुळे अक्षय कुमारच्या 'वेलकम टू द जंगल' या बहुप्रतिक्षित चित्रपटासोबत होणारी बॉक्स ऑफिसवरील मोठी टक्कर टळली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अभिनेता अजय देवगण आणि अक्षय कुमार यांच्यात झालेल्या थेट चर्चेनंतर हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. एकाच आठवड्याच्या अंतराने दोन मोठे मल्टीस्टारर विनोदी चित्रपट प्रदर्शित झाल्यास दोन्ही चित्रपटांच्या गल्ल्यावर त्याचा विपरीत परिणाम होईल, यावर दोन्ही स्टार्सचे एकमत झाले. एकमेकांसोबत स्पर्धा करण्याऐवजी दोन्ही अभिनेत्यांनी सामंजस्याची भूमिका घेत चित्रपटांना चित्रपटगृहात पुरेशी जागा देण्याचा धोरणात्मक मार्ग निवडला. अहमद खान दिग्दर्शित 'वेलकम टू द जंगल' हा चित्रपट २६ जून २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात अक्षय कुमार, सुनील शेट्टी, जॅकी श्रॉफ, रवीना टंडन, दिशा पटानी, जॅकलीन फर्नांडिस, अर्शद वारसी, परेश रावल, राजपाल यादव, जॉनी लिव्हर, लारा दत्ता, श्रेयस तळपदे आणि तुषार कपूर अशी तगडी स्टारकास्ट आहे. दुसरीकडे, इंद्र कुमार दिग्दर्शित 'धमाल ४' मध्ये अजय देवगण, रितेश देशमुख, अर्शद वारसी, संजय मिश्रा आणि जावेद जाफेरी यांच्यासोबत इशा गुप्ता, संजीदा शेख, अंजली आनंद, उपेंद्र लिमये आणि रवी किशन हे कलाकार मुख्य भूमिकेत दिसणार आहेत.



## हेल्दी Me

## उन्हाळ्यात जपा रक्तदाब

**वाढत्या** तापमानाचा आणि उष्णतेचा आपल्या शरीरावर होणारा परिणाम थकवा किंवा घामापुरता मर्यादित राहत नाही. बहुतेकदा तो थेट आपल्या रक्तदाबावर (ब्लड प्रेशर) परिणाम करतो. उष्णता वाढली की, साधारणपणे रक्तदाब कमी होता. परंतु अत्यंत तीव्र उष्णतेमध्ये काही व्यक्तींच्या बाबतीत तो अचानक वाढूही शकतो. म्हणूनच उन्हाळ्यात रक्तदाब नियंत्रित ठेवणे गरजेचे आहे.

वातावरण तापते, तेव्हा शरीर स्वतःला थंड ठेवण्यासाठी धडपडत असते. या प्रक्रियेत मुख्यत्वे तीन बदल घडतात. पहिले म्हणजे 'डिहायड्रेशन' किंवा शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होणे. घामावाटे पाणी आणि क्षार बाहेर पडल्यामुळे रक्ताचे एकूण प्रमाण कमी होते, परिणामी रक्तदाब खालावतो (हायपोटेन्शन).

दुसरे म्हणजे 'व्हासोडिलेशन'. यामध्ये शरीर थंड करण्यासाठी रक्तवाहिन्या रुंदावतात. यामुळे रक्ताचा प्रवाह संथ होतो आणि रक्तदाब खाली येतो. तिसरा परिणाम म्हणजे हृदयाच्या गतीमध्ये होणारी वाढ. कमी झालेल्या रक्तदाबाची भरपाई करण्यासाठी आणि महत्त्वाच्या अवयवांना रक्तपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी हृदय वेगाने धडधडू लागते. यामुळे हृदयविकार असलेल्या व्यक्तींवर ताण येतो.

रक्तदाब कमी झाल्यामुळे चक्कर येणे, डोळ्यांसमोर अंधारी येणे किंवा मूर्च्छा येणे असे प्रकार घडू शकतात. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांमध्ये यामुळे पडल्यामुळे दुखापत होण्याची शक्यता वाढते. दुसरीकडे, अत्यंत दमट आणि उष्ण हवामानात शरीरातील 'स्ट्रेस हार्मोन्स' वाढल्यामुळे रक्तदाब अचानक वाढून हायपरटेन्सिव्ह क्रायसिस (अत्यंत उच्च रक्तदाब) उद्भवू शकतो. अशा वेळी मळमळणे, श्वास घेण्यास त्रास होणे, छातीत दुखणे किंवा दृष्टी धूसर होणे अशी लक्षणे दिसल्यास तातडीने वैद्यकीय मदत घेणे आवश्यक असते.

रक्तदाब नियंत्रित ठेवण्यासाठी


१. पाण्याचे नियोजन: दिवसातून भरपूर पाणी प्या. केवळ तहान लागल्यावरच नव्हे, तर ठराविक वेळाने पाणी पिण्याची सवय लावा. लिंबू सरबत किंवा नारळ पाणी यांसारखी इलेक्ट्रोलाइट्सयुक्त पेये शरीरातील क्षारांचा समतोल राखण्यास मदत करतात.

२. उन्हाची वेळ टाळा: दुपारी १२ ते ४ या वेळेत उन्हात जाणे टाळावे. बाहेर जाणे अनिवार्य असल्यास छत्रीचा वापर करा आणि फिकट रंगाचे, सैल सुती कपडे परिधान करा.

३. व्यायामाची वेळ बदला: उन्हाळ्यात भर दुपारी किंवा बंदिस्त उष्ण जागेत व्यायाम करू नका. पहाटे किंवा सायंकाळी जेव्हा तापमान कमी असते, तेव्हाच शारीरिक हालचालींना प्राधान्य द्या.

४. आहार आणि पथ्य: आहारात फळे आणि पालेभाज्यांचा समावेश करा, ज्यात पाण्याचे प्रमाण अधिक असते. मिठाचे अतिसेवन टाळा. कारण त्यामुळे रक्तदाबावर परिणाम होतो. तसेच, चहा, कॉफी आणि मद्यपान टाळणे हिताचे आहे. कारण या पदार्थांमुळे शरीरातील पाणी कमी होते.

५. नियमित तपासणी: ज्यांना आधीच उच्च रक्तदाब किंवा हृदयाचे विकार आहेत, त्यांनी उन्हाळ्यात वेळोवेळी आपल्या रक्तदाबाची नोंद ठेवावी. कोणत्याही असामान्य बदलाकडे दुर्लक्ष न करता आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.



## अक्कलदाढेचे दुखणे

डॉ. निखिल देशमुख, दंतवैद्यक



**मानवी** मुखात साधारणतः १७ ते २५ वर्षे या वयोगटात सर्वात शेवटी येणाऱ्या चार दाढांना अक्कलदाढ असे संबोधले जाते. वैद्यकीय भाषेत याला 'थर्ड मोलर' म्हणतात. बहुतांश व्यक्तींमध्ये जबड्याचा आकार पूर्ण विकसित झालेला असतो. यामुळे या नवीन दाढेला उगवण्यासाठी पुरेशी जागा उरत नाही. परिणामी, ही दाढ येताना आजूबाजूच्या हिरड्यांवर आणि दातांवर प्रचंड दबाव निर्माण होऊन तीव्र वेदना सुरू होतात. अक्कलदाढ पूर्णपणे बाहेर न येता हिरडीतच अडकून राहणे हे दुखण्याचे सर्वात मुख्य कारण ठरते. अनेकदा दाढ तिरपी किंवा आडवी आल्यामुळे ती शेजारच्या दुसऱ्या दाढेला ढकलते. यामुळे दातांच्या रांगेत बदल होतो आणि जबड्यात ठणक जाणवू लागते. जेव्हा ही दाढ अर्धवट बाहेर येते, तेव्हा त्याभोवती हिरडीचा एक छोटा पापुद्रा तयार होतो. या भागात अन्नाचे कण साचून राहतात आणि तिथे जिवाणूंची वाढ होते. या स्थितीला 'पेरिकोरोनायटिस' असे म्हणतात. यामुळे हिरड्यांना सूज येणे, पू होणे आणि तोंडाला दुर्गंधी येणे असे त्रास उद्भवतात. काही प्रकरणांमध्ये संसर्ग इतका वाढतो की, रुग्णाला ताप येतो, कान आणि डोके दुखू लागते.तसेच तोंड उघडताना किंवा घास घेतानाही प्रचंड त्रास होतो. या वेदनांचे निदान करण्यासाठी प्रामुख्याने एक्स-रे चा वापर केला जातो. याद्वारे दाढेचा कोन आणि तिची मुळे नेमकी कुठे आहेत हे स्पष्ट होते.

## सपाट पोटासाठी...

आहारतज्ज्ञ ऋजुता दिवेकर

**केवळ** वजन कमी करणे म्हणजे पोटाचा घेर कमी होणे नव्हे. अनेकदा लोक सपाट पोटासाठी टोकाच्या आहार पद्धतींचा अवलंब करतात किंवा काही अन्नपदार्थ पूर्णपणे वर्ज्य करतात. परंतु हे उपाय शाश्वत नसतात. पोटाचा घेर कमी होण्यासाठी निव्वळ वजन घटवण्यापेक्षा शरीराची ठेवण किंवा 'बॉडी कंपोझिशन' सुधारणे अधिक आवश्यक आहे. शरीराची ही ठेवण सुधारणे म्हणजे हाडांची घनता वाढवणे, स्नायू बळकट करणे आणि शरीराची ढब म्हणजेच 'पोश्चर' सुधारणे होय. या तीन गोष्टींमध्ये सुधारणा होते, तेव्हाच पोट नैसर्गिकरित्या सपाट दिसू लागते. या प्रक्रियेसाठी तीन विशेष व्यायामांची शिफारस मी करते. हे व्यायाम किमान तीन महिने नियमितपणे करणे गरजेचे आहे. यामध्ये पहिला व्यायाम 'फ्रंट स्क्वॅट्स' हा आहे. हा व्यायाम करण्यासाठी डंबेल्स किंवा केटलवेलचा वापर करता येतो. मात्र सुरुवातीला ताकद कमी असल्यास केवळ दोन्ही हात छातीसमोर दुमडून खाली बसून पुन्हा उभे राहूनही हा व्यायाम करता येतो. आठवड्यातून एकदा हा व्यायाम केल्यास मांड्यांचे स्नायू बळकट होतात आणि हाडांची घनता वाढण्यास मदत होते. ज्यामुळे शरीराला स्थिरता लाभते. दुसरा प्रकार म्हणजे 'पश्चिमोत्तानासन' हे योगासन होय. यात जमिनीवर बसून पाय सरळ पुढे पसरून कंबरेतून पुढे झुकून पायाचे अंगठे पकडण्याचा प्रयत्न केला जातो. यामुळे हॅमस्ट्रिंग स्नायूंची लवचिकता वाढते आणि पाठीच्या खालच्या भागावरचा ताण कमी होतो. विशेष म्हणजे या आसनामुळे पचनक्रिया सुधारते आणि पोट फुगण्याच्या समस्या कमी होतात, ज्यामुळे पोट अधिक सुटल्यासारखे दिसत नाही. हे आसन दररोज करणे फायदेशीर ठरते.



## समस्या मुलांमधील डोकेदुखीची



**लहान** मुलांमध्ये डोकेदुखीची समस्या अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. पालकांसाठी ही चिंतेची बाब असली तरी बहुतेक प्रकरणांमध्ये ही डोकेदुखी गंभीर नसते. या समस्येची कारणे प्रामुख्याने दोन प्रकारात विभागली जातात. प्राथमिक आणि माध्यमिक.

प्राथमिक डोकेदुखीमध्ये मायग्रेन म्हणजेच अर्धशिशी आणि 'टेंशन हेडएक' यांचा समावेश होतो. अर्धशिशीमध्ये केवळ डोके दुखत नाही, तर मळमळणे, उलट्या होणे आणि प्रकाश किंवा आवाजाचा त्रास होणे अशी लक्षणे दिसतात. टेंशन हेडएक हे सहसा अभ्यासाचा ताण, अपुरी झोप किंवा मानसिक दडपणामुळे उद्भवते. यामध्ये डोक्याच्या दोन्ही बाजूंना सतत दाब जाणवतो.

याशिवाय अनेक शारीरिक आणि पर्यावरणीय घटक कारणीभूत असतात. सर्दी, ताप, सायनस किंवा घशाचे संक्रमण ही सामान्य कारणे आहेत. जर मुलांच्या डोळ्यांवर ताण येत असेल किंवा त्यांना दृष्टीदोष असेल, तरीही वारंवार डोकेदुखी होऊ शकते.

आजच्या डिजिटल युगात मोबाईल आणि कॉम्प्युटरचा अतिवापर, तसेच स्क्रीनसमोर जास्त वेळ घालवल्यामुळे डोळ्यांच्या स्नायूंवर ताण येतो. याव्यतिरिक्त शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होणे म्हणजेच डिहायड्रेशन, जेवणाच्या अनियमित वेळा आणि रक्तातील साखरेचे कमी झालेले प्रमाण यामुळेही मुले डोकेदुखीची तक्रार करतात. काही मुलांमध्ये चॉकलेट, कॅफिनयुक्त पेये किंवा विशिष्ट प्रक्रिया केलेले पदार्थ खाल्ल्यामुळे डोकेदुखीची लक्षणे बळावतात. डोकेदुखी सामान्य असेल, तर डॉक्टर पॅरासिटामॉल किंवा आयबुप्रोफेन सारखी वेदनाशामक औषधे योग्य डोसमध्ये सुचवतात. मात्र, पालकांनी डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतीही औषधे देऊ नयेत. जर मुलाला डोकेदुखीसोबत मानेमध्ये कडकपणा, खूप ताप, फिट्स येणे किंवा दृष्टी धूसर होणे असा त्रास होत असेल, तर तातडीने सीटी स्कॅन किंवा एमआरआय सारख्या चाचण्या करण्याची गरज असते. सायनसमुळे डोके दुखत असल्यास प्रतिजैविकांचा वापर प्रभावी ठरू शकतो. औषधोपचारांसोबतच जीवनशैलीत बदल करणे हा मुलांच्या डोकेदुखीवर सर्वात प्रभावी उपाय आहे.




## मायग्रेनपासून सुटका मिळवण्यासाठी


**मायग्रेन** किंवा अर्धशिशीचा त्रास दैनंदिन कामात मोठे अडथळे निर्माण करू शकतो. डोक्याच्या एका बाजूला होणाऱ्या तीव्र वेदना आणि मळमळण्यासारख्या समस्यांमुळे कामावर लक्ष केंद्रित करणे कठीण होते. या समस्येवर मात करण्यासाठी...

मायग्रेनचा त्रास असलेल्या व्यक्तींमध्ये अनेकदा मॅग्नेशियम या खनिजाची कमतरता दिसून येते. हे खनिज नसांच्या कार्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. यासाठी आपल्या आहारात हिरव्या पालेभाज्या आणि विशेषतः पालकाचा समावेश करावा.

अर्धशिशीमध्ये सकाळी उठल्यावर केळे खाणे फायदेशीर ठरू शकते. केळ्यामध्ये पोटॅशियम आणि मॅग्नेशियम मुबलक प्रमाणात असते, जे मज्जासंस्था शांत ठेवण्यास आणि स्नायूंचा ताण कमी करण्यास मदत करतात.

मेंदूतील दाह किंवा सूज कमी करण्यासाठी ओमेगा ३ फॅटी ॲसिड अत्यंत उपयुक्त ठरते. अळशीच्या बिया आणि चिया सीड्स यांचे सेवन केल्यास मायग्रेनच्या वेदना कमी होण्यास मदत होते.

मायग्रेनचा त्रास जाणवू लागतो, तेव्हा तुळस, मिरी आणि आल्याचा चहा घेणे गुणकारी ठरते. या तिन्ही पदार्थांमध्ये नैसर्गिक औषधी गुणधर्म असून, ते वेदनाशामक म्हणून काम करतात.




### हे लक्षात ठेवा

नाश्ता न केल्याने रक्तातील साखरेची पातळी खालावू शकते, ज्यामुळे मायग्रेनचा अटॅक येण्याची शक्यता वाढते.

शरीरातील पाण्याची कमतरता हे मायग्रेनचे एक प्रमुख परंतु लपलेले कारण आहे. त्यामुळे दिवसभर भरपूर पाणी पिणे आवश्यक आहे.

सकाळी आणि संध्याकाळी मानेचे हलके व्यायाम केल्याने रक्ताभिसरण सुधारते आणि स्नायूंमधील ताण कमी होऊन डोकेदुखीपासून आराम मिळतो.

## नवाकाळ शब्दकोडे-१६०९



**आडवे शब्द –**

१. किरकोळ, क्षुल्लक, यथातथा ३. हस्त, बाहू ४. वेगळे, निराळे ७. सुगी, बहराचा काळ १०. कोष्टक ११. यज्ञ, याग १३. वक्र १५. दुर्धर आपत्ती, मोठा आघात १७. वाफ १८. व्याकूळ, अस्वस्थ २२. बारा डझन २३. घोड्याचे पाऊल, बिशाद २४. थोरली बहीण २६. उपहासाने हसणे २८. रुधिर २९. खात्री, शहानिशा ३०. एकाच ठिकाणी नजर केंद्रित करणे- xx लावून पाहणे ३२. पर्वत ३३. जुने ३४. बडे धेंड ३६. वीज ४०. मत्सर ४१. तिमिर ४३. समशेर ४५. प्रसादासोबत दिले जाणारे जल ४६. वेडपट, खुळचट ४८. मर्यादित ५१. कळी, अंकुर ५२. बगळा ५३. वाकलेला, विनित, नम्र ५६. धाडसाचे कृत्य ५८. पिवळा रंग ६०. प्राणघातक ६२. जमीन ६३. चिंतन ६५. बोध, आकलन ६७. जादूटोणा ६८. बारीकसारीक ७०. श्रीकृष्णाने यमुनेच्या डोहात या नागराजाचा वध केला ७१. भूतकाळ ७४. कोरडे, वाळलेले ७५. दात ७६. नवमी तिथी ७८. दागिना, अलंकार ८०. वृक्ष, तरू ८१. सारिका, साळुंकी ८२. फिकीर ८३. इच्छा, कामना ८४. टाळे ८६. कंबरेचा बटवा ८८. तांबडा ८९. तुच्छ ९०. रुजलेले, मोड आलेले९२. जुने वर्तमानपत्र ९३. आपली भाषा ९४. शक्ती ९६. छत, चांदवा ९७. वेगळे होणे, ताटातूट ९९. नेसलेले वस्त्र १००. वरचढ, श्रेष्ठ १०२. विक्रीचा दर, मनातील भावना १०३. मतैक्य असलेला १०५. राम गणेश गडकरी यांनी लिहिलेल्या 'एकच प्याला' नाटकातील मद्यपी पात्राचे नाव १०६. वाळलेला खजूर १०७. अस्वस्थता १०८. मक्षिका

**उभे शब्द –**

१. कुरघोडी २. संत ज्ञानेश्वरांची बहीण ३. अफवा ५. शंभर हजार ६. खटला ७. मोठी कळशी, घडा ८. धन, वित्त ९. तप्त राख १२. सूर्य १४. कोलकाता शहराचे जुने नाव १६. सविस्तर, बारकाव्यासह १९. परस्पर समजूतदारपणा २०. नित्य २१. नावाडी २४. स्वार्थी माणसांचे स्वभाववर्णन करणारी म्हण- 'कामापुरता मामा xxxxx xx' २५. जपणूक २७. अलिप्त २९. निर्दालन ३१. व्यवहार ३४. यांत्रिक ३५. राग, संताप ३६. सूर्यापासून मिळालेले ३७. थोडे, अल्प ३८. शनिचा खडा ३९. चाक ४१. शेवट ४२. काटकी ४४. पंगतीत अन्न वाढणारा सेवक ४६. तिरळा ४७. आर्जवे ४९. असत्य, भ्रामक ५०. फार्स, घटनाप्रधान विनोदी नाटक ५२. रिकामटेकडे प्रेक्षक ५४. नौका ५५. काटेरी खवल्यांचे आंबटगोड फळ ५७. समान ५९. 'जया अंगी मोठेपण xx xxx xxx' (संत तुकाराम) ६१. मिरवणूक ६३. मोठा ६४. रक्तवाहिनी ६६. सीमाकराचा जुना प्रकार ६८. सैन्य ६९. अस्थी ७१. अत्यंत लाडाकोडाची व्यक्ती असल्याचे दाखवणारा शब्दप्रयोग ७२. श्रवणेंद्रिय ७३. त्वरित ७४. चांगली घटना घडणार असल्याचे पूर्वसंकेत ७५. नियम ७७. प्रिय व्यक्ती एकत्र येणे, भेट, मिलाफ ७९. वेल (कवितेतला शब्द) ८२अ. स्वामी, धनी ८५. पुन्हा ८७. शांतता ९०. गाण्याच्या भेंड्या ९१. भेद, अंतर, फरक ९५. विजयादशमी ९८. लेखणी ९९. सदा १०१. डावा १०४. फिकीर •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६०८ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. आवृत ५. अजगर ८. अवस १०. बिदागी १२. पश्चिम १३. मस्तवाल १४. क्षालन १६. मंदिर १७. टक १८. अस्त १९. जसा २०. बंडलबाज २१. बस्ता २२. गदा २३. कवी २४. मध २५. सफल २७. रखवालदार २९. दावानल ३२. मिठी ३३. डूल ३५. ढालगजभवानी ४०. प्रासाद ४२. हास्य ४३. वाईट ४४. हरण ४६. अपमान ४७. मत ४८. पदरव ५०. दार ५१. हरहुन्नरी ५३. पतन ५४. कुटील ५५. साद ५७. तरुण ५९. करवत ६२. रचना ६३. करंडक ६६. अवगत ६७. पद ६८. पीठ ७०. भांगडा ७१. हरीणकाळजी ७४. संकट ७५. कस ७७. पसार ७९. भस्म ८२. कप ८५. अनुराग ८९. प्राण हा सर्वथा जाऊ पाहे ९१. वरण ९२. राजमा ९४. ठोसा ९५. माणिक ९८. सावध १०१. नभ १०३. शक्ती १०४. लवकर १०५. तलफ १०६. डाराडूर १०७. वसंत

**उभे शब्द** : १. आपटबार २. वृश्चिक ३. तम ४. समस्त ५. अवाजवी ६. जलसा ७. रक्षाबंधन ८. अनलस ९. समंजस १०. बिरबल ११. गीत १५. लड १८. अदालत २२. गवा २३. करडू २४. मवाळ २६. काठी २८. खडीसाखर ३०. लढाई ३१. भिंग ३२. मिनी ३४. लहानपण ३६. लटपटीत ३७. जहर ३८. भरवसा ३९. वाण ४१. विपरीत ४३. वात ४५. गोरखनाथ ४६. अन्न ४७. मनकवडा ४९. दल ५१. हस्तक ५२. हुल्लड ५४. कुवत ५६. दरवळ ५८. रुपे ६०. रग ६१. कोंदण ६४. रंगकर्मी ६५. कपी ६६. अगत्य ६७. परी ६९. ठक ७१. हर ७२. कासरा ७३. जीभ ७६. सकस ७८. सारिपाट ८०. स्मरणशक्ती ८१. खण ८३. पर्वत ८४. गुंजारव ८६. नुकसान ८७. गवत ८८. न्यारा ८९. प्रामाणिक ९०. हानी ९३. जमाव ९३. कर ९७. चीत ९८. साफ ९९. घडा १००. भिडू १०२. भव १०३. शत

## राज्यात इंधनटंचाईमुळे पेट्रोल पंपांवर हाणामारी

पान ८ वरून

सर्वसामान्य नागरिकांकडून होत आहे. पेट्रोल-डिझेल दरवाढीविरोधात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुणे दौऱ्यावेळी आज बैलगाडी आणून आंदोलन करण्याचा इशारा मनसेने दिला होता. मात्र, पुणे पोलिसांनी या आंदोलनाला परवानगी नाकारत मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला. मनसे शहराध्यक्ष साईनाथ बाबर यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. आंदोलनस्थळी आणलेली बैलगाडीही पोलिसांनी बाजूला हटवली. कार्यकर्ते आंदोलनावर ठाम राहिल्याने काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. मात्र, पोलिसांनी आंदोलकांची धरपकड करून ते होऊच दिले नाही.

## वसई किल्ल्याचे संवर्धन करणार पालिकेचा विकास आराखडा तयार

■ वसई

**वसईच्या** ऐतिहासिक किल्ल्याची दुरवस्था आणि गैरसोयी दूर करून किल्ला विकसित करण्याचा निर्णय वसई-विरार महापालिकेने घेतला आहे. यासाठी पुरातत्व विभागासोबत बैठक झाली असून, टप्प्याटप्प्याने पालिका पुरातत्व खात्याला मदत करणार आहे.

वसईत ऐतिहासिक पोर्तुगीजकालीन किल्ला आहे. हा किल्ला चिमाजी अप्पांनी पोर्तुगिजांविरोधात लढाई करून जिंकला होता. १०९ एकरच्या परिसरात पसरलेला हा किल्ला आहे. परंतु मागील काही वर्षांपासून या किल्ल्याच्या दुरवस्थेत दिवसेंदिवस वाढ होत आहे. किल्ल्यातील अनेक महत्त्वाचे अवशेष भग्नावस्थेत पडले आहेत. तसेच किल्ल्याच्या बांधकामाला झाडाझुडपांचा मोठा विळखा पडला आहे. किल्ल्याला भेट देण्यासाठी दररोज शेकडो पर्यटक येत असतात. पण काही सोयीसुविधा नसल्याने त्यांची गैरसोय होत असते. आता पालिकेने किल्ल्याच्या संवर्धनासाठी पुढाकार घेतला आहे. किल्ला हा पुरातत्व खात्याच्या अखत्यारित येतो. त्यामुळे पुरातत्व खात्याच्या सहकार्याने किल्ल्याचा विकास केला जाणार आहे. पालिकेने त्यासाठी निधीची तरतूद केली असून, टप्प्याटप्प्याने किल्ल्याचा विकास केला जाणार आहे, अशी माहिती पालिका आयुक्त पृथ्वीराज बीपी यांनी दिली.

## कांद्याची आवक घटली दरात आणखी घसरण

■ चाकण

**खेड** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केट यार्डमध्ये कांद्याची आवक घटून दरात आणखी घसरण झाली. बाजारात भोपळा, हिरवी मिरची, कांदा, बटाटा आणि वाटाण्याची मोठ्या प्रमाणावर आवक झाली. फळभाज्या व पालेभाज्यांच्या दरातही घसरण नोंदली गेली. एकूण उलाढाल ८ कोटी ३० लाख रुपये झाली. कांद्याची आवक ३,२५० क्विंटल झाली आहे. त्याला ५०० ते १,२०० रुपये दर मिळाला. बटाट्याची २,००० क्विंटल आवक झाली असून, कमाल भाव १,४०० रुपये मिळाला. लसणाची २५ क्विंटल आवक नोंदली गेली आणि त्याला १२ हजार रुपये दर मिळाला.

## 'एंजल ऑफ डेथ'च्या गोपनीय फाईल स्वित्झर्लंड उघडणार

■ जिनेव्हा

**स्वित्झर्लंडमधील** अधिकाऱ्यांनी नाझी क्रूर डॉक्टर जोसेफ मेंगेले यांच्याशी संबंधित अनेक वर्षे गोपनीय ठेवलेल्या फाईल सार्वजनिक करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे दुसऱ्या महायुद्धानंतर ऑशविट्झमधून फरार झालेला आणि एंजल ऑफ डेथ म्हणून कुप्रसिद्ध असलेला मेंगेले याच्या हालचालींबाबत नवी माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

इतिहासकार आणि पत्रकारांनी स्वित्झर्लंडच्या फेडरल इंटेलिजन्स सर्व्हिसकडे असलेल्या नोंदी उघड कराव्यात, अशी अनेक वर्षे मागणी होत होती. सुरुवातीला गोपनीयतेचे कारण देत अधिकाऱ्यांनी ही कागदपत्रे देण्यास नकार दिला होता. मात्र, कायदेशीर अपील आणि वाढत्या सार्वजनिक दबावानंतर त्यांनी अखेर या फाईल उघड करण्यास सहमती दर्शवली. संशोधकांना आशा आहे की, यातून दुसऱ्या महायुद्धानंतर अटक टाळताना मेंगेले स्वित्झर्लंडमध्ये आले होते का किंवा तेथे वास्तव्यास होते का, याबाबत स्पष्टता मिळू शकेल. या नोंदींमधून स्विस अधिकाऱ्यांनी नाझी अत्याचारींवर कशी नजर ठेवली होती आणि युरोपमधून पळून जाणाऱ्या माजी नाझींनी वापरलेल्या मार्गांची अधिकाऱ्यांना माहिती होती का, हेही उघड होण्याची शक्यता आहे.

## उषा चव्हाण यांनी व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार परत केला

पान १ वरून

असतानाही प्रशासनाकडून न्याय मिळत नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. धनकवडी येथील त्यांच्या कौटुंबिक मालकीच्या जमिनीवरून वाद निर्माण झाला आहे.

उच्च न्यायालयाने संबंधित मालमत्ता अद्याप अविभाजित असल्याचे नमूद करत त्यांचे पुत्र हृदयनाथ कडू देशमुख यांचा कायदेशीर हिस्सा मान्य केला. तरीही महापालिकेकडून बिल्डर कंपन्यांच्या फायद्यासाठी टीडीआर मंजूर करण्यात आल्याचा आरोप उषा चव्हाण यांनी केला आहे. या प्रकरणी मुख्यमंत्री कार्यालय, नगरविकास विभाग आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे अनेकदा तक्रारी करूनही न्याय मिळाला नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. जर शासन मला न्याय देऊ शकत नसेल, तर हे पुरस्कार जवळ ठेवण्यात काय अर्थ? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नगरविकास खाते असल्याने त्यांची भेट घेणार असल्याचेही उषा चव्हाण यांनी सांगितले.

## देशात अमरावती आणि वर्धा सर्वाधिक उष्ण! पारा ४६ अंश

■ नवी दिल्ली



**महाराष्ट्रातील** अमरावती आणि वर्धा ही देशातील सर्वात गरम शहरे ठरली आहेत. दोन्ही शहरांचे तापमान ४६ अंश सेल्सियस नोंदवले गेले. उत्तर प्रदेशातील बांदा, मध्य प्रदेशातील नौगाव आणि खंडवा येथे तापमान ४४ अंश होते.

पश्चिमेकडील राजस्थान, गुजरात आणि महाराष्ट्रापासून मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश यांसह ८ राज्ये तीव्र उष्णतेच्या लाटेच्या तडाख्यात आहेत. या भागांमध्ये तापमान सातत्याने ४० अंशाच्या वर नोंदले जात आहे. दिवसासोबतच रात्रीही उष्ण होत आहेत. दरम्यान, गुजरातमधील एकता नगर येथील स्टॅच्यू ऑफ युनिटीजवळील जंगल सफारी (सरदार पटेल झूलॉजिकल पार्क) मध्ये प्राणी आणि पक्ष्यांसाठी एसी, कुलर आणि स्प्रिंकलर बसवण्यात आले आहेत. बडोदा येथील सयाजीबाग झूलॉजिकल पार्कमध्येही प्राणी आणि पक्ष्यांना उष्णतेपासून वाचवण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

## ब्लॅकमेलिंगला कंटाळून रेल्वे कर्मचाऱ्याची आत्महत्या

■ वसई

**५ लाखांच्या** खंडणीसाठी धमकावून ब्लॅकमेल केले जात असल्याने एका रेल्वे कर्मचाऱ्याने आत्महत्या केली आहे. याप्रकरणी विरार पोलिसांनी एका स्थानिक यूट्युब पत्रकारासह दोन जणांविरोधात खंडणी तसेच आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पश्चिम रेल्वेत फिटर पदावर काम करत असलेला लालजी सरोज (३२) हा विरार पूर्वेतील फुलपाडा परिसरातील जगन्नाथ अपार्टमेंटमध्ये राहत होता. त्याची पत्नी गावी गेली होती. १३ मे रोजी लालजी याचा मृतदेह घरात आढळला. गळ्यावर चाकूचे वार करून त्याने आत्महत्या केली होती. याप्रकरणी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली होती. मयत लालजी याच्या भावाने स्थानिक युट्युब पत्रकार राकेश तिवारी आणि असलम शेख हे दोन स्थानिक इसम लालजी याला खोट्या पोक्सो प्रकरणात अडकवण्याची धमकी देत होते. या धमकीच्या जोरावर आरोपी ५ लाख रुपयांची मागणी करत छळ सुरू केला होता. त्यामुळे लालजी तणावात होता. याबाबत मयत लालजी याने आपल्या भावाला फोन करून माहिती दिली होती.

## रस्ते अपघातातील दोषी चालकाची फक्त २५ हजारांचा दंड ठोठावून सुटका

पान १ वरून

मालकीची इनोव्हा कार तिला धडकली. या अपघातात तिच्या डोक्याला आणि कंबरेला गंभीर दुखापत झाली. तिला तातडीने बॉम्बे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. २०२१ मध्ये मोटार अपघात दावा न्यायाधिकरणाने (एमएसीटी) निधी यांना व्याजासह ६९.९२ लाख रुपयांची नुकसानभरपाई मंजूर केली होती. तसेच भविष्यातील वैद्यकीय उपचारांसाठी १.५ कोटी रुपयांचा निधीही मंजूर करण्यात आला होता. मात्र, पश्चिम रेल्वेने या निर्णयाला आव्हान देत निधी या मोबाईल फोन वापरत होती आणि पादचारी सिग्नल हिरवा होता, असा दावा करत तिच्या निष्काळजीपणाचाही मुद्दा उपस्थित केला. फेब्रुवारी २०२२ मध्ये या खटल्याची सुनावणी सुरू झाली. सरकारी पक्षाने निधीचा मित्र चिराग मारू, आणखी एक प्रत्यक्षदर्शी आणि वैद्यकीय तज्ज्ञ अशा चार साक्षीदारांची साक्ष नोंदवली. मारू यांनी सांगितले की, वाहनाने सुमारे ७० किमी प्रति तास वेगाने येऊन निधीला धडक दिली. दुसरे प्रत्यक्षदर्शी श्रेयस प्रकाश पालकर यांनी सांगितले की, अपघात झेब्रा क्रॉसिंगवर झाला आणि त्यावेळी पादचारी सिग्नल हिरवा होता. वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. विजय कुमार यांनी निधीला गंभीर दुखापत झाल्याची पुष्टी केली. आरोपीने आपल्याला खोटेपणाने गोवण्यात आल्याचा दावा करत आरोप नाकारले. मात्र, न्यायालयाने बचाव पक्षाचा युक्तिवाद फेटाळून लावत साक्षीदारांविरुद्ध कोणतेही वैर किंवा खोटे आरोप करण्याचा हेतू सिद्ध झालेला नाही, असे नमूद केले. तसेच आरोपी अधिकृत रेल्वे वाहन चालवत असल्याने त्यांना खोटेपणाने अडकवण्याची शक्यता कमी असल्याचेही न्यायालयाने निरीक्षणात नमूद केले.

## इराणवर पुन्हा हल्ल्याचा इशारा

पान १ वरून

मात्र ही मोहीम अत्यंत धोकादायक असून, मोठ्या प्रमाणावर लष्करी नुकसान होण्याची शक्यता अधिकाऱ्यांनी व्यक्त केली जाऊ शकते. तिसऱ्या पर्यायानुसार अमेरिकी सेना खार्ग बेटावर ताबा मिळवू शकते. हे बेट इराणच्या तेल निर्यातीचे प्रमुख केंद्र मानले जाते. मात्र तेथे दीर्घकाळ नियंत्रण राखण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सैन्याची आवश्यकता भासणार असून, स्थानिक भौगोलिक परिस्थिती अमेरिकेसाठी आव्हानात्मक ठरू शकते. अमेरिकेने पश्चिम आशियात ५० हजारांहून अधिक सैनिक तैनात केले आहेत. दोन विमानवाहू युद्धनौका, १२ विनाशिका आणि लढाऊ विमाने सज्ज ठेवण्यात आली आहेत. याशिवाय सुमारे ५ हजार मरीन सैनिक आणि ८२ व्या एअरबॉर्न डिव्हिजनचे २ हजार पॅराट्रूपर्स आदेशाच्या प्रतीक्षेत आहेत.

## नसरापूर अत्याचार प्रकरणात ११०० पानी आरोपपत्र दाखल

पान १ वरून

आले आहेत. याशिवाय घटनास्थळ पंचनामा, जप्त साहित्य आणि फॉरेन्सिक तपास अहवालांचाही समावेश करण्यात आला आहे. पीडितेला न्याय मिळावा यासाठी पोलीस आणि सरकारी पक्षाने जलदगतीने तपास पूर्ण केला. या प्रकरणाचा खटला पुढील आठवड्यात सुरू होणार असल्याची माहिती विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी दिली आहे. या प्रकरणी पोलिसांनी अटक केलेल्या भीमाजी कांबळे (६५) याच्यावर यापूर्वीही गुन्हे दाखल आहेत. शवविच्छेदन अहवालात पीडितेच्या शरीरावर गंभीर जखमा आढळून आल्या असून, श्वास गुदमरल्याने मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले आहे. घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी करत पुणे-सातारा महामार्गावर रास्ता रोको आंदोलन केले होते. त्यानंतर पुणे ग्रामीण पोलिसांनी हा खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवून लवकरात लवकर कठोर शिक्षा मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते.

## जपानमधील भारतीय रेस्टॉरंट मालकाचा व्हिसा नाकारला! व्यवसाय बंद

■ टोकियो

**जपानमध्ये** जवळपास १८ वर्षांपासून भारतीय रेस्टॉरंट चालवणाऱ्या मनीष कुमार यांच्यावर मोठे संकट ओढवले आहे. जपानच्या इमिग्रेशन सर्व्हिसेस एजन्सीने त्यांच्या व्यवसाय व्यवस्थापक व्हिसाच्या नूतनीकरणाला नकार दिल्याने त्यांना रेस्टॉरंट बंद करण्याची वेळ आली आहे.

मनीष कुमार हे सैतामा प्रिफेक्चरमध्ये भारतीय रेस्टॉरंट चालवतात. गेल्या वर्षी लागू करण्यात आलेल्या कठोर नियमांमुळे त्यांचा व्हिसा अर्ज फेटाळण्यात आला. त्यामुळे त्यांच्यासह त्यांच्या कुटुंबाचे भवितव्यही अनिश्चित झाले आहे. मनीष कुमार यांनी म्हटले आहे की, या निर्णयामुळे मी पूर्णपणे खचून गेलो असल्याचे. माझी मुले जपानमध्ये जन्मली आणि वाढली आहेत. त्यांना फक्त जपानी भाषा येते आणि त्यांचे मित्रही जपानी आहेत. तरीही आम्हाला भारतात परत जाण्यास सांगितले जात आहे. दरम्यान, ऑक्टोबर २०२५ पासून लागू झालेल्या नव्या नियमांनंतर जपानच्या बिझनेस मॅनेजर व्हिसासाठी येणाऱ्या अर्जांमध्ये मोठी घट झाली आहे. पूर्वी दरमहा सुमारे १,७०० अर्ज येत होते, तर आता ही संख्या केवळ ७० वर आली आहे.व्हिसा प्रणालीचा गैरवापर रोखण्यासाठी सरकारने हे नियम कडक केल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

## निवडणूक आयुक्त निवड समितीत न्यायाधीशांची संविधानात तरतूद नाही

पान १ वरून

निवडणूक आयोगाच्या नियुक्ती समितीत न्यायमूर्तींचा समावेश असणे आवश्यक आहे, असे राज्यघटनेत कुठेही असे नमूद केलेले नाही. समितीत न्यायमूर्तींचा समावेश करणे हा संसदेचा धोरणात्मक निर्णय असू शकतो. परंतु ते घटनात्मक बंधन नाही. निवडणूक आयोगाचे स्वातंत्र्य हे त्याच्या घटनात्मक दर्जा, पदाची सुरक्षितता, पदच्युतीबाबतची सुरक्षा आणि वैधानिक संरक्षण यांमधून येते, नियुक्ती प्रक्रियेत न्यायाधीशांचा समावेश असल्यामुळे नव्हे. २०२३ चा कायदा हे सर्व संरक्षण कायम ठेवतो आणि नियुक्ती प्रक्रियेत पारदर्शकता आणतो. आजवर सरकारच्या भूमिकेमुळे निवडणुकांच्या निष्पक्षतेवर परिणाम झाल्याचे एकही उदाहरण नाही.


### कल्याण डोंबिवली महानगरपालिका, शिक्षण विभाग, कल्याण

पहिला मजला, झोजवाला कॉम्प्लेक्स, सहजानंद चौक, कल्याण (प)

**दूरध्वनी क्रमांक** . 0251-2203621 Email- ssakdmc@yahoo.co.in

**निविदा सुचना क्रमांक ०१ (सन २०२६-२७)**

सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत नोंदणीकृत निविदाधारक / लघुउद्योजक संस्था यांचेकडून महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांसाठी शालेय वह्या खरेदीसाठी ई टेंडरिंग दोन लिफाफा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत.

१) इच्छुक निविदाधारकांना www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ही निविदा खरेदी करून भरता येईल.
२) निविदा अर्जाची विक्री दिनांक१८/०५/२०२६ ते दिनांक २५/०५/२०२६ पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहतील.
३) निविदा भरण्याचा कालावधी १८/०५/२०२६ ते दिनांक २५/०५/२०२६ पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत राहील.
४) निविदापूर्व बैठक दिनांक २०/०५/२०२६ रोजी सकाळी / दुपारी ५.०० वाजता मा. उप आयुक्त (शिक्षण) यांचे दालनात आयोजित करण्यात आली आहे.
५) प्राप्त निविदा शक्य झाल्यास दिनांक २६/०५/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता नागरी सुविधा केंद्र ई टेंडर विभाग कडोंमपा कल्याण येथे उपस्थित निविदाकार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.
६) एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचे अधिकार मा. आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी राखून ठेवले आहेत.


सही/-
उप आयुक्त (शिक्षण)
कल्याण डोबिवली महानगरपालिका
कल्याण




# नवाकाळ



## 'गोकुळ'चे दूध २ रुपयांनी महागले



**कोल्हापूर -** अमूल आणि मदर डेअरीनंतर आता राज्यातील गोकुळ दूध संघाने गायीच्या दुधाच्या विक्री दरात प्रति लीटर २ रुपयांची वाढ केली आहे. नवीन दर २१ मे २०२६ पासून लागू होणार आहेत. गोकुळ दूध संघाच्या प्रशासकीय मंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. मात्र, दूध उत्पादक शेतकऱ्यांकडून घेतल्या जाणाऱ्या खरेदी दरात कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. इंधनाचे वाढते दर, कच्च्या मालाच्या किमती, तसेच वाहतूक, पॅकेजिंग आणि इतर खर्चात सातत्याने होत असलेल्या वाढीमुळे ही दरवाढ करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

## गिरणी कामगारांना ४५ दिवसांत घरे ताब्यात घेण्याचा अल्टिमेटम

■ मुंबई

**पनवेलमधील** कोन येथे गिरणी कामगारांसाठी बांधण्यात आलेल्या घरांच्या लॉटरीतील विजेत्यांना घरांचा ताबा घेण्यासाठी राज्याच्या गृहनिर्माण विभागाने ४५ दिवसांचा काळ दिला आहे. या कालावधीत ताबा न घेतल्यास प्रतीक्षा यादीतील पात्र गिरणी कामगार आणि त्यांच्या वारसांना प्राधान्याने घरे वाटप करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र कोरोना काळात ही घरे रुग्णांना दिली होती. या काळात घरांची बरीच तोडफोड झाली. त्याची दुरुस्ती पूर्ण झालेली नसताना त्याचा ताबा घेण्यासाठी दबाव आणला जात आहे.

गृहनिर्माण विभागाच्या निर्देशानुसार, ज्या विजेत्या गिरणी कामगारांनी किंवा त्यांच्या वारसांनी अद्याप घरांचा ताबा घेतलेला नाही त्यांना अंतिम ४५ दिवसांची मुदत देण्यात येणार आहे. मात्र, त्यानंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही. या मुदतीतही ताबा न घेतल्यास प्रतीक्षा यादीतील पात्र लाभार्थ्यांना प्राधान्यक्रमानुसार घरे वाटप करण्यात येणार आहे. विजेत्या कामगारांनी दिलेल्या मुदतीत घरे न घेतल्यास उर्वरित शिल्लक घरांसाठी नव्याने लॉटरी काढण्याचे निर्देशही गृहनिर्माण विभागाने दिले आहेत.

एमएमआरडीएने गिरणी कामगारांसाठी पनवेलच्या कोन परिसरात २४१७ घरे उभारली होती. या घरांची लॉटरी म्हाडामार्फत २ डिसेंबर २०१६ रोजी काढली होती.

## शक्तीपीठ महामार्गाविरोधात पुणे-सोलापूर मार्गावर आंदोलन

■ सोलापूर

**प्रस्तावित** शक्तीपीठ महामार्गाच्या विरोधात शेतकऱ्यांनी पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करत वाहतूक ठप्प केली. त्यामुळे महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. वाहतूक विस्कळीत झाल्याने प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागला. संत सावता माळी यांच्या संजीवन समाधीस्थळासाठी ओळखल्या जाणाऱ्या अरणसह पंचक्रोशीतील गावांमधील शेतकरी मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते. शेतकरी नेते राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात 'शेती वाचवा, गाव वाचवा' अशा घोषणा देण्यात आल्या. रास्ता रोकोदरम्यान राजू शेट्टी आणि पोलिसांमध्ये शाब्दिक चकमकही झाली. यावेळी शेट्टी यांनी आंदोलन मोडून काढण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला. तर शक्तीपीठ महामार्गामुळे सुपीक शेती जमीन बाधित होणार आहे.

## 'कर्करोग ग्रीड' तयार करणार मुख्यमंत्री फडणवीसांची घोषणा



■ पुणे

**पुणे** महानगरपालिका आणि 'आपुलकी' हेल्थकेअर यांच्या संयुक्त उपक्रमातून उभारण्यात आलेल्या कर्करोग रुग्णालयाचे लोकार्पण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात कर्करोगाच्या आजाराचे प्रमाण वाढत आहे. वेळेत निदान आणि उपचार मिळाल्यास हा आजार पूर्णपणे बरा होऊ शकतो. यासाठी महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर 'कर्करोग ग्रीड' तयार करण्यात येत आहे. पुणे महापालिकेने सार्वजनिक-खासगी भागीदारीतून उभारलेले कर्करोग रुग्णालय आरोग्य क्षेत्रासाठी मैलाचा दगड ठरणार आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, कर्करोगाच्या उपचारात विलंब झाल्यास रुग्णांना दीर्घकाळ उपचार घ्यावे लागतात. त्यासाठी मोठा आर्थिक खर्चही करावा लागतो. हीच बाब लक्षात घेत सर्वसामान्य नागरिकांना वेळेत उपचार मिळावेत यासाठी केंद्र आणि राज्य शासनाने विविध आरोग्य योजनांमध्ये कर्करोग उपचारांचा समावेश केला आहे. महानगरपालिकेच्या जागेवर सामाजिक बांधिलकी जपत उभारण्यात आलेले अत्याधुनिक कर्करोग रुग्णालय हे आरोग्य क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी पाऊल असून, सार्वजनिक-खासगी भागीदारीतून निर्माण झालेले हे केंद्र महत्त्वाची भूमिका बजाविणार आहे. राज्यभरातील आरोग्य सेवा अधिक प्रभावी आणि समन्वयित करण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे.

## राज्यात इंधनटंचाईमुळे पेट्रोल पंपांवर हाणामारी

■ परभणी

**आखाती** युद्धामुळे निर्माण झालेल्या इंधनटंचाईचा परिणाम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांत दिसत आहे. परभणी, बुलडाणा, वाशिम, जालना आणि हिंगोली, नंदुरबार, रत्नागिरी या जिल्ह्यांत पेट्रोल व डिझेलचा मोठा तुटवडा निर्माण झाला असून, अनेक पेट्रोल पंपांवर 'नो स्टॉक'चे फलक लागले आहेत. त्यामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. इंधन उपलब्ध असलेल्या पंपांवर वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्याने तासन्तास प्रतीक्षा करावी लागत आहे. अनेक ठिकाणी वाद होऊन हाणामारीच्या घटनाही घडत आहेत.

बुलडाणा जिल्ह्यात



परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. जिल्ह्यातील १६५ पैकी निम्म्याहून अधिक पेट्रोल पंप मागील तीन दिवसांपासून बंद आहेत. सिंदखेड राजा तालुक्यात इंधन भरण्यावरून एका व्यक्तीला मारहाण झाल्याची घटना काल घडली. वाशिममध्येही डिझेलसाठी ग्राहकांमध्ये हाणामारी झाली. परभणी आणि जालना जिल्ह्यांतही अनेक पेट्रोल पंप बंद असून, ट्रॅक्टरसाठी डिझेल न मिळाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. मशागतीच्या हंगामात शेतीची कामे ठप्प झाली आहेत. हिंगोली जिल्ह्यातील ३५ पैकी २० पंपांवरील डिझेल संपल्याने परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. त्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी पेट्रोल पंपांवर ठिय्या आंदोलन करत केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी केली. एकूणच, इंधन टंचाईमुळे राज्यातील दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी » पान ७ वर

## नाशिकमध्ये घटसर्प रोगाने २ चिमुकल्यांचा मृत्यू

■ नाशिक

**नाशिक** जिल्ह्यातील मालेगावमध्ये घटसर्प या गंभीर आजारामुळे दोन चिमुकल्यांचा मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे आरोग्य यंत्रणा सतर्क झाली असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शासनाकडून घटसर्प हा आजार नियंत्रणात असल्याचा दावा केला जात असतानाच ही घटना घडल्याने आरोग्य व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. मृत बालके मालेगावात वास्तव्यास असलेल्या राजस्थानी कुटुंबातील आहेत. लसीकरण मोहिमांवर मोठ्या प्रमाणात खर्च होत असतानाही अशी घटना घडल्याने प्रशासन हादरले आहे.

## नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरण मांढरेला १४ दिवसांची कोठडी

■ पुणे

**नीट** पेपरफुटी प्रकरणाच्या तपासात केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) ला महत्त्वाचे धागेदोरे सापडले आहेत. या प्रकरणातील आरोपी मनीषा मांढरेला आज न्यायालयाने १४ दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली.

नीट पेपर-सेटिंग कमिटीच्या सदस्य असलेल्या मांढरे यांना न्यायालयात हजर केले होते. सीबीआयने न्यायालयात सादर केलेल्या माहितीनुसार, हा पेपरफुटीचा प्रकार अत्यंत सुनियोजित होता व देशभर पसरलेल्या मोठ्या रॅकेटचा भाग होता. मनीषा मांढरे वनस्पतिशास्त्र (बॉटनी) आणि प्राणिशास्त्र (झूलॉजी) विषयांच्या प्रश्नपत्रिकांचे भाषांतर करणाऱ्या तज्ज्ञ असल्याने तिला मूळ प्रश्नपत्रिकांपर्यंत थेट प्रवेश होता. त्याचाच गैरफायदा घेत प्रश्नपत्रिका फोडली. त्यांनी पी. व्ही. कुलकर्णी आणि मनीषा वाघमारेसह संगनमताने कट रचल्याचे तपासात उघड झाले आहे. प्रश्नपत्रिका शुभम खैरनारकडे दिल्यानंतर ती पुढे विविध स्तरांवर पोहोचवली. मांढरेने पुण्यात क्लासेस घेऊन विद्यार्थ्यांना परीक्षेपूर्वीच प्रश्न दिले होते. ३ मे रोजी झालेल्या परीक्षेत हेच प्रश्न आल्याचे निष्पन्न झाले. या क्लासेससाठी फी म्हणून तिने लाखो रुपये घेतले होते.

## न्यू इंडिया बँक फसवणूक प्रकरणी लाभार्थी पवन गुप्ताला जामीन मंजूर

■ मुंबई

**एस्प्लनेड** कोर्ट येथील महानगर दंडाधिकारी न्यायालयाने १२२ कोटींच्या न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँक फसवणूक प्रकरणातील लाभार्थ्यांपैकी एक असल्याचा आरोप असलेल्या राजीव रंजन पांडे उर्फ पवन गुप्ता याला जामीन मंजूर केला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने त्याचा जामीन अर्ज फेटाळल्यानंतर पांडे यांनी सर्वोच्च न्यायालयात अपील केले होते. सर्वोच्च न्यायालयाने त्याचे अपील मंजूर करत खटल्याच्या न्यायालयाने ठरवलेल्या अटींवर जामीन देण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर पांडे यांनी दंडाधिकारी न्यायालयात अर्ज दाखल केला. बचाव पक्षाने युक्तिवाद केला की, ओळखीचा पुरावा कमकुवत असूनही त्याआधारे पांडे यांना खोटेपणाने गोवण्यात आले असून, त्यांच्यावर यापूर्वी कोणताही गुन्हा नोंदवलेला नाही. ते झारखंडमधील जमशेदपूरचे कायमस्वरूपी रहिवासी असून, वैध व्यवसाय चालवतात. बचाव पक्षाने न्यायालयाला हेही सांगितले की, पांडे यांच्या पत्नीवर दिल्लीतील रुग्णालयात मेजर डिप्रेसिव्ह डिसऑर्डरसाठी उपचार सुरू आहेत आणि दाम्पत्याला दोन अल्पवयीन मुले आहेत. सरकारी पक्षाने हा अर्ज फेटाळण्याची मागणी करत हा सार्वजनिक पैशांशी संबंधित गंभीर आर्थिक गुन्हा असल्याचे म्हटले. सहआरोपींच्या माध्यमातून 'कॅश-फॉर-सीएसआर' कटाचा भाग म्हणून पांडे यांना फसवणुकीतील सुमारे १५ कोटी रुपये मिळाल्याचा आरोप करण्यात आला.

## विशेष लष्करी रेल्वेत जवानांचा पाण्याविना आणि एसीविना प्रवास

■ मुंबई

**लष्करी** विशेष रेल्वेमधून प्रवास करणाऱ्या संरक्षण दलाच्या जवानांना दिल्या जाणाऱ्या निकृष्ट सुविधांबाबत संरक्षण विभागाने रेल्वे बोर्डाकडे पत्राद्वारे तक्रार केली आहे. त्यात म्हटले आहे की, पाणी नसलेले डबे, बंद पडलेली एसी यंत्रणा, संरक्षण दलाच्या डब्यांची खराब देखभाल आणि लष्करी लंगर डब्यांतील निकामी ओव्हन अशी दुरवस्था होती. या त्रुटींमुळे जवानांना अनावश्यक हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. हे पत्र मिळाल्यावर रेल्वे बोर्डाने गंभीर दखल घेत चिंता व्यक्त केली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, संरक्षण विभागाने रेल्वे बोर्डाला कळवले की, अनेक लष्करी डबे प्रवासादरम्यान ४०० किलोमीटरहून अधिक अंतर पाण्याविना होते. जवानांना बंद पडलेल्या वातानुकूलन यंत्रणा, डब्यांची खराब देखभाल आणि लंगर डब्यांमध्ये अन्न तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या खराब ओव्हनचा सामना करावा लागला.

## ओला-उबर-रॅपिडोची ॲप हटवण्याच्या आदेशाला स्थगिती

■ मुंबई

**राज्यातील** बेकायदा बाईक टॅक्सी सेवांवर कारवाई करण्यासाठी ओला, उबर आणि रॅपिडो या कंपन्यांची ॲप हटवण्याचा आदेश देणाऱ्या महाराष्ट्र सायबर विभागाने अवघ्या २४ तासांतच त्या निर्णयाला स्थगिती दिली आहे.

माहिती तंत्रज्ञान कायदा २००० च्या कलम ७९ (३) (ब) अंतर्गत गुगल आणि ॲपलला पाठवलेल्या नोटीसद्वारे ही ॲप प्ले स्टोअर व ॲप स्टोअरवरून हटवण्याचे आदेश दिले होते. या निर्णयामुळे ऑनलाईन कॅब व ऑटो सेवा




देणाऱ्या कंपन्यांमध्ये खळबळ उडाली होती. मात्र, या ॲपवर पूर्ण बंदी घातल्यास कॅब आणि ऑटो सेवादेखील ठप्प होण्याची शक्यता लक्षात घेऊन सरकारने तातडीने माघार घेतली. आता

### २४ तासांत सरकारची माघार

केवळ बेकायदा बाईक टॅक्सी सेवा बंद करण्यासाठी पर्यायी मार्ग शोधण्यावर भर दिला जात आहे. या प्रकरणी कायदेतज्ज्ञांनी सरकारचा निर्णय न्यायालयात टिकणे कठीण असल्याचे मत व्यक्त केले होते. त्यामुळेच सरकारने घाईत घेतलेला निर्णय मागे घेतल्याची चर्चा आहे. राज्यातील बाईक टॅक्सीचा वाद गेल्या पाच वर्षांपासून सुरू आहे. २०२० मध्ये रॅपिडोने परवानगीशिवाय सेवा सुरू केल्यानंतर सरकारकडून अनेकदा कारवाई करण्यात आली.

## जाहिरात फलक हटवताना विजेचा धक्का! एकाचा मृत्यू

### तिघे जखमी

■ नायगाव

**जाहिरात** फलक हटवताना विजेचा धक्का लागून एका तरुणाचा मृत्यू झाला तर अन्य ३ गंभीर जखमी झाले. मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील ससूनवघर येथे ही दुर्घटना घडली. वसई-विरार महापालिकेतर्फे महामार्गालगत असलेले अतिक्रमण हटविण्याची मोहीम सुरू आहे. त्यानुसार पालिकेचे अधिकारी आणि पोलीस कर्मचारी महामार्गावर कारवाईसाठी गेले होते. ससूनवघर येथील गिरनार हॉटेलच्या बाहेर लोखंडी खांबावर मोठे जाहिरात फलक (बॅनर) लावण्यात आले होते. त्यावर कारवाई होईल म्हणून हॉटेलचे ४ कर्मचारी ते बॅनर काढत होते. मात्र त्यावेळी त्या लोखंडाचा उच्चदाब क्षमतेच्या विद्युत तारांना स्पर्श झाला. विजेच्या धक्क्याने चौघे खाली कोसळले. त्यांना उपचारासाठी मिरा रोड येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यात गंभीर जखमी असलेल्या अभय तिवारी (२०) या तरुणाचा मृत्यू झाला.



मुंबईत सायन पुलासाठी नवीन स्टील गर्डर बसवण्याचे काम सुरू आहे. (छाया - दीपक साळवी)

## २० हजार टन एलपीजी घेऊन आणखी एक जहाज भारतात

■ कच्छ

**आखाती** देशातून २० हजार टन एलपीजी घेऊन आणखी एक जहाज गुजरातच्या कच्छ जिल्ह्यातील कांडला बंदरावर दाखल झाले आहे. मार्शल आयर्लंड्सचा ध्वज असलेल्या या जहाजाचे नाव 'सिमी' असे आहे. 'सिमी' या टँकरने १३ मे रोजी होर्मुजची सामुद्रधुनी ओलांडली. भारताकडे येणारे 'एमव्ही सनशाईन' हे एलपीजी जहाजही अलीकडेच सुरक्षितपणे पार झाले. युद्ध सुरू झाल्यापासून भारतात १५ एलपीजी जहाजे दाखल झाली आहेत. देशात सरकारी तेल कंपन्यांनी सुमारे दोन आठवड्यांपूर्वी व्यावसायिक वापराच्या गॅस सिलिंडरचे दर वाढवले होते. त्यानुसार १९ किलोच्या व्यावसायिक सिलिंडरची किंमत ९९३ रुपयांवर, तर ५ किलो सिलिंडरची किंमत २६१.५० रुपयांवर पोहोचली आहे. या दरवाढीचा फटका स्थलांतरित कामगार, सामुदायिक स्वयंपाकगृहे, कँटीन, रस्त्यावरील ढाबे तसेच लघुउद्योगांना बसत आहे.

## 'मॅक्स'नंतर रायगड पोलीस दलात 'बघिरा'ची नियुक्ती

■ रायगड

**रायगड** पोलीस दलातील 'मॅक्स' या स्निफर डॉगच्या सेवामुक्तीनंतर आता 'बघिरा' या बेल्जियन मॅलिनॉइस जातीच्या नव्या श्वानाची नियुक्ती झाली आहे. स्फोटक शोधक आणि स्निफर डॉग म्हणून विशेष प्रशिक्षण घेणारा 'बघिरा' रायगड पोलीस दलाच्या सुरक्षा आणि शोध मोहिमांना नवे बळ देणार आहे.



रायगड पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या पत्रकानुसार, बेल्जियन मॅलिनॉइस ही जात बुद्धिमत्ता, चापल्य आणि धाडसी स्वभावासाठी जगभरातील सुरक्षा दलांमध्ये प्रसिद्ध आहे. 'बघिरा' रायगड पोलीस दलात दाखल झाला तेव्हा त्याचे वय अवघे नऊ आठवड्यांचे होते. रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी त्याचे नामकरण केले. भविष्यात 'बघिरा'ला स्फोटक पदार्थ शोधक म्हणजे स्निफर डॉग म्हणून प्रशिक्षित केले जाणार आहे. प्राथमिक टप्प्यात रायगड-अलिबाग पोलीस मुख्यालयात त्याला पाच महिन्यांचे बेसिक ओबिडियन्स प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यानंतर पुढील सात महिन्यांत विशेष स्फोटक शोध प्रशिक्षण देण्यात येईल. या प्रशिक्षणाद्वारे गर्दीची ठिकाणे, संवेदनशील भाग आणि विशेष बंदोबस्तादरम्यान स्फोटकांचा शोध घेण्यात 'बघिरा' महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.


**काँगोच्या पूर्वेकडील इटुरी प्रांतात इबोला विषाणूचा गंभीर उद्रेक झाला आहे. यात आतापर्यंत ८० जणांचा मृत्यू झाला आहे, तर २४६ संशयित रुग्ण आढळले आहेत. या पार्श्वभूमीवर जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) जागतिक आरोग्य आणीबाणी जाहीर केली आहे. मात्र हा उद्रेक सध्या महामारीच्या श्रेणीत नसल्याचे स्पष्ट केले आहे.**

## काँगोमध्ये इबोला विषाणूमुळे ८० मृत्यू जागतिक आरोग्य आणीबाणी घोषित

■ किंशासा

**काँगोचे** आरोग्य मंत्री सॅम्युअल-रॉजर कंबा यांच्या माहितीनुसार, २४ एप्रिल रोजी मृत्यू झालेल्या एका परिचारिकेपासून या उद्रेकाची सुरुवात झाल्याचा अंदाज आहे. तपासात इबोलाच्या बुंडीबुग्यो उपप्रकारच्या आतापर्यंत ८ प्रकरणांना दुजोरा मिळाला आहे. हा रोग सध्या बुनिया, रवामपारा आणि मोंगवालू या भागांत पसरला आहे.

तज्ज्ञांच्या मते, यावेळी आढळलेला बुंडीबुग्यो उपप्रकार चिंतेचा विषय आहे. कारण याआधी



काँगोमध्ये प्रामुख्याने झैरे उपप्रकार आढळत होता. विद्यमान लसी व उपचार त्यावर आधारित होते. त्यामुळे नव्या उपप्रकारामुळे उपचारांमध्ये अडचणी निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. इटुरीची राजधानी बुनिया येथे भीतीचे

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

वातावरण असून, सतत मृत्यू होत असल्याची माहिती स्थानिकांनी दिली आहे. मात्र, बाजारपेठा आणि सार्वजनिक ठिकाणी दैनंदिन व्यवहार सुरूच आहेत.

## सीबीएसईमध्ये नववी-दहावीत तीन भाषा शिकणे अनिवार्य

■ नवी दिल्ली

**केंद्रीय** माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी सुधारित भाषा धोरण जाहीर करत १ जुलैपासून तीन भाषा शिकणे सक्तीचे केले आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २०२३च्या शिफारशींनुसार हा निर्णय घेण्यात आला असून, तीनपैकी दोन भारतीय भाषा शिकणे बंधनकारक असणार आहे.

सीबीएसईने १५ मे रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार हे धोरण २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून लागू होणार आहे. नव्या नियमांनुसार विद्यार्थ्यांना तीन भाषांचा अभ्यास करावा लागणार असून, त्यातील किमान दोन भाषा मूळ भारतीय असणे आवश्यक राहील. परदेशी भाषा निवडायची असल्यास इतर दोन भाषा भारतीय असणे बंधनकारक असेल. तसेच परदेशी भाषा चौथी पर्यायी भाषा म्हणून निवडण्याची सुविधाही उपलब्ध करून दिली आहे. माध्यमिक स्तरावरील वाचन, व्याकरण, मौखिक संवाद आणि लेखन कौशल्यांमध्ये ७५ ते ८० टक्के साम्य असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना अनेक भाषा आत्मसात करण्यास मदत होईल. सीबीएसईने अनुसूचित १९ भारतीय भाषांमधील सहावीची पाठ्यपुस्तके १ जुलैपूर्वी उपलब्ध करून देण्याचेही स्पष्ट केले आहे.